

गोपालकृष्ण कौल

REFBK-0011619
म. अ. स. ठाणे
विषय पारिजा
सं. क्र. १०७०

# चतुरंग-रेखा

३१०६८
१०००
परि क्र.
५८८१५१

: लेखक :
गोपालकृष्ण भोबे

११६१९

मूल्य रु. २

REFBK-0011619

: एकमेव विक्रेते :
बॉम्बे बुक डेपो, गिरगांव, मुंबई ४.

# ओळख

****

गोपालकृष्ण भोबे ह्या माझ्या मित्राची कुंडली, हात किंवा मुद्रा पाहून हा गृहस्थ पुढें कोण होणार आहे हें भविष्य साक्षात् भृगु तरी सांगूं शकला असता कीं नाहीं ह्याची मला जबरदस्त शंका आहे. सुमारें वीस वर्षांपूर्वी मीं भोब्यांना प्रथम पाहिलें तें एका गाण्याच्या बैठकींत ! श्रोता म्हणून नव्हे, गवई म्हणून ! आपल्या कलासिक्त गोमंतभूमीचीं समस्त वैशिष्ट्यें दाखवीत बैठक रंगविणारा हा गायक मुंबईत इतर अनेकांसारखेंच नशीब काढायला आला होता. पांचच्या सुमाराला बैठक सुरू झाली. आणि ईषद् सानुनासिक स्वरांत त्यांनीं भीमपलास सुरू केला. पहिल्या आवर्तनाच्या अखेरीला समेच्या तोंडावर भोबे ऐशा थाटांत आले कीं, हजर मंडळींची दणदिशीं सम मिळाली. लयीची बांधणी देखील अस्सल गोमंतकीय आड-वळणाची होती. अगदीं फाल्गुनी पौर्णिमेच्या उत्सवांतल्या 'चंद्रावळी'ची आठवण व्हावी अशी संथ लयीची–पण पाहून न पाहिल्यासारखें दाखवीत चालणाऱ्या चतुराननेसारखी ! गाण्याचा आवांका मोठा नव्हता, पण वळण मात्र फर्ड्या कारकुनाच्या मोडी अक्षरासारखं मोहक आणि बिकट. कलेंतला हा पेंचदारपणा केवळ गोमंतकीयांतच आढळावा ! वरून ध्यानं भाबडीं–अंतःकरणं तर श्रद्धेनें थबथबलेलीं, पण हातांत ब्रश येवो, छिन्नी येवो वा तबलातंबोरा येवो, पांची बोटांना विलक्षण पिळदारपणाची मेंदी लागलेली असते. आल्या पाहुण्याला जेवण करून घालायला पितळेचं घंगाळ गहाण टाकून मासे आणतील–शान्ता दुर्गा म्हाळसेच्या आणि मंगेश रामनाथाच्या नुसत्या धुळभेटीच्या दर्शनानें 'अश्रुनीर वाहे' डोळां होऊन जातील. पण तंबोऱ्याचा पंचम कमी लागलेला दिसला किंवा तबल्याच्या तुकड्यांत पाव मात्रा अलीकडे पलीकडे झाली तर भरल्या बैठकींत वाद्याचं 'हत्यार' हें उपनाम सार्थ करतील. मग मी मी म्हणणारे हे गोमंतकीय तालशास्त्री बेताल होऊन भांडतील, सुरसम्राट असुरासारखे भडकतील, चित्रकार विचित्र वागण्याची सीमा गांठतील, बोलण्याला जीभ अपुरी पडेल !

हीं खरोखरच भाग्यवंत माणसें. गोपालकृष्ण भोबे ह्याच पठडींतले. त्यांचें दुर्भाग्य एकच कीं परमेश्वरानें त्यांना फक्त दोनच हात दिले आहेत. त्यांचीं बोटें तंबोऱ्यातब्रल्याप्रमाणें रंगाच्या कुंचल्यावर देखील जोरदार पकड घेऊन आहेत. आतां लेखणी हातांत धरली आहे. तिची पकड देखील चांगली स्थिरावत आहे. उद्यां भोबे उत्तम 'बोलिंग' करूं लागल्याचें जर मला कुणीं सांगितलें तरी आश्चर्य वाटणार नाहीं. त्यांचे डोळे अचूक रंगरेषा टिपतात, कान तालसुराला सदैव आसुसलेले असतात, अंगांत अभिनयाचं कसब आहे. किंबहुना गोव्यांतल्या उत्सवांच्या नाटकांत भोब्यांना धैर्यधरापासून ते 'माझें घर' मधल्या बाजीरावापर्यंत कुठल्याहि भूमिकेची सुपारी येत असे. आणि भोबे ती घेऊन नाटक रंगवीत.

जीवनांतल्या अनेक अंगांत रंगलेल्या ह्या तरुण कलाकारानें अत्यंत सश्रद्ध अंतःकरणानें पुढल्या शेंसव्वाशें पानांत निरनिराळ्या कलाकारांच्या सहवासांत काढलेले क्षण आठवले आहेत. त्यांत गायक, वादक आहेत, चित्रकार, शिल्पकार आहेत. भोब्यांनीं त्यांच्याकडे श्रद्धेनें पाहिलें खरें पण ती श्रद्धा डोळस आहे. जाणत्याचें पाहणें आहे. क्वचित् विशेषणांत एखादा शब्द अधिकच नाहीं ना गेला अशी शंका येते. पण तो दोष अगर गुण ज्या मातींत त्यांचा जन्म झाला त्या मातीचा आहे. इथें दिव्यत्वापुढें माणसें लवतात. सच्चा सूर लागला कीं जीव ओवाळून टाकतात.

भोब्यांच्या लिखाणांत प्रसाद आहे. हा त्यांना लहानपणीं कानावरून गेलेल्या कथाकीर्तनांनीं दिलेला प्रसाद आहे. संत आणि पंत काव्याचे त्यांच्यावर जबरदस्त संस्कार आहेत. आजहि ते शेंपांचशें आर्या भिरकावूं शकतात. ( उद्यां दोन देवळांत 'गोपाळबुवा भोब्यांचें कीर्तन आहे' हा बोर्ड वाचायची माझी तयारी आहे. )

मराठींत कलावंतांच्या सहवासांतले क्षण केशवराव भोळे, वसंतराव देसाई आणि गोविंदराव टेंब्यांसारख्या मातबर लेखकांनीं टिपले आहेत. हीं पुस्तकें मराठी वाचकांनीं प्रेमानें वाचलीं. भोब्यांनाहि अधिकार आहे. दिवसभर सुराच्या, रंगाच्या किंवा शब्दांच्या धुंदींत राहणारा हा कलावंत आहे. आज ते व्यवसायानें चित्रकार आहेत. मैफिलींत जाणकार म्हणून

त्यांना मान आहे. साहित्यांत रसिक वाचक म्हणून त्यांच्या लेखकमित्रांना त्यांच्या मतांची किंमत वाटते. आतां ग्रंथकार म्हणून ते वाचकांपुढें येत आहेत.

स्वतःच्या जीवनांतले कलानंदाचे क्षण त्यांनीं मोठ्या प्रेमानें जतन करून ठेवले आणि वाचकांपुढें मांडले आहेत. रसिक वाचक त्यांचें अंतःकरण-पूर्वक स्वागत करतील ह्याची मला खात्री आहे.

लेखकाच्या अंतःकरणांतला 'हळुवारपणा आणोनिया चित्ता' वाचक हें पुस्तक वाचतील असा मला विश्वास आहे.

—पु. ल. देशपांडे

# हृद्गत

★★★★

गेल्या वीस वर्षांत अनुभवलेल्या सुखद क्षणांच्या ह्या आठवणी. तुलनात्मक, टीकात्मक वा मूल्यमापनात्मक असें ह्यांत कांहींहि नाहीं. आहे तो केवळ भक्तिभाव. तोहि भाबडा.

जात्याच सख्यभक्तीला भुकेलेला, गुरुजनांविषयींच्या अत्यादरानें सदा नम्र असलेला आणि कलावंत म्हटला कीं त्याच्याबद्दलच्या भाविकतेनें भारून जाणारा असा माझा पिंड. कवि हे शब्दसृष्टीचे ईश्वर आहेत; "नसता कवीचा व्यापार । तरीं कैंचा असता जगदुद्धार ॥ म्हणोनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ॥" अशा विश्वासानेंच, एखादा कवि भेटला कीं मीं त्याच्याकडे पाहातों. श्री. वि. स. खांडेकरांना मीं प्रथम पाहिलें, तेव्हां त्यांना एकटक बघत मी त्यांच्यामागून चाललों होतों. चर्नी रोड स्टेशनचा पूल ओलांडून ते पलीकडे गेले. संधि साधून त्यांना गांठून मीं हळूच विचारलें, "आपण खांडेकर ना?" आणि त्यांनीं 'होय' म्हणतांच त्यांच्याबद्दलच्या आजवर सांठवलेल्या आदरानें भारावून मीं त्यांना नमस्कार केला. त्यांनींहि प्रतिनमस्कार केला. गाडींत बसून ते जाईपर्यंत मी बाहेर उभा राहून पाहात होतों.

खांडेकरांना प्रत्यक्ष पाहिल्याचा आनंद मला कित्येक दिवस पुरला. तो आनंद जशाचा तसा वर्णन करून बरोबरीच्या मित्रांना सांगितला तेव्हां त्यांनीं अशा हळवेपणाबद्दल माझी थट्टा केली. ह्याच माझ्या मित्रांबरोबर मी एकदां चर्नीरोड गार्डनमध्यें फिरायला गेलों असतांना समोरच्या एका बांकावर महर्षि कर्व्यांना बसलेले मीं पाहिलें. त्या तपोमूर्तीला पाहतांच मला गहिंवरून आलें. एकदम पुढें जाऊन मीं त्यांना साष्टांग नमस्कार घातला. डोकें त्यांच्या पायांवर ठेवलें. महर्षींनीं माझें मस्तक आपल्या हातांनीं हळू उचलण्याचा प्रयत्न केला. मी उठलों आणि पुन्हा एकदां नमस्कार करून कृतकृत्य झाल्याच्या आनंदानें माझ्या त्या मित्रांबरोबर चालायला लागलों. त्यांनीं माझी खूप थट्टा केली. ते खदाखदां हंसले. मी मात्र खूप आनंदांत

होतों. महर्षींचे हात माझ्या मस्तकाला लागले हेंच माझें भाग्य समजत होतों. मात्र माझ्या त्या मित्रांच्या थट्टेमुळें ह्या अतिनम्र वर्तनांत आपलें कांहीं तरी चुकतें आहे असें मला सारखें वाटूं लागलें; पण काय चुकत होतें हें मात्र मला अजूनहि आकळलें नाहीं.

अशा ह्या भाबड्या, कांहींशा हळव्या भक्तिभावामुळें ह्या संग्रहांतल्या थोर कलावंतांच्या गुणांचें वर्णन करतांना माझी लेखणी हुरळून गेली आहे; परंतु दोषांच्या बाबतींत मात्र ती कचरली आहे. तज्ज्ञांच्या वाचनांत कदाचित् हा संग्रह आलाच तर ह्यांतली अपूर्णता त्यांना जाणवेल. त्यांनीं माझी वर निर्देशिलेली वृत्ति कृपाळूपणें लक्षांत घ्यावी.

माझ्या लेखनांतील कलागुणांपेक्षां ह्या संग्रहांत समाविष्ट केलेल्या अत्यंत थोर लोकांच्या पुण्याईमुळेंच हा संग्रह प्रकाशांत येण्याचें भाग्य लाभत आहे. माझे गुरुतुल्य स्नेही चित्रकार दीनानाथ दलाल आणि पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे ह्या दोघांनीं अनुक्रमें मुखपृष्ठ व प्रस्तावना ह्या रूपानें जणूं कवच-कुंडलेंच दिलीं. त्याबद्दल मीं त्यांचा ऋणी आहें.

'कैलास प्रकाशन'नें प्रकाशनाची जबाबदारी घेतल्याबद्दल त्यांचेहि आभार मानतों.

नवनीतचे चालक श्री. श्रीगोपाल नेवटिया ह्यांनीं माझें ह्या लेखमाले-बद्दल नेहमींच कौतुक केलें. ह्या संग्रहांतले बरेचसे लेख 'नवनीत' मधून घेतलेले आहेत. त्यांच्या परवानगिबद्दल आभार! तसेंच 'वसुधा'चे वसंतकुमार सराफ आणि वीणाचे उमाकांत ठोमरे व श्रीकृष्ण पोटगे ह्या संपादकमंडळींनीं आपापल्या मासिकांतून लेख घेण्याबद्दल परवानगी दिली त्याबद्दल त्यांचेहि आभार मानतों.

—गोपालकृष्ण भोबे

## अनुक्रमणिका


१. हठयोगी गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर १

२. स्वरेल रसीला गायक बडे गुलाम अलिखाँ १५

३. लयब्रह्म भास्कर खांप्रुजी पर्वतकर २६

४. प्रतिभावंत चित्रकार दि. दा. दलाल ३३

५. महापुरुष उस्ताद अमीरखाँ ४१

६. शिल्पसंजीवक कामत ५०

७. मणिपुरी नृत्य आणि नृत्यांगना जव्हेरी भगिनी ५६

८. अनवट रागांचा ज्ञानकोश मोहनराव पालेकर ६४

९. कला दिग्दर्शक मुरलीधर रामचंद्र आचरेकर ७२

१०. श्रद्धाळू संगीत–निर्देशक वसंत देसाई ८२

११. तबलानवाज खलिपा अमीर हुसेनखाँ ९१

१२. मैहर घराण्याचा आधारस्तंभ उस्ताद अलि अकबरखाँ ९९

१३. व्यासंगी कलावंत दत्तात्रेय गणेश गोडसे १११

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 3906
क्रमांक 9000 वि:
नों: दि:



## हठयोगी गानतपस्विनी

# मोगुबाई कुर्डीकर

अठरा वर्षांपूर्वी मोगुबाईंना मीं प्रथम पाहिलें.

मुंबईतील एका नामवंत संगीत सभेतर्फे त्यांचें गाणें होतें. मध्यंतरानंतर माझ्या मित्रानें त्यांचा नि माझा परिचय करून देतांना प्रथमच सांगून टाकलें होतें, " हो गोंयचो, असुक. " आणि आपल्या कुटुंबांतील व्यक्ति भेटल्याच्या आनंदानें, आपुलकीचें असें पूर्ण हास्य करून मोगुबाई म्हणाल्या होत्या, " हय ? "

प्रतिष्ठित संगीत-शौकीनांच्या गराड्यांत असूनसुद्धां त्यांनीं माझी आस्थेनें चौकशी केली होती. सावकाशीनें एकदां घरीं यायलाहि सांगितलें होतें. माझ्या कल्पनेंतल्या मोगुबाईंची केशभूषा निराळी होती, वेषभूषा निराळी होती, वागणें गुर्मीचें होतें, नजर आस्थेवाईक नव्हती. किंबहुना गांवचा म्हणून कुणीं परिचय करून दिला असता, तर " अशें " म्हणून साधे स्मितसुद्धां न करतां त्यांनीं मान वळविली असती.

परंतु प्रत्यक्षांतल्या मोगुबाई निराळ्या निघाल्या. माझ्यासमोर नऊ वारी इरकली लुगडें नेसलेली, साध्या वेषांतली, अंगप्रत्यंगांत भाबड्या साधेपणानें शोभणारी एक माउली उभी होती. त्या तापसी कायेकडे पाहातांना तिनें केलेल्या हठयोगी संगीतसाधनेचा प्रत्यय मिळत होता, परंतु त्याबरोबर हमखास येणारा अहंकारी दर्प मात्र तिच्यांत तिळमात्रसुद्धां नव्हता. संगीतसृष्टींतल्या दर्दी लोकांनीं एक 'अधिकारी' म्हणून जिच्याकडे बोट दाखवावें, तिला हा निरंहकार प्रथमदर्शनीं तरी शोभत नव्हता. शिवाय ही अजब सांगड कलाक्षेत्रांतल्या कायद्याला सोडून होती.

कुठल्याहि संगीत कार्यक्रमाला अभावानेंच तळपणारे मान्यवर संगीतज्ञ त्या दिवशीं समोर बसले होते. खाँसाहेब विलायतखाँ होते, खादीम हुसेन होते, अजमत हुसेन होते, अनवर हुसेन होते. आणखीहि आग्रा घराण्याचे गायक होते. जयपूर घराण्याचे नत्थनखाँ होते. त्या घराण्याचा इतर शिष्यसंप्रदाय होता. झालेंच तर गोविंदराव टेंबे होते, बेहरेबुवा होते. अनेक 'बडे' होते. ते माना डोलावीत होते. समेसमेला दाद देत होते. रस घेत होते. आणि समोर बाईंची मर्यादशील मूर्ति विनयानें बसली होती. माझा ऊर भरून येत होता.

त्यांच्या घरीं गेलों तेव्हां मला वाटलें होतें, माझ्यासारख्या अनभ्यस्त माणसाला बाई नक्कीच म्हणतील, "संगीत हा विषय सोडून इतर कुठल्याहि विषयावर बोलायचं असलं तरच बोला." किंवा निदान तो विषय कटाक्षानें टाळतील. पण तसें झालें नव्हतें; गांवाकडच्या अनेक गोष्टींबरोबरच संगीतावरहि मी भीत भीत कांहीं बोललों होतों, विचारलें होतें आणि माझें शंकानिरसन न कंटाळतां बाईंनीं केलें होतें.

संगीताराधनेसाठीं त्यांना करावीं लागलेलीं दिव्यें मित्रांकडून कानांवर आलीं होतीं. त्यांचीहि ओघानें थोडी उजळणी झाली.

संगीतलोकांतला मोगुबाईंचा प्रवास अत्यंत दगदगीचा, कटकटींचा, देहदंडांचा, आशानिराशांचा असाच झाला होता. आजच्या काळांतल्या अनुकूलतेशीं त्याची तुलना कुठल्याहि प्रकारें होऊं शकणार नाहीं.

साधनेच्या मार्गांत सोसाव्या लागलेल्या अनेक आपदांचें, अडचणींचें मोगुबाईंना विशेष वाटलें नाहीं; परंतु अद्यापहि केवळ स्मरणानें त्यांना मनस्ताप होतो, संतापानें त्या लाल होतात, त्या विनाकारण सोसाव्या लागलेल्या अपमानांच्या कडवट आठवणींनीं. बदला घेण्याचा त्यांचा स्वभाव नसल्यानें केवळ त्या आठवणींनीं कुढणें आणि पिचत राहणें ह्याव्यतिरिक्त त्या कांहींहि करूं शकत नाहींत. अगदीं विसरून जाऊं म्हटलें आणि मन ईश्वरभक्तीसारख्या निराळ्या विषयांत गुंतवलें, तरीदेखील एखादी अकल्पित घटना अकल्पितपणेंच अशी दत्त म्हणून पुढें येऊन उभी राहते कीं, ती साधी आहे म्हणून इतरांच्या आग्रहाच्या भरीला पडून मोगुबाईंनीं त्यांत कायावाचामनें भाग घ्यावा आणि ह्या नव्या घटनेनें पुनश्च बाईंना अपमानित करून कुढत ठेवावें, असें आजतागायत चाललेलें आहे. ह्या बाबतींतलें एक छोटेंसें, ताजें उदाहरण सांगण्यासारखें आहे. कांहीं दिवसांपूर्वींची गोष्ट. मरहूम खाँसाहेब अलादियाखाँ ह्यांची पुण्यातिथि मोठ्या प्रमाणावर मुंबई येथें साजरी केली जाणार असें आम्ही ऐकत होतों. ह्या निमित्तानें जयपूर 'घराण्या'चें गाणें आतां आपण मनसोक्त ऐकूं, ह्या आनंदांत आम्ही होतों. रोज नव्या बातम्या येत. आज 'बिर्ला मातुश्री सभागार' ठरविल्याची बातमी येई, तर दुसऱ्या दिवशीं खाँसाहेबांचा अमुक एक अज्ञात पट्टशिष्य ह्या वेळीं गाणार असल्याची खात्रीची बातमी मिळे. कुणी तिकीट आहे म्हणे, कुणी नाहीं म्हणे. एकानें तर खाँसाहेबांच्या नातवाला मुंबईत आपण प्रत्यक्ष पाहिल्याचें, कोल्हापुराहून तो खास ह्याच कामासाठीं आला असून त्याचा मुक्काम मोगुबाईंच्याकडे असल्याचेंहि सांगितलें होतें. बातम्या अनेक होत्या. त्या खऱ्याखोट्या कशाहि असल्या तरी त्यांतून दोन गोष्टी निश्चित होत्या. खाँसाहेबांची पुण्यतिथि यंदा मुंबईत होणार होती आणि वीस वीस वर्षें खाँसाहेबांकडून ज्यांना अव्याहतपणें दुर्लभ अशी गायकी मिळाली ते सारे आपसांतले मतभेद विसरून एका बैठकीवर गाणार होते. केवढा दुर्लभ योग !

परंतु कुठें माशी शिंकली देव जाणें ! खाँसाहेबांचे दुराग्रही शिष्य मतभेद विसरले नाहींत आणि पुण्यतिथीहि झाली नाहीं. बातम्या निव्वळ वावड्याच ठरल्या. शहानिशा करण्याकरितां, न राहवून मुद्दाम मीं मोगुबाईंच्याकडे गेलों. ही पुण्यातिथि व्हावी म्हणून तन-मन-धनें त्या झटत होत्या, हें माझ्या

ऐकिवांत आलें होतें. पुण्यतिथीच्या उल्लेखानेंच त्या खिन्न, उद्विग्न झाल्या; बेचैन झाल्या.

खरी गोष्ट अशी होती कीं, हा कार्यक्रम व्हावा म्हणून बाईंनीं खूप श्रम घेतले होते; परंतु खाँसाहेबांच्या एका ख्यातनाम शिष्यानें ऐन वेळीं नकार दिला आणि कार्यक्रमाच्या अध्वर्यूंनीं कार्यक्रमच रद्द केला होता. केवळ एका शिष्याच्या नकारानें सर्व कार्यक्रम रद्द करून, आपण खाँसाहेबांच्या इतर मान्यवर शिष्यांच्या अपमानास प्रवृत्त होत आहों, ह्याचा खेद कार्यकर्त्यांना भासलाहि नव्हता. कांहीं घडलेंच नाहीं अशा आविर्भावानें ते आले तसेच परत गेले होते. मोगुबाईंनीं परोपरीनें विनवून, आपण केलेले कार्यक्रमा-संबंधींचे श्रम आणि तो होण्यांतलें औचित्य दाखवूनहि कांहीं उपयोग झाला नव्हता. शेवटीं " आतां ह्यापुढें तुम्ही मला पुन्हा अशा कुठल्याहि कार्यांत गोवूं नका " एवढें बजावण्याव्यतिरिक्त दुसरें कांहीं त्यांच्या हातीं उरलें नाहीं. कार्यक्रमाचे अध्वर्यु निघून गेले आणि इकडे श्रमाबरोबर पदरमोडहि झाली होती ती मोगुबाईंची. भक्तिभावानें आपल्या परात्पर गुरूंचें पुण्यस्मरण कोल्हापूरला दर वर्षी जाऊन त्या करीत असतच. त्याच भक्तिभावानें प्रेरित होऊन त्या ह्याहि वेळीं कार्यप्रवृत्त झाल्या आणि पुन्हा एकवार अपमानित मात्र होऊन बसल्या.

हा एकच नव्हे, असे अनेक अवहेलनेचे प्रसंग मोगुबाईंनीं त्यांना समजायला लागल्यापासून, आपला दोष नसतां, अनुभवलेले आहेत.

आपल्याला शास्त्रीय गाणें यावें ही मोगुबाईंच्या मातुश्री जयश्रीबाई कुर्डीकरांची आंतरिक तळमळ. जीवनाच्या अंतापर्यंत त्यांना ती शांत करतां आली नाहीं. त्या काळांत नाटककंपन्यांतून गायकवर्ग फार मोठ्या प्रमाणांत वास्तव्य करून असे. तिथें आपली ही मनीषा पूर्ण होईल, म्हणून सात वर्षांच्या मोगुबाईंना घेऊन जयश्रीबाई ' चंद्रेश्वर भूतनाथ संगीत मंडळी ' ह्या नाट्यसंस्थेंत जाऊन दाखल झाल्या.

नाटक कंपनींत राहिल्यानें गाण्याचें शिक्षण मिळतें, ह्या त्या काळांतल्या भ्रामक कल्पनेला त्या अशा तऱ्हेनें बळी पडल्या आणि कंपनीच्या भ्रमंती-बरोबरच त्यांचें दैवहि भ्रमंतीला लागलें. कधीं महिन्याचे तीसहि दिवस

कंपनीच्या प्रयोगांचा धूमधडाका असे आणि बाईंना अतोनात श्रम होत. संगीताची तहान कायम राहून आयुष्याचें नाटक मात्र होत होतें. परंतु आशा मात्र सुटत नव्हती; तळमळ शांत होत नव्हती. त्यांतच आईबरोबर असलेल्या गोड गळ्याच्या छोट्या मुलीचाहि योग्य उपयोग नाटकांतून केल्यास कंपनीच्या पदरांत थोडें फार अधिक धन पडेल हा उद्देश धूर्त मालकाच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं. आणि छोट्या मोगूच्याहि वांट्याला 'प्रल्हाद', 'ध्रुव' अशीं छोटीं आणि संगीत कामें येऊं लागलीं. सात वर्षांच्या आपल्या मुलीवर अकालीं पडलेल्या ह्या ओझ्यानें आईच्या मनाला क्लेश होऊं लागले. परंतु सुरांत, ठसक्यांत व विशेषतः तालांत आपल्या धिटुकल्या पोरीनें म्हटलेल्या पदांनीं ती माउलीहि मोहून जाई. वाटे, आपली अपुरी आशा ह्या पोरीकडून तरी पुरी होईल. ह्या स्वप्नांत जयश्री-बाई रंगल्या खऱ्या, पण तें स्वप्न खरें झालेलें पाहण्याचें कांहीं त्यांच्या नशिबीं नव्हतें. अतिश्रमांनीं त्या आजारी पडल्या आणि एकुलत्या एक कन्येला मागें पोरकी ठेवून परलोकीं निघून गेल्या. आसन्नमरण अवस्थेंत बाळकृष्णमाम पर्वतकरांच्या ओटींत मुलीला घालतांना, आपली अखेरची अशी, मुलीनें मान्यवर गायिका व्हावें आणि त्याकरतां बाळकृष्णमामनीं मदत करावी एवढीच, इच्छा त्यांनीं उच्चारली होती. त्यांनीं मुलीला म्हटलें होतें, "तुझ्याभोंवतीं घोटाळणारा माझा आत्मा, ज्या दिवशीं तूं मोठी गायिका म्हणून मान्यता पावशील त्याच दिवशीं पावन होईल." मोगूच्या त्यावेळच्या बालमनाला आईच्या शब्दांचा अर्थ कळला असेल-नसेल, पण ते शब्द मात्र ती विसरली नाहीं. आणि त्यांचा, त्यामागच्या ध्यासाचा अर्थ कळूं लागला तेव्हां तिनेंहि प्रतिज्ञा केली कीं, "आई, अनंत हाल सोशीन, देहदंड सोशीन; मानापमानाची तमा बाळगणार नाहीं. पण संगीतविद्या मिळवून तुझी इच्छा पुरी करीन."

जयश्रीबाईच्या निधनानंतर कालांतरानें 'चंद्रेश्वर भूतनाथ कंपनी'च्या मालकांत मतभेद वाढले, कलह झाले, कंपनी फुटली आणि बंदहि पडली. बाळकृष्णमामपुढें ह्यानंतर योगक्षेमाचें प्रश्नचिन्ह उभें राहणें स्वाभाविक होतें. पुढला काल गांवांतच कसाबसा रेटीत असतां एक दिवस अचानक 'सातारकर स्त्री-संगीत मंडळी'चें आमंत्रण मोगूला मिळालें आणि तिला

घेऊन ते सातारकर मंडळींत दाखलहि झाले. पुन्हा एकदां मोगुबाई नाटक कंपनीच्या बिऱ्हाडीं येऊन दाखल झाल्या. हळुहळू त्यांच्या वांट्याला सुभद्रा, किंकिणी अशा महत्त्वाच्या भूमिका येऊं लागल्या. फार काय, त्यांच्या नांवावर कंपनीला उत्पन्न येण्याइतपतहि लोकप्रियता त्यांनीं संपादिली. अविश्रांत श्रम करूनसुद्धां, सर्वसामान्य नाटकधंद्याचें अपरिहार्य अंगच अशा अवहेलनेनें, अपमानित जिण्यानें त्यांना इथेंहि सोडलें नाहीं. नाटकाच्या दिवशीं एकदां तापानें फणफणत असतां सहानुभूतीच्या चार शब्दांऐवजीं मालकीणबाईनीं काढलेले आपल्याविषयींचे निरर्गल प्रलाप त्यांना ऐकावे लागले. त्या तगमगल्या, गुदमरल्या आणि तशाच अवस्थेंत आपल्या किंकिणीच्या लोकप्रिय कामासाठीं रंगभूमीवर गेल्या. पहिला प्रवेश त्यांनीं कसाबसा केला; परंतु विंगमध्यें परत येतांच त्या घेरी येऊन खालीं कोसळल्या. त्यांची शुद्ध गेली. ह्या निमित्तानें सुरू झालेला आजार त्यांना पुढें कित्येक महिने भोंवला; आणि नाटक कंपनींतलें त्यांचें हें दुसरें पाऊल अखेरचें ठरलें. मनस्तापाचें, अपमानाचें, नैराश्याचें, कितीतरी दारुण अनुभवांचें गांठोडें पाठुंगळीं घेऊन स्वग्रामीं परततांना मोगुबाईच्या अंतःकरणाला केवढ्या यातना झाल्या असतील ह्याची कल्पनाच करावी. आईची इच्छा अजून त्या पुरी करूं शकल्या नव्हत्या. पदरीं पडलें होतें लाजिरवाणें अपयश. तेंहि श्रमांतल्या कुचराईपोटचें नव्हे, कलागुणांतल्या उणीवेपोटचें नव्हे, उपरें, आपला कोणताहि दोष नसतांनाचें. एकेक स्मृति–कुठें एकच पत्रावळ धुऊन आळीपाळीनें जेवल्याची, अंतर्दिशेला आणि बहिर्दिशेला एकच एक लोटा कामीं आणल्याची, ताटांत कधीं नुसताच धपाटा तर कधीं नुसता ताकभात, अशा परिस्थितीची. जीव नुसता कासावीस होत असे ! त्यांतहि ' सातारकर स्त्री संगीत मंडळीं 'त असतांना बाईच्या अभ्यासू मनानें दोन गोष्टी आपल्याशा केल्याच. एक, नाटकांतल्या पदांचें नेटकें शिक्षण. हें त्यांना त्या वेळीं चिंतुबुवा गुरवांकडून मिळालें; आणि दुसरी, कंपनीनें नोकरीस ठेवलेल्या रामलाल नांवाच्या नृत्यशिक्षकाकडून नृत्याचे धडे. नृत्याचे हे धडे प्राथमिक स्वरूपाचे असले तरी मोगुबाईंना त्यांत गोडी वाटून पुढें संधि मिळतांच ' चुनीलाल ' व ' मजलेखाँ ' ह्या दोन तज्ज्ञ शिक्षकांकडून त्यांनीं नृत्याची जास्त तालीम घेतली.

आजारांतून बऱ्या झाल्यावर मोगुबाई गांव सोडून सांगलीला आल्या. तिथें त्यांनीं बिऱ्हाड केलें. कांहीं हितचिंतकांच्या सल्ल्यावरून खाँसाहेब इनायतखाँ ह्यांची तालीम त्यांनीं सुरू केली. हे खाँसाहेब मोठे लहरी आणि विचित्र स्वभावाचे होते. तसेच तापटहि होते. आरंभाआरंभालाच एका क्षुल्लक कारणावरून त्यांनीं बाईंचा एकदां अपमान केला आणि तालीम बंद करून टाकली. मोगुबाईंच्या साधनेंत हा असा श्रीगणेशालाच व्यत्यय आला. पेरलेलें बीं रुजलेंच नव्हतें. आणि नव्यानें जीव धरणाऱ्या आकांक्षेवर फिरून वर्मीं घाव बसला होता. तरीहि खाँसाहेबांनीं दिलेल्या थोड्याशा रागज्ञानाची मेहनत त्यांनीं पुढें चालू ठेवली. सकाळ-संध्याकाळ मिळेल त्या वेळीं तंबोरा घेऊन आवाज कसदार बनवणें एवढेंच हातीं होतें आणि त्या तें इमानेंइतबारें करीत होत्या.

आणि अशीच एक संध्याकाळ. यमनांतलें एक पद आळवून आळवून बाई गात होत्या. तारसप्तकांतला गांधार नुकताच कुठें स्थिरावतो आहे, अशा वेळीं आयुष्याच्या सांजेकडे झुकलेला, परंतु दिव्यत्वाचा भास व्हावा असा एक योगी पुरुष उंबरठ्यांत उभा राहिला. तारांवर फिरणारा बाईंचा हात थबकला, सूर तुटला, आणि मुद्रा प्रश्नार्थक झाली. परंतु त्यानें एक पाऊल पुढें टाकलें आणि तो म्हणाला, " गाते रहो बाबा, रियाज बंद करूं नकोस. मी फक्त ऐकायला आलों आहें ! "

मोगुबाईंना गानसम्राट अलादियाखाँचें झालेलें हें पहिलें दर्शन !

सांगलीला आबासाहेब सांबाऱ्यांकडे आश्रयाला असतांना खाँसाहेब रोजच मोगुबाई राहात होत्या त्या घराच्या खालून जायचे. रोज खालीं उभें राहून त्यांनीं ह्या गोड आवाजाचा रियाज ऐकावा आणि पुढें जावें; परंतु आज त्यांच्यानें राहवेना. वर येऊन त्यांनीं प्रत्यक्ष बाई पाहिली. तिचा हठयोग न्याहाळला. तिची चौकशी केली. बाईंची संगीत-शिक्षणाची तळमळ पाहून त्यांनीं मनांत काय संकल्प केला देव जाणे ! दुसऱ्याच दिवसापासून आबासाहेबांकडे जायच्या आधीं येऊन, मोगुबाईंना मुलतानीची तालीम द्यायला त्यांनीं सुरुवात केली.

गानविश्वांतला हा प्रतापी भास्कर आहे, ह्याची मोगुबाईंना कित्येक महिने दादच नव्हती. आपण ज्याच्याकडून विनासायास तालीम घेतों तो

एक संगीत-सम्राट आहे ह्याची त्यांना आजिबात जाणीव नव्हती. पुढें एकदां आबासाहेब सांबाऱ्यांकडे एका कार्यक्रमांत मोगुबाई गेल्या, तेव्हां खाँसाहेब गायला बसले असतांना गायनशास्त्रांतले भीष्मद्रोण असे अस्सल अस्सल मान्यवर नतमस्तक होऊन तिथें समोर बसलेले पाहून खाँसाहेबांच्या योग्यतेची जाणीव त्यांना प्रथम झाली.

आणि आपल्या दैवाचा त्यांना हेवा वाटला. माझ्यासारखी भाग्यवान् मीच, असें त्यांच्या मनानें गहिंवरून म्हटलें. पण दैव अनुकूल झालेंच नव्हतें. पुढें येणाऱ्या प्रतिकूलतेच्या नव्या वादळापूर्वीची ती शांतता होती.

खाँसाहेबांनीं तालीम सुरु करून उणेंपुरें दीड वर्ष लोटलें होतें. ह्या दीड वर्षांत मुलतानी, पूर्वी, धनाश्री आणि तोडी हे राग बाईंना कंठगत झाले होते. शिष्येची दांडगी ग्रहणशक्ति खाँसाहेबांचें मन रिझवत होती. प्रसन्नतेनें ते विद्या देत होते. परंतु अचानक एक दिवस बेचैन होऊन ते आले. म्हणाले,

" सांगली सोडून मला मुंबईला जावं लागतं आहे, कायमच्या वास्तव्या-साठीं जावं लागतं आहे. तुला मी टाकून जातोंय्, बाबा. "

खाँसाहेबांचे डोळे भरले होते; तरी पण पुढें ते म्हणाले होते,

" मुंबईला जर तूं आलीस तर कसंहि करून वेळांत वेळ काढून मी तुला शिकवीन. "

पुढें खाँसाहेब मुंबईला निघून गेले होते; आणि मोगुबाई मागें उरल्या होत्या. पुढें काय ?

सांगलीच्या नंतरच्या मुक्कामांत आबासाहेब सांबाऱ्यांच्या कृपेनें मरहूम रहिमतखाँ खाँसाहेब, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर आदि गायनाचार्यांचें गाणें बाईंना ऐकायला मिळालें हाच एकमेव मोठा फायदा होता.

तालीम तुटली ह्याचें बाईंना अपरंपार दुःख झालें होतें. मन ताब्यांत राहांत नव्हतें. महत्त्वाकांक्षा म्हणत होती, 'इथें काय करतेस ? मुंबईला चल !' सांगली सोडून बाई मुंबईला आल्या. खेतवाडींत त्यांनीं बिऱ्हाड केलें आणि खाँसाहेबांना गांठून पुन्हा शिकवावयाची विनंती केली. खाँसाहेबांनीं ती मानलीहि आणि तालमीचा तुटलेला धागा सांधला गेला.

मुंबईत खाँसाहेब ह्या वेळीं एका प्रचंड शिकवणींत गुंतले होते. त्यांच्या आयुष्याचें कल्याण त्यांची ही तालीम करीत होती. अर्थातच खाँसाहेबांची मर्जी आपल्याला सोडून दुसऱ्यावर वळूं नये, खाँसाहेबांच्या शिष्यत्वाचा शिक्का आपल्याशिवाय दुसऱ्यावर बसूं नये, अशी मत्सरी इच्छा खाँसाहेबांच्या त्या दात्याच्या मनांत उद्‌भवणें स्वाभाविक होतें. परिणामीं अप्रत्यक्षपणें मोगुबाईंना गुप्त विरोधक निर्माण झाले. त्यांनीं हरप्रयत्न करून खाँसाहेबांना मोगुबाईंची तालीम बंद करण्यास भाग पाडलें. खाँसाहेबांचाहि एकप्रकारें नाइलाज झाला होता. त्यांनीं तालीम बंद केली. ' दाम करी काम ' ह्या न्यायानें हा सारा मामला अस्तित्वांत आला होता. आकाश कोसळलें तें मोगुबाईंवर ! आतां काय करावें, ह्या विवंचनेंत त्यांना पुढचे बरेच दिवस काढावे लागले. शेवटीं वैतागून, संतापून केवळ शिकायलाच पाहिजे ह्या ईर्ष्येनें त्यांनीं आग्रेवाले बशीरखाँची तालीम योजिली; परंतु बशीरखाँनीं गंडा-बंधनाचा आग्रह धरला. तो सुद्धां गंडा स्वतःचा नव्हे तर आपले काका विलायतखाँ ह्यांना ! त्या कालांत आजच्यासारखीं गल्लोगल्लीं झटपट संगीत विद्यालयें नव्हतीं. विद्या द्यायची म्हणजे पंचप्राणच दिल्यासारखें गवयांना वाटे. अशा ह्या बिकट कालांत, मोगुबाईंना बशीरखाँच्या उघड उघड शिक्षित म्हणण्याला मान तुकवणें भागच होतें. जवळचें होतें नव्हतें तें सारें विकून बाईंनीं पैसे उभे केले; आणि हा गंडाबंधनाचा समारंभ पार पडला. मोगुबाई पर्यायानें आग्रा घराण्याच्या शिष्या झाल्या.

अलादिया खाँसाहेबांच्या कानावर ही गोष्ट गेली. त्यांना हें जिव्हारीं लागलें; पण करतात काय ? मूग गिळून स्वस्थ बसण्याखेरीज त्यांना गत्यंतर नव्हतें. तरी आपण लावलेलें गायकीचें वळण आतां निराळें रूप घेणार ही चिंता त्यांना अस्वस्थ करीत होती; आणि म्हणूनच मध्येंच एक दिवस मोगुबाईंच्याकडे येऊन ते म्हणाले,

" मोगू, तूं चालू तालीम बंद कर. मी माझ्या भावाला, हैदरखाँला इथें खास तुझ्यासाठीं बोलावतों. तो तुला व्यवस्थित तयार करील. मी शिकविलेल्या गाण्याला निराळं रूप मिळतां कामा नये. "

ह्यावर मोगुबाई मर्यादेनें उत्तरल्या,

" खाँसाहेब, तुम्हीं मला सापाला दुखवायला सांगताहांत. ज्यांच्याकडे मीं शिकतें आहें, त्यांची प्रतिष्ठा मुंबईत काय आहे ह्याची माझ्याप्रमाणेंच किंबहुना अधिकच कल्पना तुम्हांला असली पाहिजे. आणि पुढें कदाचित् हैदरखाँहि इथें राहिले नाहींत, आणि माझ्या तालमींत पुन्हा खंड पडला तर कुठल्याहि सबबी न सांगतां तुम्हीं स्वतः मला शिकवाल असं वचन द्याल तरच चालू तालीम सोडतें."

खाँसाहेबांनीं वचन दिलें होतें आणि हैदरखाँहि आले होते. त्यांनीं तालीम द्यायला सुरुवातहि केली होती.

हैदरखाँ एक महान् कलावंत होते. आयुष्यांतल्या एका दुर्घटनेनें त्यांच्यावर भयंकर परिणाम केला होता. आपल्या ह्या दुःखाचा विसर पाडून घ्यायला ते अफूचें अखंड सेवन करीत असत. मोगुबाईची असामान्य ग्रहणशक्ति आणि लयकारीचें जबरें अंग पाहून तो गुणी माणूस खूष झाला होता. दोन दोन दिवसांनीं नव्या नव्या चिजा, नवे नवे राग, ह्यांची खैरात मोगुबाईवर करायला त्यांनीं सुरुवात केली होती. सुरुवातीचा भक्कम पाया खाँसाहेब अलादियांनीं घातलाच होता, त्यावर हैदरखाँ गगनचुंबी इमारत बांधीत होते. आणि मोगुबाईहि आतां आयुष्याचें ह्यानंतर कल्याण होणार ह्या स्वप्नांत गर्क होऊन, गुरूकडून मिळेल तें घेण्यांत तहानभूक विसरून गेल्या होत्या.

परंतु अजून दैवाचा कौल अनुकूलतेकडे झुकला नव्हता. खाँसाहेबांच्या विरोधी शिष्यानें मोगुबाईच्या घरापासच्या गटारांत उभें राहून तालीम ऐकली होती ! त्यानें अलादियाखाँसाहेबांना कानपिचक्या देऊन समज दिली होती. हैदरखाँनीं मोगुबाईना थोड्याच दिवसांत कितीतरी गाणें दिलें होतें; आणि स्वतः खाँसाहेब तर ह्या मत्सरी शिष्याला एकच राग आणि चीज आठआठ महिने शिकवीत होते. आपल्या ह्या दात्याच्या ह्या जाचाला कंटाळूनच अखेर खाँसाहेबांनीं हैदरखाँना गांवीं जायला भाग पाडलें आणि मोगुबाई पुनश्च निराधार झाल्या.

आपल्याला असे शत्रु कां निर्माण व्हावेत हें त्यांच्या सरळ मनाला कांहीं केल्या कळत नव्हतें. कुणाचा घात न करतां, कुणाच्याहि अध्यांत मध्यांत

नसतां, अकस्मात् असे विरोध करणारे आणि आपल्या साधनेचा भंग करणारे शत्रु उत्पन्न व्हावेत, उठल्या बसल्या त्यांनीं आपली जमेल तितकी मानहानि करावी ही गोष्ट बाईंना भारी झोंबत होती.

आतां तर बशीरखाँ गेले होते; विलायतखाँहि रागावले होते. आणि सगळीकडे अंधार होता. अजून आपल्या आईची इच्छा आपल्याला पुरी करतां आली नाहीं, कदाचित् ह्या आयुष्यांत ती पुरीहि होणार नाहीं, ह्या कल्पनेनें मोगुबाईंना अतिशय दुःख होई. दिवसभर रडून डोळे सुजवून घेण्यापलीकडे दुसरें कांहीं हातीं उरलें नव्हतें. अशा ह्या अवस्थेंत दिवसामागून दिवस जात होते, महिने उलटले, वर्षेंहि लोटलीं. जें मिळालें त्याचीच तापसी आराधना चालू ठेवण्याखेरीज गत्यंतर नव्हतें आणि तीच चालू होती.

सव्वा वर्षाच्या किशोरीला मांडीवर घेऊन मोगुबाई संध्याकाळच्या वेळीं एका रागाची उजळणी करीत होत्या. खाँसाहेबांनीं सांगितलेला एक पल्टा डोळ्यासमोर होता. तसा तो गळ्यांतून उतरावा म्हणून निकराचा, एकाग्रतेचा प्रयत्न चालू होता. तन्मय होऊन, डोळे मिटून, अगदीं समाधिस्थ अवस्थेंत हें सारें चाललें होतें. जणुं खाँसाहेब समोर बसून तो पल्टा शिकवीत आहेत आणि त्यांची गुणी शिष्या त्याची सही सही उठावण लीलेनें करीत आहे. किशोरीनें चुळबुळ केली म्हणून बाईंनीं डोळे उघडले, आणि आपण पाहातों तें सत्य कीं स्वप्न हेंच त्यांना कळेनासें होऊन गेलें. प्रत्यक्ष खाँसाहेब अलादियाखाँ समोर बसून तो पल्टा स्वतः सांगत होते. गोष्ट विश्वास बसण्याजोगी नव्हती. हें तर एक सुंदर स्वप्न होतें. खात्री करून घेण्याकरितां बाईंनीं स्वतःला चिमटाहि घेऊन पाहिला असेल; परंतु तें सत्य होतें; खाँसाहेब पुन्हा आले होते.

विरोधकांना त्यांनीं सोडलें होतें कीं विरोधकांनीं त्यांना सोडलें होतें ह्याचा खरेखोटेपणा अजमावण्याचा व्यर्थ खटाटोप बाईंनीं कधींच केला नाहीं. खाँसाहेब त्यांच्याकडे आले होते, आणि त्यांनीं तालीम द्यायला सुरुवात केली होती एवढी एकच घटना त्यांना अपार आनंद देत होती. खाँसाहेबांच्या आगमनाच्या ह्या शुभदिवसापासून पुढें सतत पंधरा वर्षेंपर्यंत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत.
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नों: दि: ..................

मोगुबाईंना खाँसाहेबांची अखंड तालीम मिळाली. भारतविख्यात व्हायला खाँसाहेबांचा एवढा भरघोस आशीर्वाद पुरेसा होता.

आणि ह्यानंतर मग, ज्या सोन्याच्या क्षणाची त्या वाट पाहात होत्या तोहि क्षण आला होता. आईच्या इच्छेची पूर्ति त्या क्षणीं होणार होती. ती झालीहि. मत्सरग्रस्त प्रतिस्पर्धी आणि मोगुबाई एकाच बैठकीवर त्या दिवशीं गायले; संगीत प्रांतांतल्या मातबर दर्दी लोकांनीं मोगुबाईंच्या असामान्यतेची तारीफ केली. प्रत्यक्ष लयभास्कर खाप्रूजी पर्वतकरांनीं बाईंच्या लयकारीचें अमाप कौतुक केलें. इतर रसिकांनींहि एकमुखानें बाईंच्या सरसपणाचा कौल दिला होता. आणि वर्षांमागून वर्षें केलेल्या अतोनात, अमानुष तपस्येची, अट्टाहासाची एक प्रकारें सांगता झाली होती. बाईंच्या कष्टी, ध्येयवादी, आयुष्यांतला तो सोन्याचा दिवस होता.

रागाचें नांव विचारलें, चीजेचे शब्द लिहून घ्यायचा प्रयत्न केला, सरगम विचारली तर दुसऱ्याच क्षणीं तालीम बंद होई, अशा खडतर कालांतली ही एका अशिक्षित स्त्रीची प्रखर संगीतसाधना.

"अबे लिखनेसे गाना नही आ सकता!" "क्या तेरे बापके हम नौकर हैं?" "आज तबियत नही लगती!" अशीं वाक्यें त्या काळीं शागीर्दांना वारंवार ऐकायला मिळायचीं. 'मर्जी खप्पा' न होऊं देतां, 'तबीयत' राखून, सेवाभावानें त्या काळांत विद्या मिळवावी लागे. तनखा बंद करायची धमकी आजच्या संगीत-शिक्षकाला वारंवार ऐकावी लागते. पांच ते सात शिकवणी म्हणजे पांच ते सात! पांच वाजून चार मिनिटें झालीं कीं तनख्यांतले पैसे हिशेबानें आज कापले जातात. अनवट ह्या शब्दाचा अर्थहि न समजलेली विशींतली दोन शेपटेवाली भावगीताबरोबरच एक दोन 'अनवट' राग आज खुशाल गाऊन जाते आणि थोरांशीं तिची तुलना करून मागील पिढीला मूर्ख ठरविण्यापर्यंत तिच्या भोंवतालच्या स्तुतिपाठक नातेवाइकांचीहि मजल धांवते. कुणीहि उठावें आणि कुणाचीहि, त्याच्या ज्ञानाचा, व्यासंगाचा आणि वयाचाहि विचार न करतां रेवडी उडवावी अशा आजच्या कालांत मोगुबाईंसारख्या स्थिरचित्त तपस्व्यांनीं मूकवृत्ति धारण करावी ह्यांत आश्चर्य तें कोणतें?

रोमरोमांत भरलेली लयकारी हें मोगुबाईंच्या गाण्याचें एक खास अंग. यमन रागांतल्या तराण्याची त्यांची ध्वनिमुद्रिका ऐकल्यानंतर सुज्ञ श्रोत्याला त्यांची महत्ता सहजीं पटेल. 'योगताला' सारखा साडेपंधरा मात्रांचा, मी मी म्हणणाऱ्या तालज्ञांना अनाकलनीय असा ताल निवडून, त्या कालांत त्यांनीं हा तराणा मोठ्या तयारीनें गायलेला आहे. ह्या ध्वनिमुद्रिकेची पाठची बाजू बागेश्रींतल्या तराण्याची असून तो पंधरा मात्रांच्या 'सवारींत' गायलेला आहे. आणि एवढें हें एकच उदाहरण बाईंच्या गायकीची महत्ता सिद्ध करण्याकरितां पुरेसें आहे. अर्थात् चौथ्या मात्रेवरून तानेचा उठाव करून पुन्हा तेराव्या मात्रेपासून तराण्याचा बोल म्हणून पंधरा मात्रा पूर्ण होऊन, अर्धी मात्रा कशी भरली आणि बाई समेवर कशा आल्या, हें कुणा श्रोत्याला समजणें, तालांतलें 'तसें' योगसाधन केलें असल्या-शिवाय मुष्कील.

जयपूर घराण्याच्या चीजेचा भरणा दमसासाची ताकद असल्याशिवाय होऊंच शकत नाहीं. त्या घराण्याची कुठलीहि अस्ताई घेतली तरी एकदां सुरू केल्यावर एका दमांतच ती पुरी करावी लागते. (उदा० "री तुम समझ..." ) अंतराहि तसाच. धिम्या ठाय त्रितालांत, रूपकांत किंवा झपतालाच्या ठेक्यांत सुरू केलेली चीज, त्याचे तेवढे आकार-उकार घेऊन संपूर्णपणें बोल उच्चारून पुनश्च समेवर आणीपर्यंत श्वास घ्यायला उसंतच मिळत नाहीं. त्या रागांची आणि चीजांची तशी तालीम न मिळालेल्या एखाद्या गायकानें असला प्रयत्न केल्यास, त्याचें पाणी ताबडतोब कळून येतें. गुरुमुखांतून ज्यांना त्यांची तालीम मिळाली त्यांनींच ते राग गावेत. त्यांची वाटचाल अतिशय बिकट. जवळजवळच्या सारख्याच दिसणाऱ्या कित्येक रागरागिण्यांतून वाट काढीत त्यांचा धिमा प्रवास चालतो. ह्यांतले कित्येक राग असे आहेत कीं ते सर्व सारखेच वाटावेत. परंतु फरक इतका सूक्ष्म कीं, तज्ज्ञांनींच त्यांची ओळख पटवून घ्यावी. शुद्धनट, भूपनट, खटतोडी, सावनीकल्याण, हेम, बिहागनाट, खाकर अशीं जबरदस्त नांवें, जीं जिभेला-सुद्धां पेलत नाहींत. मोगुबाईंचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या गळ्यांत जबडी तान नाहीं. मुळांतच पातळ आणि चढ्या आवाजाची ईश्वरी

देन असल्यामुळें, गमकेच्या किंवा मिरखंडीसारख्या ताना त्यांच्या गळ्यांतून सहजीं येतात.

त्यांची शिष्यशाखा हा आजच्या कालांतला संगीतक्षेत्रांतला एकमेव अपवाद. सुविद्य आणि चिकित्सक वामनराव देशपांडे ह्यांच्यासारख्यांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलेलें आहे. सुशीलाराणी, कौसल्या मंजेश्वर, कमल तांबे आणि कन्या किशोरी आमोणकर हा बाईंचा शिष्यसंप्रदाय.

* *
*



स्वरेल, रसीला गायक

# खाँ साहेब बडे गुलाम अलि खाँ

'विक्रम संगीत परिषदेंत' खाँ साहेबांना मीं प्रथम ऐकलें; आणि तेव्हांपासून गाण्याविषयींच्या माझ्या कल्पना सर्वस्वीं बदलून गेल्या. असें सर्वांगसुंदर गाणें त्यापूर्वी मीं ऐकलें नव्हतें.

संध्याकाळचा साडेचारचा सुमार. एक विशालकाय उदराचा, कल्लेदार मिशांचा, उंचापुरा, रामपुरी टोपी घातलेला पुरुष मंडपाच्या खास दरवाजानें आंत आला; कुणींतरी त्याला श्रोत्यांत बसवलें. आदले दोन-तीन दिवस झालेल्या बऱ्याचशा कार्यक्रमांना जरादेखील रंगत आली नव्हती; तरीपण जो तो गायक आपापल्या घराण्याच्या गायकीची बूज राखायचा प्रयत्न करीत होता.

रंगमंचासमोरच्या पहिल्या चार ओळींत, अस्सल अस्सल असे घराणेदार गवय्ये-बजवय्ये स्थितप्रज्ञासारखे बसले होते. ज्यांच्या पांढऱ्या शुभ्र गलमिशा मंडपांतल्या कुठल्याहि श्रोत्याचें लक्ष वेधून घेत, असे पल्लेदार कोल्हापुरी साफा बांधलेले खाँ साहेब अलादियां खाँ, विंचवाच्या नांगीसारख्या आंकडेदार मिशा असलेले आणि वारंवार ज्यांच्या तुर्की टोपीचा झुपकेदार गोंडा लयबद्ध हाले, असे 'अफताबे मौसिकी' खाँसाहेब फैयाजखाँ, मुंबईला ज्यांनीं गाणें शिकवलें ते आग्रेवाले विलायतखाँ, तबला-नवाज तिरखवाँ खाँसाहेब, असे सगळेच गानवृद्ध, तपोवृद्ध श्रोत्यांत; आणि

त्यांच्यासमोर आपल्या गुरुघराण्याची प्रतिष्ठा ठेवायची म्हणजे मोठें कठिण काम होतें. कुणी बिचकत होते, कुणी अगदींच घाबरून जात होते, आणि भीतीनें तर कुणाची बोबडीच वळली होती. असे हे कांहींसे नीरस, बेरंगी कार्यक्रम ऐकून श्रोते आंबले होते; चैतन्यहीन झाले होते. ह्यापुढें जर हें असेंच चाललें असतें तर हा संगीतमहोत्सव कंटाळवाणा झाला असता.

साडेपांचला परिचायकानें ध्वनिक्षेपकावरून पुकारा केला होता, "लाहोरके प्रसिद्ध खाँसाहब बडे गुलाम अलिखाँ अभी आपके सामने आ रहे हैं। ये इस समय राग 'मारवा' में ख्याल, द्रुत और तराना सुनायेंगे।"

आपली तुंदिल तनु सावरीत, झुपकेदार मिश्यांवर हात फिरवीत, खुर्च्यांच्या रांगांतून खाँसाहेब बाहेर आले, पहिल्या रांगेत बसलेल्या गानभीष्मांच्या पायांना हात लावून त्यांनीं वंदन केलें; आणि त्यांचा आशीर्वाद घेऊन ते रंगमंचावर आले. त्यावेळीं खास वाटलें कीं, एवढा मोठा हा जडदेह पचायला तेवढेंच जड असें कांहीं तरी गाईल; परंतु अंदाज खोटा ठरला होता.

मस्त जुळलेल्या तंबोऱ्यांचा सूर ऐकत त्यांनीं पहिल्या प्रथम तबलजीला ठेका वाजवायला सांगितला, आपल्याला हवी तशी लय बांधून घेतली. आतांपर्यंतच्या झालेल्या कार्यक्रमांत हें नवीन होतें; लक्षवेधक होतें. त्या दोन्हीं वाद्यांची एकतानता होते न होते तोंच एकदम निषादावरून शुद्ध धैवतावर किंचित् स्थिर होऊन एकदम खर्जातल्या निषादावरून कोमल ऋषभाची आस दाखवून पुसटता खर्ज दाखवीत पुन्हा ते जेव्हां धैवतावर स्थिर झाले आणि त्या धैवतापासून सुरू असलेल्या एका गोड अस्ताईचा बोल म्हणून, आवर्तन घेऊन, ते जेव्हां समेवर आले, त्या वेळीं टाळ्यांचा कडकडाट झाला होता. साऱ्या सभेवर जणुं गुलाबजलाचा शिडकाव व्हावा आणि एक सुखद जाग यावी तसें झालें होतें.

मारव्याचा तो असामान्य थाट ऐकून मन क्षणभर धुंद झालें. त्यांची ती बांधेसूद, स्पष्ट आणि अर्थपूर्ण अस्ताई ऐकून आनंद झाला. आतांपर्यंत

पुष्कळ गाणीं झालीं होतीं; परंतु ह्याची ऐट वेगळी होती; न्यारी होती. अर्ध्या तासांत अस्ताई संपवून खाँसाहेबांनीं द्रुत लयींतली एक सुंदर चीज गायली. तिचा अर्थ श्रोत्यांना स्पष्ट कळत होता आणि कांहीं काल श्रोते तिचा आस्वाद घेतात न घेतात तोंच झपतालांतल्या मध्यलयीच्या ठेक्यावर आकर्षक असा तराणा खाँसाहेबांनीं सुरू केला. आतांपर्यंतच्या परंपरेला हें सोडून होतें. आला गेला गायक तराणा गायला तो श्रोत्यांना, तबलजीला आणि खुद्द स्वतःलाहि न आवरणाऱ्या लयींत; पण गुलामअलींचें सगळेंच कांहीं और होतें. टाळ्यांच्या गजरांत त्यांनीं 'मारवा' संपवला; आणि गजर विरतो न विरतो तोंच त्यांनीं 'पूरियाला' हात घातला.

तज्ज्ञांत कुजबुज सुरू झाली–'मारव्यावर पूरिया गायचा? जें मी मी म्हणणारांना पेलत नाहीं तीं गोष्ट व्हायची कशी? आतांपर्यंतच्या रंगतीवर हा खास पाणी ओतणार!' पण तसें झालें नाहीं. मारव्याप्रमाणेंच ते पूरियाहि तेवढ्याच जोमदारपणें आणि मर्यादा राखून गायले. मैफल संपली तेव्हां बाहेर पडणाऱ्या तृप्त श्रोत्यांच्या ओठांवर हेच शब्द घोळत होते–'असा मारवा ऐकला नाहीं; असा पूरिया ऐकायला मिळायचा नाहीं.'

ह्यानंतर खाँसाहेबांचीं अनेक गाणीं मीं ऐकलीं. मारवाडी विद्यालयांत श्री देवधरांनीं केलेल्या त्यांच्या सत्कारप्रसंगीं त्यांनीं गायिलेल्या 'बागेश्री'चा विसर पडणार नाहीं. 'भूपा'चा तराणा तर मनांत घर करून बसलेला आहे. अगदीं गाढ झोपेंतून उठवून कुणीं विचारलें तरीसुद्धां त्याचे बोल ओठावर येतील इतका तो खोलवर रुजलेला आहे–'येरि ए मैं कैसे घर जाऊं.' बागेश्रींतली ही चीज सगळेच गातात पण 'ये' आणि 'रि' ह्या दोन अक्षरांच्या खाँसाहेबांचा लाडिक खटका त्यांच्याशिवाय दुसऱ्या कुणाकडून आतांपर्यंत तरी ऐकायला मिळाला नाहीं. सूरसिंगार संसदेंत खाँसाहेब मोठ्या प्रेमानें गातात. त्यांचें प्रत्येक गाणें तिथें रंगलेलें आहे. एकदां स्वामी हरिदास जयंतीला त्यांनीं प्रथम 'जयजयवंती' आणि त्यावर लगेच 'हमीर' गाऊन एक वेगळेंच वैशिष्ट्य प्रस्थापित केलें होतें.

'हसमन' मध्यें रंगलेली 'भीमपलासी' तर त्यांच्या विरोधकांनासुद्धां कानांचीं पाळीं पकडून जीभ बाहेर काढायला लावणारी ठरली होती.

* * *

खाँसाहेबांनीं महाराष्ट्रांत पाऊल ठेवलें त्याआधीं येथील संगीताच्या दुनियेची अवस्था अत्यंत केविलवाणी अशी झाली होती. दुसऱ्या महायुद्धा-मुळें मराठी रंगभूमीला एकाएकीं अवनत अवकळा आली होती. आणि त्यामुळें शास्त्रीय संगीताची आवड उत्पन्न करणाऱ्या गोड नाट्यसंगीताची जागा, सपाट आणि बेडौल अशा बंगाली संगीतानें घेतलेली होती. सायगल, काननबालेपासून जुथिका रे, ह्या पोरसवदा गायिकेच्या सपाट आवाजानें एकच धुमाकूळ घातला होता. एकाच सुरांत कधीं वर तर कधीं खालीं असें एखाद्या गुणगुणणाऱ्या माशीसारखें संगीत फक्त गुणगुणलें जात होतें, गायिलें जात नव्हतें. कांहींशी रडवी आणि विषण्ण अशी छाया, संगीत सृष्टीवर साम्राज्य गाजवूं पाहात होती.

सुगम संगीताची त्या वेळची ती म्लान अवस्था थोडीशी दूर करण्याचें खरें श्रेय पै. गुलाम हैदर, स्व. खेमचंद्र प्रकाश, श्री. डी. पी. कोरगांवकर व श्री. केशवराव भोळे ह्या व्यासंगी संगीत-दिग्दर्शकांना जसें दिलें पाहिजे, तसेंच तें—रुक्ष आणि नीरस संगीत म्हणजेच शास्त्रीय संगीत अशी मक्तेदारी सांगणाऱ्यांची कोंडी फोडून—हळुवार, गोड आणि नखरेल पद्धतीनें शास्त्रीय संगीताची आवड बहुजन समाजांत अधिक उत्पन्न करतां येते, असें आपल्या नजाकतदार गाण्यानें सिद्ध करणाऱ्या खाँसाहेब बडे गुलाम अलि ह्यांनाहि दिलें पाहिजे.

उस्ताद अहमदजान तिरखवांच्या आगमनानंतर महाराष्ट्रांतल्या तरुण तबलावादकांची दृष्टि जशी आमूलाग्र बदलून गेली, तसेंच कांहींसें गुलाम अलींच्या बाबतींत म्हणतां येईल. खोट्या अभिमानाच्या आहारीं जाऊन शुष्क, रुक्ष अशा पद्धतींचा विनाकारण अवलंब करणाऱ्या तरुण पिढीला, सुरांच्या गोडव्याचें, सच्चेपणाचें महत्त्व जाणवलें तें गुलाम अलींमुळेंच. निदान मीं तरी आतांपर्यंत असा 'रसीला' तितकाच 'सुरीला' गायक ऐकलेला नाहीं. गेलीं पंधरा सोळा वर्षें मी गुलाम अलींचें गाणें ऐकतों

आहे. जिथें जिथें संधी मिळाली तिथें तिथें जाऊन मी त्यांच्या बैठका मनमुराद ऐकल्या. परिचय वाढला तसा त्यांच्या निवासस्थानीं जाऊन संगीताची अनिरुद्ध चालणारी चर्चा ऐकली. त्यांच्या श्रद्धाळू, भाविक आणि मानी स्वभावाची कल्पना आली. खाँसाहेब मुंबईत असले, म्हणजे एकदां तरी त्यांना भेटून यायचेंच असाहि एक शिरस्ता पडून गेला.

ज्या ज्या वेळीं मी खाँसाहेबांच्याकडे जाई त्या त्या वेळीं मला एका वेगळ्याच वातावरणाचा अनुभव मिळे. मांडीवर 'कानून'( स्वरमंडल) घेतलेले खाँसाहेब मध्यभागीं लोडाला टेंकून बसलेले; त्या 'कानून'च्या एक एक किंवा जोड अशा तारा छेडीत 'सा, रे, ग, म,'च्या लडीच्या लडी बाहेर फेकताहेत, हळूच एखादा स्वर लावला जात आहे, एका बाजूला पेटी घेऊन बरकत अलि बसलेले, मुनव्वर पाहुण्यांशीं बोलत बसलेला, डग्गा घेऊन 'इनायत' संथ ठेका लावून बसलेला; आणि आजूबाजूला पांच सहा तरी जाणकार श्रोते.

मधूनच असा एक सुरेल पल्टा तिथल्या श्रोत्यांचें काळीज कापीत जातो; 'वाहवा,' 'अहाहा' चे जल्लोष उठतात आणि प्रतिवंदन करून खाँसाहेब बोलूं लागतात—

"अजी देखिये, कुदरत ने हर इन्सान को अलग-अलग चीज दी है : किसी को आवाज दी, किसी को व्यापारी बनाया, किसी को 'कातिब' बनाया, किसी को कलम-बहादुर बनाया, और किसी को......!" आणि मग, स्थिरचरांत व्यापून उरलेल्या त्या परमेश्वराचे गुणानुवाद गातां गातां, गुलाम अलि 'बुजुर्गों'कडे वळतात. त्या बुजुर्गांनीं निर्माण केलेल्या संगीत पद्धतीविषयीं, सप्तसुरांपासून निर्मिलेल्या अनेक रागांविषयीं प्रात्यक्षिकासह निर्देशन सुरू होतें.

"देखो जी! पांच सुरों का सारंग! उसमें 'धैवत' लगाने से अलग राग बन जाता है। 'गांधार' लगाया तो दूसरा बन गया। आ हा हा! ये बुजुर्ग लोग भी ऐसे थे कि सारी जिंदगी ही उन्होंने इस काम में लगायी। व्रिंदाबनी सारंग, मधमाध सारंग, शुद्ध सारंग, मिया की सारंग, सामंत सारंग! एक सारंग राग के कितने प्रकार!"...आणि असें

सांगतां सांगतां, आपल्या एखाद्या निकटच्या मित्राकडे वळून ते म्हणतील "देखो, मिया मिर्झा गालिब ने कहा है......!!"

प्रात्यक्षिकासह चाललेलें हें संगीतसंकीर्तन किती वेळ चालतें त्याचा नेम नाहीं. इथें तहान-भूक, अडी-अडचणी, राजकारण, समाजकारण, वैयक्तिक हेवेदावे ह्यांचा पुरा विसर पडतो. आणि एका वेगळ्याच भावविश्वाचें विराट् दर्शन घडल्यानें आत्मा तरंगत राहातो.

गुलाम अलींच्या गाण्यांत प्रथमदर्शनींच मोह घालतो तो त्यांचा अत्यंत स्वरेल, लोचदार आणि गोड आवाज. हा आवाज केवळ जात्याच नैसर्गिक गोड असता तर गोष्ट निराळी होती; पण तसा तो मुळींच नव्हता. तब्बल चार वर्षे रात्रीं आणि दिवसां अफाट मेहनत करून खाँसाहेबांनीं तो कमावलेला आहे. कणीक तिंबून तिंबून मऊ करावी तसा त्या आवाजाला त्यांनीं तिंबलेला आहे. देहाचे लाड केले नाहींत, उन्हातान्हाची भीति बाळगली नाहीं. एक ध्येयच डोळ्यांसमोर ठेवलें—आवाज कमावणें, त्याला मनमानी वळवणें, तार सप्तकाच्या षड्जाला सहजगत्या भिडवणें, ह्यासाठीं त्यांनीं मेहनत केली; आणि ती कुठें ? तर गांवाबाहेरच्या, लोकवस्तीपासून दूर असलेल्या एका मशिदींत !

गुलामअलि हे पंजाबमधील 'कसूर' गांवचे. त्यांच्या वडिलांचें नांव अलीबक्ष, आणि चुलत्याचें कालेखाँ. ह्या दोघांहि भावांनीं अनुक्रमें बन्नेखाँ, पीरबक्ष आणि पतियाळा घराण्याचे वंशज मिय्यां काल्लू ह्यांच्याकडे शिक्षण घेतलें. दोघांहि भावांना गाण्याच्या मेहनतीचा विलक्षण शौक. त्यांच्या ह्या मेहनतीच्या शौकासंबंधीं एक गमतीची माहिती खाँसाहेब सांगतात. वयांत आल्यावर दोघांनींहि लग्न करायचें ठरवलें, मुलीहि निश्चित झाल्या. दोघांहि भावांनीं गांवोगांव फिरून लग्नखर्चासाठीं लागणाऱ्या पैशांची जमवाजमव केली. मेजवानीला लागणारे गहूं, साखऱ्या, तुपाचे डबे, केशर, वेलची आदि सामान घरीं येऊन पडलें होतें. लग्नाची आदली रात्र. दोघे भाऊ सहज बोलत बसले होते. शेजारींच पडलेल्या घमघमीत वस्तूंकडे नजर रोखून कालेखाँ म्हणाले—

" भैया अली, पाहिलंस ? मला वाटतं इतकं सुंदर साहित्य आजपर्यंत आपल्या घरांत इतक्या मोठ्या प्रमाणावर कधींच जमलं नव्हतं. हा रवा, हें तूप, ही साखर, हा आटा, वा ! वा ! मनमुराद रियाज करावा आणि त्यावर हा जमवलेला घी-मलिदा खावा. मला वाटतं चार महिनेपर्यंत तरी आपल्याला कशाचीच फिकीर करायला नको ! आपलीं लग्नं काय ? केव्हांहि होतील; परंतु पुढें असा रियाज मात्र होईल कीं नाहीं सांगतां येत नाहीं ! पाहा, विचार कर ! " अलिबक्षांना हा विचार मानवला; भावाच्या इच्छेप्रमाणें त्यांनीं लग्न पुढील वर्षावर ढकललें आणि दोघांहि भावांनीं त्या वर्षापुरतें तरी आपलें लग्न रियाजाशींच लावून टाकलें.

कालेखाँची दुसरीहि एक गोष्ट अशीच चमत्कारिक आहे. एकदां ते रियाजाला बसले कीं फक्त जठराग्नि तप्त झाला कीं तंबोरा खालीं ठेवायची त्यांना आठवण होई तेवढीच, एरवीं नाहीं. गुलाम अलि त्या वेळीं ८–१० वर्षांचे होते; आणि बाजारहाट करण्याचें काम त्यांच्याकडे होतें. रोज १ शेर मटण, आणि १ शेर खिमा, एवढें साहित्य सकाळींच आणून ठेवायची त्यांच्या काकांची त्यांना सक्त ताकीद होती. म्हणजे दहा वाजेपर्यंत सकाळचा रियाज संपवून नास्त्यालाच मटणाचा पुरवा झोडायची कालेखाँना संवय होती. एक दिवस गुलाम अलि मटण आणायला म्हणून गेले आणि मोहल्ल्यांतल्या इतर पोरांबरोबर गोट्या खेळण्यांत रंगून गेले. दुपारचे बारा वाजले, तरी त्यांना घरच्या कामाची आठवण झाली नाहीं. बारा वाजतां तोफेचा आवाज झाला त्या वेळीं त्यांना शुद्ध आली आणि धांवपळ करून त्यांनीं १ शेर मटण आणि १ शेर खिमा घेऊन भीतभीत घर गांठलें. इकडे कालेखाँ नित्यक्रमाप्रमाणें दहा वाजल्यापासूनच रागारागानें येरझारा घालीत राहिले. बारा वाजतां आलेल्या गुलाम अलीच्या अंगावर खेंकसून ते म्हणाले, " कहाँ है गोष्त ? लाव ! "

आणि त्याच्या हातांतून ती १ शेर मटणाची पुडी हिसकून घेऊन वांटून ठेवलेल्या मसाल्यांत आणि तुपांत एक एक तुकडा बुडवून त्यांनीं तें कच्चें मटण पोट भरेपर्यंत खाल्लें; आणि फिरून मेहनतीला बसले. झालेल्या प्रकारानें गुलाम अलींना घाम सुटला. कच्चें मटण खाल्लेल्या आपल्या ह्या काकांना काय

होईल ह्या भीतीनें बावरून जाऊन त्यानें शेजारच्या नातलगांकडे गाऱ्हाणें सांगितलें. त्यांतला एक वयस्कर माणूस 'आतां ह्या कालेखाँचें काय होणार ?' ह्या भीतीनें गांवांत जाऊन हकीमाकडून जड्या, बुट्टया, मात्रा घेऊन आला. तोंपर्यंत तीन वाजले होते. तीन वाजतां दोघेहि घरीं येऊन पाहातात तों कालेखाँ भूक लागली म्हणून ओरडत खिमा तयार झाला कीं नाहीं, परोठे तयार झाले कीं नाहीं ह्याची चौकशी करीत होते ! कलकत्त्याला एका समारंभांत गायला गेले असतां तिथें मस्करी करतां करतां जिद्दीला पेटून पानावर वाढायचें जवळजवळ एक रत्तल तूप प्यायले. असें अचाट खाणें आणि तेवढीच अचाट पचनशक्ति. अशा ह्या कालेखाँचें गुलाम अलींवर विशेष प्रेम.

गुलाम अलींना तालीमहि कालेखाँकडूनच मिळाली. सुराचा कमजोरपणा आणि कणसूरपणा घालवण्यासाठीं कालेखाँ आपल्या ह्या पुतण्याला घेऊन गांवाबाहेरच्या मशिदींत जात. ह्या मशिदीच्या एका भिंतीजवळ उभे राहून 'षड्ज' लावला कीं त्याचा सही सही प्रतिध्वनि उमटे. कालेखाँ पल्टा घेत त्याचा प्रतिध्वनि सुरांत मिसळलेला वाटे; परंतु गुलाम अलींच्या पल्टयाचा किंवा षड्जाचा प्रतिध्वनि बेसुर वाटे. तो प्रतिध्वनीच्या स्वरांत एकजीव होईपर्यंत रोजच कालेखाँ, गुलाम अलींकडून मेहनत करून घेत आणि पुढें खाँसाहेबानीं आपल्या रियाजासाठीं हीच जागा पक्की केली. एकच षड्ज, एकच पल्टा ह्या प्रतिध्वनीच्या सुरांत एकजीव होईपर्यंत कित्येक वर्षें खाँसाहेबांनीं मेहनत केली. पुढें ऐन तरुण वयांत वडिलांनीं दुसरें लग्न केलें आणि खाँसाहेबांच्या बंधूंना आणि आईला टाकून ते निघून गेले, तेव्हां गुलाम अलींना सारंगी वाजवून पोटाचा प्रश्न सोडवावा लागला होता. तरीहि गाण्याच्या रियाजांत त्यांनीं खंड पडूं दिला नाहीं.

सारंगीच्या साथीच्या निमित्तानें त्यांना गांव सोडून मुंबईला यावें लागलें आणि त्यामुळें गायकींत खंड पडला; परंतु सुदैवानें बाबा सिंधीखाँ ह्या अवलिया गायकाची आणि गुलाम अलींची गांठ पडून बाबांनीं त्यांना गाणें शिकवायला सुरुवात केली. ह्यापुढें लाहोर, सिंध, काश्मीर अशा बराच ठिकाणीं खाँसाहेबांना फिरावें लागलें. १९४३ पर्यंत लाहोर हीच त्यांची कर्मभूमि ठरली होती. पंजाबकडे त्यांची गाणीं फार होत. एक थोर गायक

म्हणून पहिल्या प्रथम ते कलकत्त्याच्या एका संगीत सभेंत प्रसिद्धीला आले; आणि १९४४ मध्यें मुंबईंत झालेल्या विक्रम संगीत परिषदेंतल्या महोत्सवांत त्यांचें भाग्य उदयाला आलें. वडिलांच्या त्यागानें अकालीं पडलेल्या कुटुंब-पोषणाच्या जबाबदारीमुळें ऐन तारुण्यांत खाँसाहेबांना अत्यंत खडतर वनवास भोगावे लागले; परंतु तशा परिस्थितींतहि त्यांनीं साधनेंत खंड पडूं दिला नाहीं. कलंदर वृत्तीला साजेशा भोळसटपणामुळें त्यांच्या रोजच्या आचरणांतून खूप विनोद निर्माण होतात; आणि मग घडलेल्या विनोदामुळें खाँसाहेब स्वतःहि हंसतात आणि लोकांनाहि हंसवतात. चौपाटीला उभें राहून आपल्या विशाल उदरावरील कुडतें बाजूला करून वारा घेत बसतील आणि आजूबाजूचे लोक हंसायला लागले कीं स्वतःहि हंसतील. एक अतिशय खर्चिक माणूस; कुंजुष वृत्तीचा लेश नाहीं. गरिबांबद्दल विशेष जिव्हाळा. त्यामुळें कुणीं कांहीं याचना केली कीं नकार नाहीं. तिथें मन उदार होतें.

त्यांच्या ख्याली गायकींत ठुंबरीचें अंग वारंवार येतें, असें एक विधान केलें जातें. मला तरी तसा अनुभव आलेला नाहीं. भूप गायला लागले कीं ते फक्त भूप गातात. त्यांत चुकूनहि देसकार किंवा शुद्धकल्याणाची झांक दिसत नाहीं. लयीच्या आठ पटीनें, सोळापटीनें, फिरायला लागले तरी रागाची शुद्धता राखून फिरतात आणि म्हणूनच "गुलाम अलींसारखा 'भूप' अन्य ठिकाणीं ऐकायला मिळत नाहीं" असें संगीताचे जाणकार वारंवार सांगतात.

कुठल्याहि रागाची अस्ताई खाँसाहेब मोठ्या मोहकपणें मांडतात. त्यांचा खर्जच मुळीं इतका बुलंद आणि स्वराशीं एकजीव झालेला असतो कीं त्याला तोड नाहीं. बिलंपतीची मांडणी जशी लोचदार आणि चिवट तशीच ती रागाचें सौंदर्य बिघडवीत नाहीं. अगदीं एकझोत चालल्यासारखी. साफ, सुरेल आणि दाणेदार आरोह-अवरोहाच्या ताना, हळूच अवधान सांभाळीत आवाज तार सप्तकाच्या षड्जाला भिडवणें, विविधरंगी हरकती तान-पल्ट्यांनीं अस्ताई अंतरा नटवणें, चीजेचे बोल स्पष्ट आणि रंगतीनें उच्चारणें इत्यादि खास वैशिष्ट्यें केवळ गुलाम अलींचींच. मध्यलयींतली जोड चीज म्हणजे एक मेजवानीच वाटावी. आणखी एक किमया जी फक्त खाँसाहेबच करूं

जाणें, ती अशी—एखादा राग ध्यायचा, त्याच्या तार सप्तकाच्या रिखबा कायम स्वर करून मूळ जीवनस्वर तसाच ठेवून दुसराच राग गायचा, पुन्हा गांधार कायम स्वर करून तिसरा राग, अशा दोन तीन रागांची छटा मूळ रागाची आस बिघडूं न देतां दाखवून येऊन पुन्हा तो मूळचा राग तसाच उभा करणें हें अजब कसब सुरावर पक्का कबजा असलेले गुलाम अलि खाँसाहेबच दाखवूं जाणें. स्वरविलासाच्या अशा अनेक किमया खाँसाहेब बसल्या बसल्या दाखवतात. त्यांची 'सरगम' करण्याची पद्धतहि अत्यंत मिठास आणि सहज आहे. आणि ठुमरीचे तर ते बादशहाच असल्याकारणानें त्याबद्दल कांहीं लिहायलाच नको; परंतु हें सारें रंगतें तें फक्त त्यांच्या मनाजोगें वातावरण त्यांना आढळलें तरच; नपेक्षां बिदागी घेऊन देखील स्थलकालाचा विचार न करतां आपले आपणच तें बिघडूनहि टाकतात. आणि मग उत्साहानें गाणें ऐकायला गेलेले लोक नाराजीच्या स्वरांत बोलतात "खाँसाहेब आज रंगले नाहींत!" लोकांचे हे शब्द खाँसाहेबांच्या कानावर जातात, त्यांना चेव येतो आणि मग तो रेल्वे प्लॅटफॉर्म आहे किंवा फुटपाथ आहे ह्याचा विचार न करतां शेंकडो लोकांना तिथल्या तिथें गाणें ऐकवतात. अनवट राग गाणें त्यांना आवडत नाहीं; परंतु आग्रहाला बळी पडून ते तो गातात आणि परंपरेशीं ताडून पाहातां तो तितकासा जमत नाहीं. अशामुळेंहि केव्हां केव्हां श्रोत्यांच्या पसंतीला त्यांचें गाणें उतरलेलें नाहीं, पण हें सर्व जरी असलें तरी त्यांतल्या त्यांत एखादाच हमीर असा गाऊन जातात कीं, त्या वेळीं हे जाणकार श्रोते उद्गारतात, "हमीर पुष्कळ गायक गातात; पण गुलाम अलि ते गुलाम अलीच!"

घराण्याच्या परंपरेची चर्चा करतांना ते एकदां रागानें म्हणाले होते, "देखो, जो अच्छा गायें और समजकें गायें ओहि घराना, और ओहि परंपरा है। अजी सुरीलेके सब दुष्मन है। और कहां के घराना और कहांकी परंपरा?"

ख्याल गायकींत ठुंबरी अंग यावें कीं येऊं नये? असा प्रश्न केला असतां ते रागानें म्हणाले होते,

" जिसको ' ठुंबरी ' नहीं आती उसको ' ख्याल ' नहीं आता ! "

खाँसाहेबांचीं वरील विधानें विचारवंतांना कदाचित् पटणार नाहींत. परंतु ती त्यांचीं स्वतःचीं आहेत. आणि एका जबाबदार गायकानें तीं केलेलीं असल्यामुळें त्यांत कदाचित् तथ्यहि असूं शकेल.

ह्या शास्त्रचिकित्सेच्या युगांत सुरांचें महत्त्व कमी झालेलें आहे, हें त्यांचें म्हणणें मात्र नाकबूल करून चालणार नाहीं.

खाँसाहेबांनीं अनेक चीजा बांधलेल्या आहेत. आणि ' सबरंग ' ह्या टोपण नांवानें त्या आजच्या गायकांत प्रचारांत आहेत. त्यांच्या ध्वनिमुद्रिकाहि अतिशय लोकप्रिय आहेत. गाणें अजिबात न समजणाऱ्या माझ्या एका स्नेह्यानें " का करुं सजनी आये न बालम " ही त्यांची ठुंबरींतली ध्वनिमुद्रिका ऐकून ' रेडियोग्राम ' घेतल्याचें मीं पाहिलें, आणि थक्क होऊन गेलों.

तीन महिन्यांपूर्वीं खाँसाहेबांना अठ्ठावन्नावें वर्ष लागलें. " हरिः ॐ तत्सत् " मधल्या भजनांतल्या ॐकाररूपी स्वरसाम्राज्यांत अपूर्व विलास करणाऱ्या ह्या आगळ्या कलावंताला उत्तरोत्तर आयुरारोग्य लाभो हीच सदिच्छा !

* *
*



‘ लयब्रह्म भास्कर ’
# खाप्रूजी पर्वतकर

गेल्या वीस वर्षांतल्या संगीत-श्रवणांतल्या कांहीं अमर क्षणांची माझें मन उजळणी करायला लागलें, कीं ज्या कांहीं ठळक गोष्टी दृष्टीसमोर येतात त्यांत ‘ व्लॅव्हट्स्की लॉज ’ मधली एक धुंद सकाळ आठवते.

पै. अब्दुलकरीम खाँसाहेबांच्या पुण्यतिथिनिमित्त त्या दिवशीं ‘ सरस्वती संगीत विद्यालयातर्फे ’ गायनवादनाचा एक आटोपशीर पण उच्च दर्जाचा कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. नामांकित गायक- वादक आपापली श्रद्धांजलि वाहणार असल्यानें श्रोतृवृंदानें हॉल अगदीं तुडुंब भरला होता.

तपोनिष्ठ बेहेरेबुवांनीं आपली वर्णी लावल्यानंतर हिराबाई बडोदेकर, सुरेशबाबू माने, फिरोज दस्तुर आदि किराणा घराण्याच्या अध्वर्यूंनींहि यथाशक्ति आपापलें अर्घ्य वाहिलें. त्यानंतर खाँसाहेब बडे गुलाम अलि खाँ गायला बसणार होते. सर्व श्रोत्यांचें लक्षहि विशेष करून त्याच कार्यक्रमावर केंद्रित झालें होतें; कार्यक्रमपत्रिकेप्रमाणें तसें जाहीरहि करण्यांत आलें; परंतु गुलाम अलि खाँसाहेबांच्या अत्याग्रहाला मान देऊन त्यांच्या आधीं

अचानक जी व्यक्ति रंगमंचावर आली ती म्हणजे ‘ लयब्रह्मभास्कर ’ खांप्रूजी पर्वतकर.

“ मी तुमचा जास्त वेळ घेत नाहीं; परंतु बडे गुलाम अलींचा आग्रहच असल्यानें लयकारीचे कांहीं प्रकार तुम्हांला दाखवणं भाग आहे. ”

इतकें बोलून तबलजीला त्रितालाचा ठेका धरायला सांगून प्रथम त्या ठेक्याची ‘ लय ’ श्रोत्यांना त्यांनीं स्पष्टपणें समजावून सांगितली. त्याच्या सोळा मात्रांचा पक्का हिशोबहि समजावून दिला. आणि नंतर त्याच सोळा मात्रांच्या त्रितालांत, चौदा मात्रांच्या ‘ आडा चौताला ’ सारख्या, नांवा-प्रमाणेंच ‘ आडा ’ असा ताल भरून घेऊन त्या तालाच्या लग्ग्या, बोल, तोडे, मुखडे आणि चक्रतालहि श्रोत्यांची दात घेत घेत भरून दाखवले. मागाहून त्याच तालांत त्यांनीं पंधरा मात्रांची आणि अकरा मात्रांची सवारी, बारा मात्रांचा एकताल, तेरा मात्रांचा एक कठीण असा ताल आणि दहा मात्रांचा झपतालहि भरून दाखवला. दहा मात्रांच्या झपतालांतच जेव्हां त्यांनीं चक्रताल फिरवून नऊ, नऊ मात्रांचा तिय्या घेऊन सम दाखवली, तेव्हां तर श्रोतृवर्गांतले सारे जाणकार रसिक त्या सभेला दाद देण्यासाठीं उठून उभे राहिले; खाँसाहेब गुलाम अलींनीं तर बसल्या जागेवरून उठून— एकदां समाधान न झाल्यानें—‘ फिरसे ’ ‘ फिरसे ’ म्हणून चक्रतालांत भरून आलेला ता नऊ मात्रांचा तिय्या, तीन वेळां खांप्रूजींकडून म्हणून घेतला.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें केवळ अर्ध्या तासांतच लयभास्करांनीं आपला कार्यक्रम संपवला खरा; परंतु त्या अर्ध्या तासाच्या कार्यक्रमानें परब्रह्मस्वरूप अशी जबरदस्त धुंदी मनाला कायमची डसवली.

रंगमंचावरून खालीं उतरल्यानंतर पुढें जाऊन खाँसाहेब गुलाम अलींनीं त्यांना कडकडून मिठी मारली; आणि पुण्यतिथिसारख्या कार्यक्रमांत केवळ नाममात्र वर्णी लावायच्या उद्देशानें आलेल्या गुलाम अलींना, आपल्या पतियाळा घराण्याची शान राखण्याकरितां तब्बल एक तासपर्यंत ‘ शुद्ध सारंग ’ आळवावा लागला.

* * *

फाल्गुन पौर्णिमेच्या पूर्ण प्रकाशाशीं स्पर्धा करणाऱ्या चौदा वातींच्या लामण दिव्याच्या झगझगीत प्रकाशांत " नमीला हो गजवदन " ह्या नमनानें चंद्रावळ सुरू होते.

पांच सहा घुमटें, दोन समेळ, कांसाळें, ट्रायंगल, मृदंग आणि वाद्यांच्या साजाची एकतानता होऊन संथ लयींत ' सवारी ' सुरू होते. उत्सवासाठीं केवळ घुमट वाजवण्याच्या उमेदीनें मुद्दाम आलेला पाहुणा वादक आपलें कसब दाखवण्याकरितां त्यांतल्या त्यांत हळूच एक मुखडा मारून, परान घेऊन समेवर येतो. दैववशात् त्याचा तो मुखडा चुकतो. कदाचित् सवारी-सारख्या पंधरा मात्रांच्या अवघड तालांत त्याची परान बरोबर येत नाहीं. इथें गांवकरी नाराज होतात. पाहुण्याच्या बाजूचे आणि इतर ह्यांच्यांत वाद सुरू होतो, आणि साहजिकच दोन पक्ष निर्माण होतात. त्या दोन पक्षांचा वाद मिटत नाहीं. तो हळुहळू विकोपाला जातो. आणि अशा वेळीं शहाणीं सुज्ञ माणसें ' उद्यां सकाळीं खांप्रूमामांना बोलवून वाद मिटवून टाकूं ' असें तात्पुरतें समाधान करून वादनांत खंड पडूं देत नाहींत. दुसऱ्याच दिवशीं दुपारपर्यंत खांप्रूमामा गांवांत येतात. त्यांच्यापुढें कैफियत मांडली जाते; आणि लयब्रह्मांत विलीन झालेल्या त्या खलिफानें जो निवाडा दिला, तो सर्वमान्य होऊन आनंदांत उत्सव पुढें चालू राहातो.

अशाच एका प्रसंगीं माझ्या लहानपणीं मीं खांप्रूमामांना पाहिलें. डोक्यावर करड्या रंगाची टोपी, बंद गळ्याचा कोट, धोतर आणि कोल्हापुरी चपला असा त्यांचा साधा वेष; परंतु त्यांना पाहातांक्षणींच लक्ष वेधून घेत त्या त्यांच्या झुपकेदार शुभ्र मिशा. नादब्रह्माच्या धुंदींत विलीन झालेले त्यांचे अर्धोन्मीलित डोळेच ते अध्ययनाच्या कैफांत असल्याची साक्ष देत.

मडगांवीं शिक्षणासाठीं असतांना श्री. विश्वंभर पर्वतकर ह्यांच्या तबला-वादन विद्यालयांत मी अधून मधून जात असें. एक दिवस सकाळीं आपल्याबरोबर खांप्रूमामांना घेऊन जातांना मीं विश्वंभरांना पाहिलें. विश्वंभरांनींहि संधि साधून हळूच एका बाजूला घेऊन, कानांत खांप्रूमामा आज संध्याकाळीं ७ वाजतां विद्यालयांत कांहीं लयकारीचे प्रकार

दाखवणार असल्याचें सांगितलें. अत्यंत हुरहुरीनें, दिवस मावळायच्या आधींच मी विश्वंभरांच्या विद्यालयांत जाऊन बसलों. बऱ्याच रसिक मंडळींच्या उपस्थितींत बरोबर सात वाजतां कार्यक्रमाला सुरुवात झाली. बोरकरांनीं पेटीवर लेहरा धरला; विश्वंभरांनीं धिम्या त्रितालाचा ठेका धरला, आणि खांप्रूमामांनीं लयकारीचे अनेक प्रकार दाखवायला सुरुवात केली.

पांच ' धा ' चा चक्रताल, सात ' धा ' चा चक्रताल, आठ, नऊ, दहा, पंधरा वीस, असें करतां करतां तीस आणि चाळीस ' धा ' चे चक्रताल त्यांनीं म्हणून दाखवले. सम–विषम मात्रांची भरती, वजाबाकी, गुणाकार, भागाकार इत्यादि गणिती प्रकारहि त्यांत दाखवले गेले. हा झाला लयकारीच्या हिशेबाचा आणि अंदाजाचा प्रकार; परंतु दिङ्मूढ करून टाकणारी अशक्य अशी दुसरी गोष्ट त्यांनीं दाखवली, ती म्हणजे स्वतः तबला घेऊन तोंडांत चौदा मात्रांचा चौतालाचा बोल आणि हातानें तबल्यावर १६ मात्रांचा त्रितालाचा बोल वाजवून, दोन्हीहि एकाबरोबर समेवर आणले. शिवाय लांबलचक असा त्रिपल्लवींतला एक चक्रताल तोंडानें उलट्या क्रमांकानें म्हणून, हातानें तो ज्या वेळीं सरळ क्रमानें वाजविला, त्या वेळीं मात्र ह्या एका महान् आश्चर्याबद्दल पारावार राहिला नाहीं. मंत्रमुग्ध होऊन त्या महान् तपोनिष्ठ विद्वत्तेपुढें मस्तक नम्र झालें. तशी ती किमया आजतागायत हिंदुस्थानांत कुणीं केलेली नाहीं. कदाचित् तशी ती होऊंहि शकणार नाहीं. कारण खांप्रूमामांसारखे चिन्मात्रस्वरूप कलावंत शतकांतून एकदांच जन्माला येतात; आणि त्यांच्याबरोबरच त्यांची असामान्य कलाहि अस्तंगत होते.

' पर्वत ' हें गोमंतकाचें कसल्याच आधुनिक सुखसोयी नसलेलें माथेरान. त्या पर्वताच्या माथ्यावर चंद्रेश्वराचें स्वयंभू लिंगाचें एक छोटेंसेंच देऊळ आहे. त्या देवळाच्या आसमंतांत असलेलीं सोळा-सतरा कौलारू घरें, हीच त्या गांवची वसाहत. जीवनोपयोगी वस्तूंसाठीं इथल्या लोकांना चार मैल वांकड्या तिकड्या रस्त्यानें खालीं पारोडें गांवांत उतरून यावें लागतें; परंतु इथल्या प्रत्येक घरानें श्रीचंद्रेश्वराच्या कृपेनें असामान्य असे, गोमंतकाचें

नांव दिगंत गाजवणारे कलावंत दिले. विख्यात गायिका दुलबाई पर्वतकर इथल्याच, मोगुबाई कुर्डीकर ह्याच आसमंतांतल्या, हरिश्चंद्रमाम उत्तम पखवाजी होऊन गेले. शांबामाम, रघुवीरमाम, बाळकृष्णमाम ह्यांनीं सारंगीसारख्या निराकार वाद्यांतलें नैपुण्य दाखवलें. चालू पिढींतले दत्ताराम पर्वतकरांसारखे सारंगींत नांव घेण्यासारखे कलावंत पर्वतावरचेच.

खांप्रूमामांचा जन्महि इथेंच झाला. त्यांचें खरें नांव लक्ष्मण; परंतु त्यांच्या मातोश्रींनीं त्यांना लाडिकपणानें ठेवलेलें खांप्रू हें नांवच पुढें प्रचारांत राहिलें. पूर्वायुष्यांत खांप्रूमामांनीं सारंगीच वाजवली. सारंगी वाजवणारा असा त्यांच्या शिष्यगणहि होता. सारंगीशिवाय खांप्रूमाम अर्थातच गाणें, तबला, पखवाज ह्यांतहि निष्णात होते. परंतु पुढें ह्या लयकारीच्या हिशेबाच्या नादीं लागून त्यांनीं इतर सर्व विषय सोडून दिले आणि नादब्रह्मांत त्यांनीं स्वतःला गुरफटून टाकलें. एक मध्य लय व्यायची, त्याची निम्पट, पावपट, अर्धी मात्रा, पाव मात्रा, पाऊणपट, सव्वा, दीड, पावणदोन असें करतां करतां होतील तेवढे लयीचे प्रकार करण्यांत ह्या तपस्व्यानें देह वेंचला. त्या नादब्रह्मांत ते इतके विलीन झाले, कीं त्यांची शुद्ध-बुद्ध हरपली; भूक-तहान नाहींशी झाली. आंघोळीला म्हणून जात तिथें एखादा हिशेब सुचे; आणि अंग पुसल्याशिवाय नग्नावस्थेंत बेभान बाहेर येत. व्यसन एकच, तें म्हणजे तालाचा हिशेब. मांडीवर, छातीवर, मस्तकावर जियें सुलभ असेल तिथें हातानें ताल धरून मात्रा भरत बसणें हाच एक दिनक्रम ठरला.

पावणे सोळा मात्रांचा ‘ परब्रह्मताल ’ ही त्यांची ‘ एकमेवाद्वितीय ’ अशी निर्मिति. हा ताल त्यांनीं अष्टांगपरिपूर्ण केला. ह्या पावणेसोळा मात्रांच्या तालांत त्यांनीं १२५ ‘ धा ’ असलेली ‘ महासुदर्शन ’ परान ही तालशास्त्रांतली अत्यंत कठीण अशी परान बांधली. ती ऐकल्यानंतर मरहूम खाँसाहेब अलादिया खाँ ह्यांनीं त्यांना ‘ लयब्रह्मभास्कर ’ ही पदवी देऊन त्यांचा जाहीर सत्कार केला. गोमंतकीयांनींहि त्यांचा सत्कार करून त्यांना ‘ तालकंठमणी ’ ही पदवी दिली होती.

त्यांना हजारों मुखडे पाठ होते. स्वतः त्यांनीं शेकडों गती, तोडे, परानी बांधल्या. त्यांच्या तालांच्या प्रकारांबद्दल सांगायला लागलों, तर

महाभारताएवढा ग्रंथ लिहावा लागेल. कुणीं एखादा मुखडा किंवा बोल मागितला तर प्रेमांत येऊन त्याला चार शिकवीत, त्याला समजावून देऊन तें त्याच्या गळीं उतरेपर्यंत श्रम करीत; आपलें ज्ञान कुणी चोरील, अशी संभ्रांत अवस्थाच नव्हती. ज्यानें मागितलें त्याला मुक्त मनानें दिलें, असे उदार मनाचे ते दाते होते.

आपल्याच गुंगींत असलेला हा तपस्वी कुठल्याहि कार्यक्रमांत श्रद्धायुक्त अंतःकरणानें मान खालीं घालून बसलेला असे. कुणाचा दुस्वास नाहीं, मत्सर नाहीं, मत नाहीं कांहीं नाहीं. आपल्याच धुंदींत, आपल्याच कैफांत. एकदां पुण्याला एका मैफलींत एका प्रख्यात सतारियाचें वादन चालू होतें. त्याच्या साथीला एक नामवंत तबलजी होता. वादन रंगांत चालू असतांना मध्येंच एक अवजड असा तोडा वाजवून तिय्या घेऊन तो सतारिया समेवर आला तेव्हां टाळ्यांचा कडकडाट झाला. तबलजीसहि स्फुरण आलें; आणि त्यानेंहि एक चक्रताल वाजवून तिय्या घेऊन तो समेवर आला. पुन्हा टाळ्यांचा दुप्पट कडकडाट झाला; परंतु कोंपऱ्यांतून उठून उभ्या राहिलेल्या एका व्यक्तीनें मोठ्यानें ओरडून म्हटलें, "यह गलत बजाया गया है, फिर से बजाइये!" तबलजीला वाटलें हा कुणीतरी वेडा असावा; तरी पण त्याच्या समाधानासाठीं त्यानें फिरून तोच चक्रताल वाजवला. तेवढ्यानेंहि त्या व्यक्तीचें समाधान झालें नाहीं. पुन्हा तो ओरडला, "ये भी गलत है! फिरसे!"

आतां मात्र तो तबलजी भडकला आणि त्यानें तुच्छतेनें विचारलें, "ये कौन है भाई?" परंतु संचालकांनीं तबलजीला समजावणी देऊन पुन्हा वाजवायला सांगितलें. ह्या वेळीं तो तबलजी जरी थोडासा बरोबर आला तरी तेवढ्यानें समाधान मानून आणि रंगतीच्या कार्यक्रमाचा बेरंग होऊं नये म्हणून तो इसम गप्प आपल्या जागेवर बसला. मागाहून तो तबलजी आणि सतारिया दोघेहि त्या व्यक्तीच्या जवळ जाऊन त्यांनीं आपल्या चुकीबद्दल खुलासा मागितला. त्यानें वाजवलेला तोच बोल ताल धरून बरहुकूम जेव्हां त्या व्यक्तीनें समेवर आणून दाखवला आणि त्याची

चूक दाखवून देऊन आपलें नांव सांगितलें, तेव्हां भरसभेंत त्या तबलजीनें ज्यांचे पाय धरले ती व्यक्ति म्हणजे खांप्रूमाम होती.

असे एक ना दोन अनेक प्रसंग सांगतां येतील. खाँसाहेब तिरखवाँसारखे ख्यातनाम कलावंतहि त्यांच्यासमोर नतमस्तक होत. 'यंग इंडिया कंपनीनें' कांहीं ध्वनिमुद्रिका घेऊन खांप्रूमामांना अमर करून ठेवलें तेवढेंच. बाकी त्यांचें तालाबद्दलचे, केवळ शब्दांनीं व्यक्त करणें अशक्य असलेले अगाध सिद्धांत आणि हिशेब हे त्यांच्याबरोबरच अस्तंगत झाले.

★★
★

मराठी ग्रंथ सं... स्थळप्रत.
अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... नों: दि: ...



## प्रतिभावंत चित्रकार
# दीनानाथ दामोदर दलाल

कलाक्षेत्रांतल्या एखाद्याच विषयांतलें नैपुण्य दाखवून आश्चर्याचा धक्का देणारे अनेक आहेत; परंतु वास्तववादी चित्रकलेपासून नवचित्रकलेपर्यंत आणि टीकाव्यंग्यादि चित्रांपासून अस्सल व्यापारी चित्रकलेपर्यंत चारी वाटा तेवढ्याच ठसठशीतपणें हाताळणारे, किंबहुना त्यांत वेगळाच सांप्रदाय निर्माण करणारे दीनानाथ दलालांसारखे चित्रकार शतकांत एखादेच ! व्यवहारचातुर्य, प्रतिभा आणि चित्रकला ह्या त्रिगुणांचा संगम असलेला दलालांसारखा कलावंत आतांपर्यंत तरी माझ्या पाहण्यांत नाहीं. अशा कित्येक महाराष्ट्रीय प्रकाशन-संस्था असतील कीं ज्या दलालांच्या सहकार्यानें पुढें आल्या. कित्येकांना दलालांनींच हात धरून पुढें आणलें. असा एकहि यशस्वी संपादक नाहीं कीं ज्यानें दलालांचें सहकार्य घेतलें नसेल. " अमृतातेंहि पैजा जिंके " अशा मराठी भाषेच्या कथा, कादंबरी आदि वाङ्मय-प्रकारांच्या मूर्ति घडविल्या महाराष्ट्र-सारस्वतांनीं; परंतु त्यांना

दलालांनीं असा ‘ साज ’ चढविला कीं ज्या ‘ साजाबद्दल ’ साहित्यसम्राट् तात्यांसाहेब केळकरांनीं देखील तृप्त मनानें मस्तक डोलवावें !



**तीन मैत्रिणी**


राष्ट्रपतींचें रौप्यपदक मिळालेलें चित्र

दलालांनीं जें आजचें हें हेवा करण्यासारखें घवघवीत यश मिळविलेलें आहे तें सहजसुलभ मुळींच नाहीं. कला ही ईश्वरी देन खरी, परंतु तेवढ्या त्या ईश्वरी देणगीवरच दलाल थांबले नाहींत. दिवसाचे सोळा-सोळा, कधीं अठरा-अठरा तास त्यांनीं काम केलेलें आहे, अजून करतात. हातांत घेतलेलें काम आपल्या मनासारखें झालें आणि आपण संतुष्ट झालों एवढ्यावरच आजचा कलावंत विसंबून राहूं शकत नाहीं. त्याला गिऱ्हाईक संतुष्ट होईल कीं नाहीं, ह्याची काळजी वाहावी लागते. व्यक्ति तितक्या प्रकृति आणि प्रकृति तितकींच मतें ( अर्धवटांचींहि जमेस धरून ), ह्या सर्वांनाच खूष ठेवणें महा कठीण; परंतु दलाल त्याला पुरून उरलेले आहेत; आणि पुढच्यांना त्यांनीं वाटा मोकळ्या करून ठेवलेल्या आहेत.

वास्तववादी अशा एखाद्या चित्रांत ते अशी मांडणी आणि रंगसंगती दाखवितील कीं एखादा घरंदाज आणि भरतीदार गायक दरबारी कानड्याची अस्ताई मांडतो आहे किंवा दिनदर्शिकेवरील एखाद्या चित्रांत बडे गुलाम अलींच्या नजाकती ठुंबरीचाच भास व्हावा.

एकदां मी आणि व्यवसायानें चित्रकार असलेला माझा एक जाणकार मित्र वृत्तपत्रांच्या एका दुकानापाशीं उभे राहून सहज समोरचीं नियतकालिकें पाहात होतों. एका सचित्र साप्ताहिकाच्या पहिल्याच पानावर उजव्या हाताला एक पोलीस एका वात्रट पोराचा कान पिरगाळीत आहे असें

दाखविलें होतें. एवढेंसें लहान स्केच, परंतु त्यांत सर्व भाव सूचक रेषांत दाखविण्यांत चित्रकारानें कमाल केलेली होती. कान पिरगाळल्यामुळें कळवळलेलें तें मवाल्यासारखें दिसणारें वात्रट पोर, कणखर आणि राकट असा मिशाळ पोलीस, त्याला पोषक असें वातावरण, सर्व कांहीं ह्या एक-कॉलमी चित्रांत होतें. माझा तो चित्रकार मित्र धुंद झाला; आणि बेभान होऊन म्हणाला, " आंतड्याला पीळ पडतो असं कांहीं पाहिलं म्हणजे!" तेवढ्या त्या स्केचसाठीं त्यानें तो अंक विकत घेतला. निरखून आम्हीं खालची सही पाहिली. अगदीं सुपरिचित नांव होतें तें–" दलाल "



**अभ्यंग-स्नान**

अमृतसरच्या सुवर्णपदकाचें

मानकरी चित्र

पुढें मागें आपण एक प्रतिभावंत लौकिकवान् चित्रकार होऊं अशी पुसटशी देखील कल्पना वयाच्या सोळाव्या-सतराव्या वर्षापर्यंत दलालांना नव्हती.

सत्य, न्याय, नीति, सदाचार ह्या ब्रह्मविद्येतल्या चार निष्ठांना भजून 'ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें' अशा श्रद्धेनें नेटका प्रपंच करणारीं जीं कांहीं घराणीं गोमंतकांत होतीं, त्यांतलेंच एक दलालांचें घराणें. पहिल्या महायुद्धांतल्या अस्त्रांनीं ब्रह्मविद्येतल्या त्या चारहि निष्ठांचा प्रथम नाश केला आणि त्यामागून जी सांथ आली तिनें घराण्यांच्या संहाराचा सपाटा चालविला. तिनें नेणती अशी पिढीच्या पिढी पोरकी करून ठेवली. हें पाप आहे, हें पुण्य आहे ह्याची शिकवण देणारा त्राता कुणी राहिला नाहीं. जो तो आपल्यापुरतें बघायला लागला.

त्यानंतरचा काल हा मंदीचा काल. ह्या मंदीच्या कालांत ‘ उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती ’ असें एक उलटें समीकरण ठरून गेलें; आणि चार बुकें शिकून केवळ कुटुंबाच्या भरणपोषणासाठीं मिळेल त्या ठिकाणीं ज्याला त्याला नोकरीच्या शोधार्थ बाहेर पडावें लागलें. समजायला लागल्यापासून दलालांच्या समोरहि हाच आदर्श होता, साधारण प्रतिष्ठित अशा नोकरीला आवश्यक असलेली, पोर्तुगीज विश्वविद्यालयाची तिसरी परीक्षा दिली कीं त्यांचें ध्येय ठरलेलेंच होतें. त्या काळांतला मोठ्यांतला मोठा पगार त्यांनाहि मिळणार होता. आईच्या मायेची पांखर दैवानें अकालीं झडप घालून काढून घेतली आणि मायेसाठीं आशेनें पुढें केलेला हात, आप्तेष्टांनीं झिडकारून मन मानेल तसा अपमान केला. आतां स्वतंत्र होऊन त्यांचा सूड उगवितां येण्यासारखा होता. ज्या वयांत, वयाला शोभेल असें उदंड हुंदडायचें, पोटभर जेवायचें आणि गाढ झोंपायचें, त्या वयांत अपमानांनीं घुसमटत कसेबसे दोन घांस खावे, आणि आयुष्याच्या चिंतेनें जाग्रणें घडावीं, असे दुर्धर प्रसंग जे तारुण्याच्या प्रारंभींच दलालांनीं भोगले त्यांचा आतां स्वतंत्र झाल्यावर मागमूसहि राहणार नव्हता. परंतु दलालांचें तें स्वप्न तिथेंच विरलें. कारण एका थोर सत्याकडे त्यांच्या आयुष्याला वळायचें होतें.

त्याचें असें झालें : पोर्तुगीज विश्वविद्यालयांत असतांना आवश्यक विषय म्हणून त्यांना कांहीं चित्रें काढावीं लागत. त्या विषयाच्या अधिकाऱ्यांना दलालांच्या हातांत एक विलक्षण चमक असल्याचें आढळून आलें. विद्यालयांत लावण्यासाठीं म्हणून त्यांनीं त्या वेळीं दलालांजवळून कांहीं आदर्श पुढाऱ्यांचीं चित्रेंहि काढून घेतलीं आणि त्यांच्या ह्या गुणांचें ठिकठिकाणीं कौतुक होऊं लागलें. तरीपण आपण चित्रकार व्हावें असें दलालांच्या स्वप्नांतहि नव्हतें. “ मीं ह्या चित्रकलेच्या क्षेत्रांत जवळजवळ ढकलला गेलों. ” असें केव्हां केव्हां दलाल म्हणतात ! विश्वविद्यालयाचीं तीन वर्षें पुरीं झालीं होतीं. पुढें काय ? हा प्रश्न आ वासून उभा होता. परंतु “ तूं चित्रकला शीक, त्यांतच तुझें कल्याण आहे. ” असें दलालांच्या मित्रांनीं आणि त्या विश्वविद्यालयाच्या अधिकाऱ्यांनीं दलालांच्या मागें सारखें टुमणें लावलें; आणि सर्व हितचिंतकां-

ऱ्या एकसारख्या होणाऱ्या आग्रहाला बळी पडून चित्रकला शिकण्यासाठीं दलाल मुंबईंत आले. म्हणजे ज्या स्वप्नाशीं ते गुंजन करीत होते तें स्वप्न अर्थातच ध्येय-स्वप्नच राहिलें होतें, आणि अचानकपणें, स्वप्नींहि नसलेली अशी नवी कलाटणी आयुष्याला मिळाली होती. परंतु ह्या अकल्पित कलाटणींतहि ते रंगले. पांच वर्षांचा अभ्यासक्रम त्यांनीं तीन वर्षांतच पुरा केला. त्यासाठीं अविश्रांत श्रम केले. दिवसां नोकरी केली, रात्रीं अभ्यास केला, सुटीचा दिवस मोफत घालवला नाहीं; आणि स्कूल ऑफ आर्टचा जी. डी. आर्ट हा डिप्लोमा मिळविला.

दलालांच्या स्वभावांत एकप्रकारची जिद्द आहे. कुठलीहि गोष्ट करायची असें एकदां मनानें घेतलें कीं ती पुरी होईपर्यंत त्यांना तहानभूक नाहीं, करमणूक नाहीं, झोंप नाहीं. त्यामुळें स्वभावांत थोडा एकांगीपणाहि आहे. एखाद्याबद्दल मनांतल्या मनांत त्यांनीं जें मत बनवून ठेवलें तें काळ्या दगडावरच्या रेघेसारखें; आटोकाट प्रयत्न करूनहि त्यांत बदल व्हायचा नाहीं.

क्रिकेट हा त्यांचा अत्यंत-अत्यंत आवडता खेळ. जगांत कुठेंहि सामना चालू असूं दे, दलालांना त्याची बित्तंबातमी असते. आकाशवाणीवर त्याचें ध्वनिक्षेपण चालू असलें कीं कांहीं विचारूं नका. सारें, सारें विसरून जणूं आपल्या डोळ्यांसमोर तो खेळ चालला आहे अशा तंद्रींत दिवसभर ते असतील. एकदां त्यांच्या एका स्नेह्यानें बराच वेळ त्यांच्याकडे बसून तो खेळ ऐकला; आणि मग सहज विचारलें, " आउटसाइड दि ऑफ स्टम्प म्हणजे काय हो ? मघांपासून हाच एक शब्द ऐकतोंय् मी ! "

" म्हणजे तुम्हांला क्रिकेट कळत नाहीं ? " (' शी शी ! किती अज्ञानी आहांत तुम्हीं ! ' अशा अर्थानें) दलालांनीं वरील वाक्य उच्चारून त्याच्याकडे पाहिलें. तो माणूस बिचारा ओशाळला; परंतु दलालांनीं त्याला ओशाळूं दिलें नाहीं. हातांत कागद-पेन्सिल घेऊन, नकाशा काढून, तिथें माणसें उभीं करून, क्रिकेट ह्या खेळांतील सर्व सांकेतिक शब्द,—सीमेपासून मृत्युबिंदूपर्यंत—त्याला समजावले. मागाहून—मुंबईंत एक फार मोठा नामांकित संघ आला असतां—दुर्मिळ असलेलें तिकिट काढून, त्या गृहस्थाला तो खेळ दाखवायला ते घेऊन गेले असेंहि मला समजलें.

त्यांचा आवडता पक्ष जिंकला कीं देवांनीं असुरांना जिंकल्याचा आनंद त्यांच्या मुखावर दिसेल. . .

ढोंगीपणाबद्दल त्यांना विलक्षण तिटकारा. तो उघड उघड प्रदर्शित केल्यानें संबंध दुरावतात ह्याचीहि पर्वा नाहीं; आणि " हवे तरी देऊं कांसेची लंगोटी। नाठाळाच्या काठी देऊं माथां। " अशीहि वृत्ति आहे. मनासारखें झालें नाहीं म्हणजे स्वभाव चिरचिरा. डॉक्टरांनीं फक्त चारच औंस अन्न खा म्हटलें कीं 'धर्माच्या कांट्या'वर तोलून खातील. सव्वाचार औंस होणार नाहीं. असा जरी त्यांचा स्वभाव असला तरी तो त्यांच्या स्वतःपुरता आहे; इतरांना त्याचा संपर्क व्हायचा नाहीं. आपल्या कुटुंबियांवर देखील त्यांचे कसलेच निर्बंध नाहींत. पण ह्या एकांगी स्वभावामुळें त्यांना एकप्रकारें फायदाहि झालेला आहे. त्यांच्या अंवतींभंवतीं कितीहि माणसें असू देत, कुठल्याहि विषयाच्या गप्पा चालू देत, दलाल गप्पांतहि रंगतील आणि रंगांतहि रंगतील.

दलालांची शैली स्वतःची आणि स्वनिर्मित अशी. कांहीं तरी वेगळें करायची मुळांतच वृत्ति, त्यामुळें ते कुठल्याहि परंपरेचे पथिक झाले नाहींत; आपली परंपरा मात्र निर्माण केली. कथाकादंबरीच्या मुखपृष्ठांमध्यें आमूलाग्र क्रांति घडविणारे पहिले चित्रकार दलाल. एखाद्या पुस्तकाचें दलालांनीं चितारलेलें मुखपृष्ठ त्या पुस्तकाच्या अंतरंगाच्या दर्जाबद्दल नेहमींच भ्रमांत टाकतें. वाङ्मयांतल्या त्या त्या विषयाला धरून आशयांतील संकेताच्या अभिव्यक्तीची योग्य जाणीव ठेवून, रचना, रंगसंगती, प्रमाणबद्धता व नावीन्य ह्या गुणांनीं युक्त अशीं मुखपृष्ठें त्यांनींच निर्माण केलीं. गेल्या वीस वर्षांत दलालांनीं चितारलेल्या निव्वळ पुस्तकांच्याच मुखपृष्ठांची संख्या हजाराच्यावर सहज जाईल. विज्ञान, काव्य, शास्त्र, इतिहास, प्रवासादि पुस्तकांच्या मुखपृष्ठांवर कालानुक्रमानें, जुन्या-नव्या चित्रकलेचा योग्य उपयोग ज्या कुशलतेनें दलालांनीं केला आहे, त्याकडे नुसतें ओघवतें जरी पाहिलें तरी एखाद्या होतकरू विद्यार्थ्यांच्या दृष्टींत विशालत्व येईल.

श्री. अनंत काणेकरांचें प्रवासवर्णनाचें पुस्तक, श्री. गंगाधर गाडगीळांचें प्रवासवर्णनाचें पुस्तक आणि श्री. पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे ह्यांचें

' अपूर्वाई ' हें प्रवासवर्णनाचें पुस्तक अशीं हीं तीन एकाच विषयावरचीं पुस्तकें; पण दलालांनीं ह्या तिन्ही पुस्तकांचीं वेष्टनें अशा वेगवेगळ्या शैलीनें केलेलीं आहेत कीं त्यांतून खुद्द लेखकांच्या शैलीचें वैशिष्ट्य, तसेंच प्रकृतीची अभिव्यक्तीहि जाणवते.

अक्षररचनेंत नावीन्य दलालांनींच आणलें; आणि सज्जन समव्यवसायी ही गोष्ट मुक्तमनानें मान्य करतात. कथाचित्रांच्या बाबतींत देखील असेंच म्हणतां येईल. ' ड्रायब्रश ', ' कटस्कीन ', ' हाफटोन ', ' मिडल्टोन ', ' इचिंग ', ' स्क्रेपरबोर्ड ' आदि तंत्रांचा उपयोग योग्य जागीं करून साध्या सजावटींतहि त्यांनीं नित्यनवीनताहि दाखविली.

वार्षिकाची परंपरा त्यांनींच निर्माण केली. गेलीं सतरा वर्षें रसिक महाराष्ट्रीय तसेंच हिंदीभाषी त्याची आतुरतेनें व एका वेगळ्या अपेक्षेनें वाट पाहतात.

चित्रकलेंत दलालांनीं जेवढें निर्माण केलें त्याला तुला नाहीं. इतकेंहि करून एखाद्या नव्या प्रदर्शनांत व्यवसायपरत्वें चित्र पाठवितां आलें नाहीं, तर हा गृहस्थ हळहळतो. कलेच्या प्रांतांत इतका निगर्वी माणूस माझ्या पाहण्यांत नाहीं. समव्यावसायिकांबद्दल विलक्षण आदर; त्यांतल्यात्यांत चित्रकार बेंद्र्यांबद्दल विशेष. ' मला विचारांत टाकणारी शैली फक्त एकच–बेंद्र्यांचीं–' असें मोठ्या आदरानें बोलतील.

" दलाल, तुमचं भावी ध्येय काय ? " असा एखादा जिज्ञासेचा प्रश्न खेळकरपणें मी त्यांना विचारतों. मग ते लगेच गंभीर होतील आणि विस्तारानें खुलासा करतील.

" हें बघ, ध्येय, कला असले प्रचंड शब्द उच्चारून मला बुचकळ्यांत टाकूं नकोस. ' कलेसाठीं ', ' ध्येयासाठीं ' असले दांभिक शब्द माझ्यापाशीं नाहींत. मी जें हें सारें करतों तें केवळ योगक्षेमासाठीं. त्यासाठीं जेवढीं सोंगं करावीं लागतात तेवढीं करतों. त्यांतूनहि माझ्याकडून कांहीं कला निर्माण झाली असं तूं म्हणशील तर ती ईश्वराची दया असं म्हटलं पाहिजे. कांहीं तरी घडावं म्हणून मीं कांहीं एक निर्मिति केलेली नाहीं. तशी निर्मिति करणारे लोक निराळे आहेत. आतांपर्यंत मीं जें कांहीं केलं–ज्याला

तूं संप्रदाय निर्माण झाला असं म्हणतोस–तें कुणींतरी माझ्याकडून रेटून करून घेतलं म्हणून.

"कांहीं तरी भरीव असं करावं असं मला नेहमींच वाटत आलेलं आहे. अगदीं मनापासून तें वाटत आलेलं आहे. ज्या ईश्वराच्या दयेनें हें आतांपर्यंत घडलं तसंच तें पुढेंहि घडेल ! त्याचीच इच्छा ! पुढें काय होईल हें कुणीं सांगावं ?"

दलालांचे हे अति विनयी उद्‌गार कुणाचीहि अहंमन्यता छेदून टाकतील.

त्यांच्या मांडणींत, रंग-रेषेंत एक प्रकारची लयबद्धता आहे. विशाल अनुभवाचें गांठोडें पाठीशीं असल्यानें त्यांच्या प्रत्येक कलाकृतींत चतुरंगता आलेली दिसते. व्यवस्थित आणि घराणेदार अशी गायकी मिळालेला गळा मुष्किल अशा गायकीचा आविष्कार करून रसिक ज्ञात्यांना जसा चकितहि करतो आणि तृप्तीची दादहि घेतो, तसेंच दलालांच्या आलेखनाचें आहे. जाणत्या आणि नेणत्या रसिकांना, दोघांनाहि समाधान देण्याची ताकद त्यांच्यांत आहे. अमृतसरचें सुवर्णपदक, राष्ट्रपतींचें रौप्यपदक आणि कला-संस्थांकडून मिळालेलीं कित्येक पारितोषिकें आणि प्रशस्तिपत्रें हीं त्याची साक्ष आहे.

कलेंतली अंतर्मुख अशी अनुभूतींची जाणीव त्यांना झालेली आहे. जीवनाचें ज्ञान अत्यंत प्रामाणिकपणें त्यांनीं गोळा केलेलें आहे. त्यामुळें त्यांचा स्वभाव कपटी नाहीं. विशेष असा आहे तो भिडस्तपणा. ह्या भिडस्तपणामुळेंच कित्येक वेळां असे नुकसानकारक प्रसंग ओढवतात कीं त्यामुळें त्यांची मनःस्थिति पार बिघडून जाते. आणि मग 'होणार तें टळना' अशी स्वतःचीच समजूत घालून दलाल पुन्हा कार्यमग्न होतात.

★★
★



महापुरुष

# उस्ताद अमीर खाँ

गायनाचार्य पं. विष्णु दिगंबर पलुस्करांची पुण्यतिथि मुंबईत ठिकठिकाणीं–जिथें जिथें गांधर्व महाविद्यालयाच्या सांप्रदायाचा वारसा पोंचलेला आहे, तिथें तिथें–साजरी होते. परंतु श्री देवधर ह्यांच्या गायन–वादन विद्यालयांत ती विशेष स्वरूपांत आणि मोठ्या प्रमाणांत साजरी होते. मोठमोठे खानदानी गायक–वादक ह्या पुण्यतिथीच्या उत्सवांत आपली वर्णी लावण्यांत धन्यता मानतात. बाहेर-गांवचा एखादा गुणी आणि कसबी कलावंत एकदम प्रसिद्धीला येतो तो येथूनच. सध्यां आहे त्याहून अधिक वजनदार असें ह्या उत्सवाचें स्वरूप गेल्या पंधरा वर्षांपूर्वी होतें. स्वतः श्री. देवधर जातीनें तीन दिवस आणि तीन रात्री अविश्रांत श्रम करून उत्सवांत कुठलेंहि न्यून राहूं देत नसत आणि मुंबईतल्या जाणकार श्रोत्यांना देखील हे तीन दिवस म्हणजे पर्वणीचे वाटायचे. लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या आजच्या कांहीं गायक–वादकांचें पहिलें कौतुक येथें झालें, असें म्हटलें तर तें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. श्री देवधरांच्या विद्यालयांत ज्या हॉलमध्यें हे कार्यक्रम होतात त्याला लागूनच एक कचेरीवजा चिंचोळी खोली आहे. देवधरांचे, ह्या उत्सवांतले खास पाहुणे, कलावंत आणि इतर प्रतिष्ठित एका लांबटशा टेबलाभोंवतीं पान-

तंबाखूचा समाचार घेत, चहाचे घुटके घेत ह्या खोलींत बोलत बसलेले असत; आणि कार्यक्रमाचें गाडें एकदां सुरळीत वळणाला लागल्याचें पाहून, स्वतः श्री देवधरहि तिथें आपल्या राखीव जागेवर येऊन बसत असत. मग काल झालेल्या कार्यक्रमाबद्दलचीं स्पष्टशीं बरींवाईट मतें आणि मतभेद ह्यांची चर्चा तिथें चालायची. ओठांत जळती सिगारेट बेदरकारपणें ठेवून देवधरहि (हल्लीं त्यांनीं सिगारेट सोडली आहे पण तपकीर धरलेली आहे.) नवे नवे मुद्दे उपस्थित करीत असत. खाँसाहेब विलायतखाँ, अझमतखाँ, खादीम हुसेनखाँ, शिवकुमार शुक्ल, अल्लारखाँ, सतारिये विलायतखाँ, कै. पन्नालाल घोष, अमीर हुसेनखाँ, शमसुद्दीन असे आपापल्या परीनें श्रेष्ठ असे हे कलावंत, चहाचे घुटके घेत बोलत बसलेले असत. त्यांचा एक कान आंत चाललेल्या कार्यक्रमाकडे असे आणि एक कान ह्या बैठकींतल्या चर्चेकडे असे. तसाच एखादा काळजाला स्पर्श करणारा पल्टा अगर तान कानावर आदळली, कीं आंत बसलेले हे उस्ताद, हॉलमध्यें गाणाऱ्या त्या कलावंताला दाद देत, "वा भाई क्या कहनें ? कौन गा रहे है देवधरजी ?" ओठांत असलेली जळती सिगारेट तशीच हालती ठेवून, डोळे किलकिले करून देवधर खुलासा करीत, "अमुक पंडितांचा हा शागीर्द. ह्या उत्सवासाठीं मीं त्याला मुद्दाम बोलावला. बोल-तानेचं अंग जबरदस्त आहे हो ! मुद्दाम लक्ष द्या !" क्षणभर तिथें शांतता पसरे आणि साऱ्या उस्तादांचें लक्ष गाणाराकडे लागे !

अशाच एका प्रसंगीं मीं अमीरखाँना पाहिलें. सहा फुटांच्या आसपास उंची असलेलें त्यांचें भरदार व्यक्तित्व कुणाचेंहि लक्ष चटकन् वेधून घेई. उलटे फिरविलेले किंचित् कुरळे केंस, डोळ्यांवर रिम्लेस फ्रेमचा पंचकोनी चष्मा, अंगांत वुलनची काळी शेरवानी, पठाणी पद्धतीचा लेहॅंगा, असा वेष असलेला हा कलावंत एक कोंपरा गांठून स्थितप्रज्ञासारखा बसला होता. देवधरांच्या विद्यार्थ्यांच्या बोलण्यावरून ते अमीरखाँ आहेत हें माझ्या लक्षांत आलें. आज रात्रीं ते गाणार असल्यानें हॉल अगदीं तुडुंब भरला होता. तेवढ्याच दाटीनें बाहेरहि गर्दी होती. साडेबारा पाऊणच्या सुमाराला अमीरखाँ गायला बसले. दोन तंबोरे आणि तबला ह्यांशिवाय साथीला त्यांनीं दुसरें वाद्य घेतलें नव्हतें, ही गोष्ट विशेष जाणवत होती. मंद्रसप्तकाच्या

निषादावरून ते षड्जावर किंचित् स्थिर होऊन पुन्हा खालीं मध्यमावर येऊन थोडा वेळ तिथें स्थिर झाले आणि धैवत निषादाची प्रेमळपणें चौकशी करीत पुन्हा षड्जाला थांबून, झुमऱ्याच्या अत्यंत ठाय ठेक्यांत त्यांनीं "जिनके मन राम बिराजे" ही मालकंस रागांतली अस्ताई सुरू केली. बुलंद आणि बराच रुंद असा आवाज़, बिलंपत करतांना तिच्या मांडणींत रुक्षपणा येऊं नये म्हणून लयीच्या वजनानें केलेला ढंगदार अशा हरकतीचा वापर, स्वर आंदोलित ठेवून दुसऱ्या स्वरावर जातांना हलक्या आवाजांत घेतलेले खटके वगैरे एकंदर गायकींत निराळेंच नावीन्य वाटलें. श्रोत्यांत बहुसंख्य गायकवर्गच असल्यानें खाँसाहेब अगदीं कसून गात होते. सार्‍या वातावरणांत मालकंस भरून राहिला होता. सभागृहांतला आणि सभागृहा-बाहेरचा श्रोतृवर्ग अगदीं मंत्रमुग्ध झाला होता. कांहींतरी वेगळें आणि निराळ्या प्रकारचें असें संगीत त्याच्या कानावर पडत होतें. सामान्य श्रोता तर तृप्त झालाच होता; पण तिखट कानहि तृप्तीची दाद देत होते. अस्ताई संपली आणि मिरखंडी तानांची आणि तेवढ्याच तयारीची सरगम बोलणारी द्रुत लयींतली चीज जवळजवळ अर्धा तासपर्यंत गाऊन दीड तासानें खाँ-साहेबांनीं बैठक संपवली. दुसऱ्या दिवसापासून गायनप्रेमी लोकांत खाँसाहेब अमीरखाँ आणि त्यांची गायकी हाच एक चर्चेचा विषय झाला होता. कुणाला त्यांची दाणेदार तनाईत आवडली होती; कुणाला त्यांची बिलंपत करायची पद्धत आवडली होती; कुणाला स, र, ग, म, आवडली होती; आणि कुणाला त्यांचें प्रभावी व्यक्तिमत्व आवडलें होतें. एवंच, एक थोर गवय्या म्हणून अमीरखाँ ह्या नांवाचा बोलबाला झाला होता.

केवळ एक मालकंस ऐकून माझ्या मनाची मात्र तृप्ति झाली नाहीं. ह्या गायकाची एक संपूर्ण बैठक ऐकण्याची मला ओढ लागली; आणि बऱ्याच दिवसांनीं ती ऐकायचा योग आला. एका म्यूझिक सर्कलतर्फे लक्ष्मीबागेंत खाँसाहेबांचें गाणें झालें. श्रोतृवृंदहि चोखंदळ होता, त्यामुळें अथपासून इति-पर्यंत बैठक चढत्या श्रेणीची झाली. आपल्या ह्या बैठकींत खाँसाहेबांनीं शुद्धकल्याण, हंसध्वनि, सोहा आणि मालकंस गाऊन, जाणत्यांच्या मनांतल्या थोर कलावंतांच्या यादींत आपलेंहि नांव कोरलें.

त्यांनीं गायलेल्या सोहांतल्या अनाघाती मात्रेनें समेवर येणाऱ्या गोड चीजेची आठवण झाली कीं अजूनहि मन पुलकित होतें. अजूनहि त्यांच्या त्या चीज सुरू करायच्या आधीं उच्चारलेल्या शब्दांची आठवण होते :—

" देखो भाई, ख्याल भी छोटासा, और तान भी छोटीसी ! "

असें सांगून एकदम त्यांनीं त्या एकतालांतल्या छोट्याशा ख्यालाला सुरुवात केली होती. " पिहरवा मोरे आये " ह्या चीजेंतल्या शेवटच्या चरणाच्या आठव्या अक्षरावरून, परंतु नवव्या मात्रेवर सुरू झालेली ती छोटीशीच तान पांचव्या मात्रेवर केव्हां संपते आणि पुन्हा चीजेचा पहिला चरण सुरू होऊन समेचें अक्षर कसें आणि केव्हां येतें हें कळत नव्हतें; पण सारी सभा वारंवार हादरत होती समेवर. माझ्या अंगांत कुठलें धैर्य आलें कुणास ठाऊक, गाणें संपल्यावर मी सरळ खाँसाहेबांजवळ गेलों, आणि मागचा पुढचा विचार न करतां एकदम ती सोहांतली चीज मागितली. माझ्या त्या धैर्याचें त्यांनीं कदाचित् मनांतल्या मनांत कौतुक केलें असावें; कारण ताबडतोब ते म्हणाले होते,

" चीज के बोल चाहिये, तो मैं दे सकता हूँ; मगर ओ छोटी–सी तान भी दो–चार बार समझानी पडेगी । "

एवढें सांगून त्यांनीं मला घरीं बोलावलें होतें, ती चीज सांगितली होती. तान समजावून दिली होती; आणि खूप गप्पा मारल्या होत्या. गाण्यासंबंधीं बोलतांना पहिल्या भेटींत पाहिलेला त्यांच्यांतला थंडपणा कुठल्याकुठें गेला होता. एखाद्या व्याख्यात्यासारखे अनेक उपमा आणि उत्प्रेक्षा देऊन बराच वेळ ते बोलत होते आणि मधूनमधून वेगवेगळे प्रश्न विचारून मींहि त्यांना अधिक बोलके करीत होतों.

आतांपर्यंत खाँसाहेबांच्या अनेक बैठका मीं ऐकल्या आहेत. समारंभ कसलाहि असो, तो एखाद्या छोट्या संगीत विद्यालयाचा असो किंवा एखाद्या मोठ्या संगीत महोत्सवाचा असो, आमंत्रण असलें कीं त्याला मान देऊन, न चुकतां समारंभाला हजर राहायचेंच, त्यासाठीं जरी पदरमोड करावी लागली तरी हरकत नाहीं अशी त्यांची वृत्ति आहे.

" अहो प्रेम नि व्यवहार ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. एखाद्याशीं व्यवहाराच्या बाबतींत कांहीं गोष्टींत आमचं जमलं नाहीं तरी त्याच्याशीं मुळांत असलेल्या प्रेमांत मीं मुळींच व्यत्यय येऊं देत नाहीं. दैवयोगानें व्यवहार कधीं कधीं फिसकटतो; पण त्या रागानें वैयक्तिक संबंधांत दुरावा कां यावा ? कलकत्त्याच्या 'लालाबाबूं'कडे दुर्गापूजेच्या निमित्तानें फार मोठा संगीतोत्सव होतो. दरवर्षीं आम्हांला तिथें आमंत्रण असतं. 'लाला-बाबू' हे एक अत्यंत थोर, सृजनशील तसेच रसिक गृहस्थ ! त्या महापुरुषाच्या स्वभावावर माझं फार प्रेम. त्या वर्षीं व्यवहाराच्या बाबतींत कांहीं त्यांचं-आमचं जमलं नाहीं; पण त्यांच्या त्या संगीत महोत्सवासाठीं मीं मुद्दाम सर्व कामं बाजूला सारून कलकत्त्याला गेलों. लालाबाबूहि चकित झाले. महोत्सवांत कांहीं मी गायलों नाहीं; परंतु बाबूंच्या घरीं माझी खाजगी बैठक झाली. बैठक फारच रंगली. येतांना, आधींच्या फिसकटलेल्या कराराप्रमाणें बाबू मला बिदागी देऊं लागले; परंतु मीं ती साभार नाकारली; इतकंच नव्हे तर पहिल्या वर्गाचा प्रवासखर्च सुद्धां नाकारला. मीं त्यांना एवढंच म्हटलं, कीं 'बाबूजी, तुमचा—आमचा व्यवहार जमला नाहीं, तरी परस्परांवरील प्रेमांत त्याचा व्यत्यय येऊं नये एवढीच माझी इच्छा आहे !' आणि लालाबाबूंचं अंतःकरण भरून आलं होतं." एखाद्या संगीत विद्यालयातर्फे समारंभाच्या निमित्तानें होणाऱ्या संगीत कार्यक्रमांना अनिच्छेनें मला हजर राहावें लागतें. कार्यक्रमहि यथातथाच असतात. माझ्या कल्पनेप्रमाणें अमीर खाँसाहेब हाताची घडी घालून एका बाजूला स्वस्थ चित्तानें बसलेले असतात. मीं जवळ जातों. मीं केलेल्या विचारपुशीला खाँसाहेब मोजकींच उत्तरें देतात. त्यांचे कान आंत चाललेल्या कार्यक्रमांकडे लागलेले असतात. तिथल्या त्या गोंधळानें ते विषण्ण झालेले असतात. आंतल्या व्यासपीठावर चार पांच वाद्यांचा साज घेऊन एका वजनदार रागाची कुणीतरी वेडी-वांकडी चिरफाड करतो आहे; आपण काय करतों आहों ह्याची त्याला स्वतःला तरी जाणीव आहे कीं नाहीं कोण जाणे ! एक गंभीर सुस्कारा सोडून खाँसाहेब बोलूं लागतात—

" ईश्वरी दयेनें ह्याला आवाजाची देणगी चांगली मिळालेली आहे; परंतु हा जो असा वेड्यावांकड्या रस्त्यानें चाललेला आहे त्यांत त्याचा दोष

आहे असं मी मुळींच मानीत नाहीं. खरा दोष त्याला ज्यांनीं मार्गदर्शन केलं, त्यांचा आहे. फार फार वाईट वाटतं मला ! हें काय चाललं आहे तेंच मला कळत नाहींसं झालं आहे ! जुन्या मूल्यांची पूजाच उधळली गेलेली आहे. जितक्या लवकर प्रसिद्धीच्या शिखरावर आरूढ होतां येईल तितक्या लवकर ' येन केन प्रकारेण ' तें सुख मिळविण्याची ह्यांची धडपड पाहिली, म्हणजे मला मोठा धोका वाटतो. खऱ्या गायकीचा अर्थच चालू पिढीला कळलेला नाहीं. जुनं तें चांगलं होतं, आणि नवं तें वाईट आहे, असं म्हणण्याचा माझा मुळींच हेतु नाहीं. उलटपक्षीं नव्यांतलं जें चांगलं आहे त्याची जुन्याशीं सांगड घालून, गाणं जेवढं अधिक सुंदर बनवतां येईल तेवढं तें बनवलं गेलं पाहिजे, असंच मी म्हणेन. घराणं किंवा गायकी ह्यांचा मी मुळींच अभिमानी नाहीं. कुठल्याहि पद्धतीची गायकी असो, ती जो उत्तमपैकीं सादर करतो, श्रोत्यांकडून—तज्ज्ञ नि अज्ञ अशा दोन्हींहि—वाहवा घेतो; जो बहुतांना मानवतो, त्याचा मी अभिमानी आहें. आतां जें कांहीं आंत चाललेलं आहे, तें तुम्हांला पसंत आहे का ? "

" नाहीं. " मीं सरळ उत्तर केलें !

" तसं त्याला सांगितलं तर तें त्याला आवडेल का ? "

" नाहीं, उलट श्रोत्यांनाच तो ' कूड ' अशी पदवी देईल ! " मी म्हणालों.

" खरे ' कूड ' आम्हीं आहोंत ! जे आम्हांला नांवं ठेवतात ते नव्हेत. खऱ्या रसिकाला संतुष्ट करतां येत नाहीं, त्यानें गाणं सोडावं, आणि दुसरा कुठलाहि व्यवसाय करावा. फिल्मी गाणीं लोक मनापासून ऐकतात, आणि शास्त्रीय संगीत ऐकत नाहींत असा एक आक्षेप आहे. त्याचा मूळ गाभा शोधला पाहिजे; आमच्यांतले दोष आम्हीं घालवण्याचा प्रयत्न केला पाहिजे ! महापुरुषाच्या पदवीला पोंचायला जेवढे कष्ट करावे लागतात तेवढे कष्ट एकेका कलावंतानें केले पाहिजेत. स्वार्थ, मत्सर, निंदा ह्या रिपूंना त्यानें थारा देऊंच नये. त्याचं हृदय विशाल सागरासारखं असलं पाहिजे. म्हणजे मग त्याची कलाकृतीहि तेवढीच विशाल आणि तेवढीच दर्जेदार होईल, जी ऐकून ' वा ! सुंदर ! ' अशा उद्गारांनीं लोक भूषवितील ! " बोलतां बोलतां खाँसाहेबांचे डोळे पाणावले होते. पुन्हा एक दीर्घ सुस्कारा

सोडून बसल्या जागेवरून ते उठले होते आणि मग चालकांचे आभार मानून निघून गेले होते.

त्यानंतर ज्या ज्या वेळीं अमीरखाँ मला भेटले त्या त्या वेळीं एक एक प्रश्न करून त्यांच्या संबंधींची थोडीबहुत परिचयात्मक माहिती मीं गोळा केली.

एकदां मीं त्यांना विचारलें होतें—

" खाँसाहेब, आपण किराणा घराण्याचे आहांत का ? "

" नाहीं, मुळींच नाहीं. जो बिलंपत करतो तो किराणा घराण्याचा, असा एक सर्वसामान्य प्रवाद आहे; पण तो खोटा आहे. माझं घराणं ' मियाँ छँगे खाँ 'चं—ज्याला ' इंदौर घराणं ' असं म्हणतात. खरं म्हणजे घराणं ह्या शब्दाची व्याख्या आतां बदलली पाहिजे. ' भारतवर्ष घराणं ' असं एकरूप नामाभिधान झालं पाहिजे. भारतांत जशा अनेक भाषा आहेत तशीच वेगवेगळी गायकी, एवढंच ! परंतु तसं मूळ शोधायला गेलं, तर ज्यानें परंपरा निर्माण केली त्याच्यापासूनच जर घराणं निर्माण होतं, तर पारंपारिक घराण्याचा वृथा अभिमान धरण्यांत काय अर्थ आहे ? बडे गुलामअलींसारखा अत्यंत लोकप्रिय गायक सांप्रदाय निर्माण करूं शकतो, तर गुलामअलि ह्या नांवापासूनच एक नवं घराणं कां मानूं नये ? ह्या घराण्या-बिराण्याच्या भानगडींत आपण पडूंच नये असं मला वाटतं ! "

" परंतु तुम्हांला तालीम कुणाकडून मिळाली हें तरी सांगा. " मीं.

" माझ्या वडिलांकडून, म्हणजे ' शाह मीर खाँ 'कडून. तसं पाहिलं तर माझ्या वडिलांना ' भेंडीबाजारवाले नझिरखाँ ' आणि त्यांचे बंधु ' छज्जो खाँ ' ह्यांनीं तालीम दिली. मग त्यांनीं कुठल्या घराण्याचं नांव सांगावं, हें तुम्हींच सांगा. असो ! माझ्या वडिलांनीं एका विशिष्ट पद्धतीनें माझ्याकडून रियाज करून घेतला. एक तास सकाळीं आणि एक तास संध्याकाळीं, एवढाच मीं रियाज केला. ' लोक ११–१२ तास रियाज करतात तसा मजकडून तुम्ही कां करून घेत नाहीं ? ' असं माझ्या वडिलांना मी विचारीत असें; परंतु ते म्हणत ' बाबा, एका तासानंतर आवाज थकतो आणि तो आपल्या काबूंत राहात नाहीं. लावला गेलेला स्वर स्थिर आहे कीं अस्थिर आहे, सुरांत आहे कीं बेसुर आहे, ह्याचा अंदाज गायकाला राहात नाहीं.

आणि तशी अनेक तासांची मेहनत माणसाला यांत्रिक बनविते. जेवढी मेहनत अधिक तेवढा थकवा अधिक आणि जेवढा थकवा अधिक तेवढा यांत्रिकपणा अधिक. तूं जें काय करतो आहेस त्याकडे माझं लक्ष आहे. अधिक उण्याची तुला गरज नाहीं. मी सांगतों तेवढंच कर!' ह्याहून विशेष खोलांत शिरायला मला धीर झाला नाहीं आणि यथाक्रम माझा रियाज चालू राहिला. वयाच्या दहाव्या वर्षांपासून आठ वर्षे मीं बिलंपतीचा रियाज केला. त्यानंतर फक्त 'सरगम'वर मेहनत केली आणि मागाहून कित्येक वर्षांनंतर मी 'मीरखंडी' तानांकडे वळलों. अशा रियाजामुळें तानेचा आणि त्याबरहुकूम केलेल्या सरगमचा माझा भाव एकच राहतो; त्यांत फरक वाटत नाहीं. ह्यानंतर माझ्या वडिलांनीं मला आपल्याबरोबर खूप फिरवलं. एखाद्या वेळीं चांगला गायलों कीं लोक तारीफ करीत असत; पण वडिलांनीं माझी कधींहि तारीफ केली नाहीं. ते म्हणत 'खरी तारीफ लोकांनीं करावी, आणि लोकांना पटलं तरच ते दाद देतील. मीं चांगलं म्हटलं आणि पाठ थोपटली, तर घरच्याघरीं माझीच पाठ मीं थोपटल्यासारखं नाहीं का होणार? शुद्ध मुद्रा आणि शुद्ध वाणी ह्यांवरहि चांगलं लक्ष दे. देवाच्या दयेनें लोक तुझी चांगलीच तारीफ करतील!' वडिलांचे ते उद्गार अद्याप मला वारंवार आठवतात!"

"ह्या सगळ्या गानप्रपंचांत तुम्हांला कांहीं वाईट अनुभव आले का?"

"छे! छे! मुळींच नाहीं. मी मूळपासून वागतांनाच इतक्या उच्च भूमिकेवरून वागत आलों आहे, कीं दुसऱ्याला त्रास द्यायचा नाहीं व शक्य तों दुसऱ्याकडून स्वतःला त्रास करून घ्यायचा नाहीं अशी माझी वृत्ति असते. त्यामुळें 'तसे' वाईट अनुभव सहसा मला येत नाहींत, नि आलेलेहि नाहींत."

परवां एकदां बोलतां बोलतां ते म्हणाले,

"राहून राहून एका गोष्टीचं मला फार वाईट वाटतं तें हें, कीं सारंगी हा आमचा पुराणा साज, आम्हां भारतीयांचं तें गौरवांकित वाद्य; तें हल्लीं लुप्त होत चाललं आहे. त्याची कदर नाहींशी होत चालली आहे; आणि 'फिडल' ह्या विदेशी वाद्यानें डोकं वर काढलेलं आहे. फिडल वाईट आहे

असं मी म्हणत नाहीं; पण अस्पष्ट होत चाललेल्या आमच्या ह्या मानचिन्हाची शान राखली गेली पाहिजे !"

अमीर खाँचें वय आतां पन्नाशीकडे आलेलें आहे. गेलीं दहा वर्षें लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर असतांना देखील 'तराण्यां'च्या संशोधनाचें कार्य ते करीत आहेत. तराणे अर्थहीन नाहींत, त्यांतल्या प्रत्येक शब्दाला विशिष्ट अर्थ आहे. 'दरा, दरा, दरा, दरतन दरा, तंदर तन (तुंदिर तुन नव्हे) दरा !' 'दरा' म्हणजे दर्शन दे ! असा तो एक जप-सदृश शब्द आहे. 'हे परमेश्वरा, ये, मला दर्शन दे, ये आंत ये, एकवार मला भेट दे. तुझ्या दर्शनासाठीं मी आतुर झालेला आहें; मला तुझं खरं स्वरूप दाखव !' असा त्या शब्दांना अर्थ आहे. पुढें त्याचा अपभ्रंश होत गेला व तराणा म्हणजे अर्थहीन झटापट अशी कल्पना दृढ झाली. 'तंदर'चा 'तानादिर' असा अपभ्रंश झाला. त्याचें शुद्धिकरण व्हावें म्हणून त्यांचें संशोधन चालू आहे.

कायदा संभाळून, जुन्या मूल्यांना नव्या आकर्षक चौकटींत बसवून रसिकांना रुचेल, पचेल अशा पद्धतीनें व्यवस्थित 'अस्ताई' गाणारे जे कांहीं मोजकेच गवय्ये भारतवर्षांत आहेत, त्यांत अमीरखाँचा क्रमांक निश्चित श्रेष्ठ दर्जाचा आहे. कधीं कधीं अवधान सुटून त्यांची अस्ताई बेफाट लांबते. मंद्रसप्तकांतल्या गांधार, मध्यमापर्यंतचा पल्ला, एक तास उलटला तरी ती गांठूं शकत नाहीं. श्रोत्यांना तिचा ताण सहन होत नाहीं; परंतु एकदां का ते मीरखंडी अंगानें फिरूं लागले, कीं श्रोत्यांना स्फुरण चढतें, आणि सारी मैफल चैतन्यानें भरून जाते.

"अनंत राजकारणें धरणें । कुबुद्धि सुबुद्धि विवरणें" अशा ह्या धकाधकीच्या काळांत "एकास एक जपती टपती । शत्रुपणाची स्थिति गती चहूंकडे ॥" असतांना अमीरखाँ चलित होत नाहींत. स्थितप्रज्ञाची वृत्ति त्यांनीं आपल्या अंगीं बाणविली आहे. कुणाचा मत्सर नाहीं, कुणाचा द्वेष नाहीं, कुणाशीं भांडण नाहीं कीं कुणाशीं तंटा नाहीं. आपल्याच तंद्रींत, आपल्याच धुंदींत !

आणि अशाच माणसांना समर्थांनीं "धगधगीत पुण्यराशी । महापुरुष ॥" असें म्हटलेलें आहे.

* * *



## शिल्प-संजीवक
# कामत

‘ कोंकणांत तांदूळ, घाटावर जोंधळा आणि गोमंतकांत कलावंत पिकतो खराच, परंतु ‘ मोठेपणीं होशिल कोण बाबा ’ असा प्रश्न गोमंतकांतील एखाद्या मध्यमवर्गीय लहान मुलाला केला आणि ‘ कलावंत ’ असें त्यानें उत्तर दिलें तर त्या मुलाच्या पालकाला हिरमुसल्यासारखें होतें. त्या मुलाची प्रवृत्ति बहुधा भीक मागण्याची आहे, असाच गैरसमज तो पालक करून घेतो; आणि शक्य तों त्या विचारापासून मुलाला परावृत्त करण्याच्या खटपटीला लागतो.


अशा पारंपरिक भ्रामक संस्कारांना बळी पडून, आपल्या हृदयांतील ‘ कलावंताला ’ ज्यांनीं कठोरपणें फांशीं दिलें असे कैक हाडाचे कलावंत गोमंतकांत सांपडतील. त्यांचा आत्मा कलावंताचा, परंतु त्याचें विकसन मात्र त्यांनीं होऊं दिलें नाहीं; त्याची जोपासनाहि केली नाहीं. निष्ठेनें आणि त्यागानें जे पुढें गेले आणि ज्यांनीं आपलें नांव उजळ केलें, त्यांपैकीं श्री रामचंद्र पांडुरंग कामत ह्यांचें नांव प्रथम श्रेणीचें !

वयाच्या तेराव्या वर्षी शिल्प-संजीवक होण्याचें प्रखर ध्येय उराशीं बाळगून घरांतून पळून जातांना, जगभर कीर्ति गाजेल असा एखादा ‘ सोनियाचा दिवस ’ आपण पाहणार आहोंत, अशी शंका शिल्पकार कामत ह्यांच्या बालमनाला त्या वेळीं कदाचित् आली नसेल; परंतु “ फीर

मार्ग " असा आत-इष्ट टाहो फोडीत असतां " मागेन स्मारगें " अशा ध्रुवाच्या निश्चयानें राम कामतांनीं मुंबईच्या बोटींत पाऊल ठेवलें.

होतकरू, ध्येयवादी अशा मुलांची त्या वेळीं मुंबईत नेहमींच कदर होत असे. मदतीचे हातहि सज्ज असत. लहानपणापासून कामतांना मूर्तिकलेचा नाद होता. गांवांत पूजले जाणारे बरेचसे गणपति कामतच्या हातचे असायचे. मुंबईत आल्यावर आधार म्हणून कामतनीं तोच व्यवसाय पत्करला; आणि शिक्षणासाठीं ' स्कूल ऑफ आर्ट 'मध्यें नांव घातलें.


इतरांपेक्षां कांहीं तरी वेगळें करायची प्रवृत्ति कामत ह्यांच्यामध्यें मूळचीच. त्यामुळें ' स्कूल ऑफ आर्ट 'चे त्या वेळचे प्रिन्सिपॉल कॅ. ग्लॅड्स्टन सालोमन-साहेब ह्यांचे ते लाडके झाले. ' कोळ्याचा मुलगा ', ह्या कामतांच्या शिल्पाला वास्तविक त्या वर्षीच्या ' बॉंबे आर्ट सोसायटी 'च्या प्रदर्शनांत सुवर्ण-पदक मिळायचें. सर्व लोकांचा कौल कामतांच्या बाजूचा होता; पण कांहीं तरी झालें आणि कामतांना त्या वर्षीच्या रौप्य-पदकाचा मान मिळाला. केवळ कामतांच्याच मनाला ती गोष्ट लागून राहिली असें नव्हे तर प्रेक्षकहि नाराज झाले, आणि कमिटीवर असलेल्या सॉलोमनसाहेबांनीं तत्कालीन नामवंत पत्रांतून खरमरीत टीकालेख लिहिले. ह्या प्रांतिक सुवर्णपदकाच्या वादांत कामतांचें मन थोडेंसें नाराज, थोडेंसें अपमानित झालें खरें, परंतु एका अर्थी झालें तें बरें झालें. भावी काळांतल्या प्रचंड यशाची ती मुहूर्तमेढ ठरली.



मी तो हमाल भारवाही

येथील अभ्यासक्रम पुरा करून सॉलोमनसाहेबांच्या उत्तेजनानें कामत इंग्लंडला गेले आणि तेथील ' रॉयल अकादमी ऑफ आर्ट ' ह्या शिक्षण-संस्थेंत ते दाखल झाले. आपला निभाव येथें कसा काय लागणार ह्या विचारांतच त्यांचे पहिले कांहीं दिवस गेले. शिवाय त्यांच्या दृष्टीनें आपण ' नेटिव ' आहोंत ही एक सुप्त भीति होतीच.

केवळ कलेचें मौलिक शिक्षण देणारी संस्था एवढाच 'रॉयल अकादमी'चा लौकिक नाहीं. जगांतल्या उत्तमोत्तम कलाकृतींचें प्रदर्शन भरविण्याचें भरीव आणि जनजागृतीचें काम ही संस्था करते आणि उत्तमांतली उत्तम अशी कलाकृति निवडून तिला त्या वर्षाचें सुवर्ण-पदकहि ही संस्था देते. अर्थातच हें सुवर्ण-पदक मिळालेला चित्रकार एका रात्रींत लौकिकाच्या शिखरावर चढतो.



नागकन्या

संस्थेचें त्या वर्षीचें प्रदर्शन थोड्याच कालावधींत भरणार होतें. तशी तयारीहि चालू झाली होती. कामतांना ह्याची दाद नव्हती. हिंदुस्थानांतून ते आले ते शिल्पशास्त्राचा पुढील अभ्यास करण्यासाठीं; शिवाय नुकतीच कुठें अभ्यासाला सुरुवात झाली होती. अशा वेळीं चढाओढीकडे किंवा प्रदर्शनाकडे त्यांचें लक्ष न जाणें स्वाभाविक होतें. आपल्या अभ्यासक्रमांत गर्क राहणें हेंच एक आतां त्यांचें ध्येय होतें.

एक दिवस वर्गांत एकाएकीं चुळबुळ कां झाली म्हणून कामतांनीं मागें वळून पाहिलें. क्वचित् वर्गांत येणाऱ्या सर विल्यम मॅक्मिलन्-साहेबांचें आगमन झालें होतें. प्रत्येक विद्यार्थ्याच्या कलाकृतीचें निरीक्षण करीत करीत सर विल्यम कामतांजवळ आले. समोरचें आलेखन त्यांनीं लक्षपूर्वक पाहिलें, आणि एकाएकीं कामतांचा हात धरून आपल्या कचेरीकडे ते त्यांना घेऊन गेले. कचेरीच्या दरवाज्यालगतच्या भिंतीवर संगमरवरी दगडावर कोरलेल्या नांवांकडे बोट दाखवून सर विल्यम म्हणाले, " मिस्टर कामत, संस्थेच्या प्रदर्शनांत मान्यवर असें सुवर्ण-पदक मिळविणारांचीं हीं नांवं. तुमचंहि नांव इथें कोरलं जाईल अशी एखादी कलाकृति तुम्ही ह्या वर्षींच्या प्रदर्शनासाठीं तयार करा. हवी ती मदत द्यायला माझी तयारी आहे. "

सर विल्यम एवढीं मोजकींच वाक्यें बोलले व त्यांनीं कामतांना आपल्या जागेवर जायला सांगितलें. जातांना फक्त प्रश्नचिन्ह बरोबर घेऊन गेलेले कामत येतांना जबाबदारीच्या जाणिवेची एक प्रचंड शिळा डोक्यावर घेऊन वर्गात परत आले. इतके विद्यार्थी वर्गात असतांना सर्वांच्या देखत केवळ आपल्यालाच हात धरून सर विल्यमनीं घेऊन जावें, ती शिळा दाखवावी, आपलेंहि नांव त्या शिळेवर कोरलें जावें अशी इच्छा प्रगट करावी—सारेंच विलक्षण घडलें होतें ! एकंदर प्रसंगानें कामत दिङ्मूढ झाले होते. एक दोन दिवसांनीं तर, सर विल्यमची चिठ्ठीहि आली होती. मदतीच्या आवश्यकते-बद्दलची त्यांत विचारणा केली होती. आतां माघार घेणें कामतांना अशक्य झालें होतें.

चिंतन करून अखेर कामतांनीं विषय निश्चित केला. कांहींतरी वेगळें करण्याची ईर्ष्या जागृत झाली, आणि त्यांनीं आपली कल्पना साकार केली. केवळ जबाबदारी टाकली गेली म्हणून ह्या सर्व गोष्टी कामतांच्या हातून घडल्या. प्रदर्शनाच्या उद्घाटनाचा दिवस उजाडला. नामवंत शिल्पकार—चित्रकारांच्या मेळाव्यांत कुठेंतरी कामतहि बसले होते. अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर रॉयल अकादमीच्या त्या वर्षीच्या सुवर्ण-पदकासाठीं ज्या मानकऱ्याचें नांव बहुमानानें उच्चारलें गेलें ते मानकरी म्हणजे रामचंद्र पांडुरंग कामत. तें सुवर्ण-पदक मिळवायला जीं इतर अनेक बक्षिसें मिळवावीं लागतात तींहि अर्थातच सर्वच्या सर्व कामतांनाच मिळालीं; आणि कामत विश्वविख्यात झाले. सर विल्यमच्या इच्छेप्रमाणें कामतांचें नांव त्या शिळेवर कायमचें कोरलें गेलें. मुंबईतल्या नामवंत पत्रांनीं अग्रलेख लिहून त्यांचा गौरव केला. विशेष म्हणजे मायदेशीं परत आल्यावर गोव्यांत पणजी येथें त्यांचा जो प्रचंड सत्कार झाला तो ‘ न भूतो—’ असा होता. ध्रुवाच्या निश्चयानें, ज्या ध्येयासाठीं ‘ मागेन रमारंगें ’ म्हणून त्यांनीं गांव सोडलें त्या गांवानें, ह्या यशस्वी सुपुत्राच्या सन्मानासाठीं दिवाळीसारखा भव्य उत्सव साजरा केला.

कामतांनीं मिळविलेला मान आतांपर्यंत तरी हिंदुस्थानांत कुणींहि मिळविलेला नाहीं.

चर्चगेटला असलेला सर दिनशा वाच्छांचा पुतळा कामत ह्यांनीं केलेला आहे. तसेंच लक्ष्मी इन्शुअरन्सच्या इमारतीवरील भव्य लक्ष्मी, प्रतापगडावरील अश्वारूढ शिवाजी, झांशी येथील १६ फूट उंच अश्वारूढ झांशीची राणी वगैरे शिल्पें त्यांच्या कलेचा भव्यपणा दर्शवितात.

कांहींतरी नवें करायचा पहिल्यापासूनच ओढा असल्यानें नवशिल्प-कलेबद्दलचीं त्यांचीं मतें पुष्कळशीं पुढारलेलीं आहेत. सध्यां मात्र जें कांहीं नवें नवें म्हणून चाललेलें आहे, आणि ठराविक वर्तुळांतून ज्याचा उदोउदो होत आहे, तें सारें कलेचें भ्रष्ट स्वरूप असून छानछोकीची हौस असलेल्या समाजाची ती भुलभुलावण आहे असें त्यांचें स्पष्ट मत आहे. " संसारी बंधनाच्या साच्यांतच नव्या कलेच्या आकाराचीं बंधनं बसविलीं पाहिजेत तरच आज आहे त्यापेक्षां त्या आकाराला भारदस्तपणा येऊं शकेल. कलावंताला स्वातंत्र्य अवश्य असावं. समाजानेंहि तें मुक्त मनानें द्यावं; परंतु तसं स्वातंत्र्य मिळालं म्हणून कलावंतानें त्याचा दुरुपयोग करूं नये, अथवा स्वातंत्र्याचं भांडवल करून दांभिकपणानें त्याचा आविष्कार करूं नये. कलेचं स्वरूप अति विशाल आहे. एकरूपानें ती स्थिर राहूंच शकत नाहीं; मग ती वास्तववादी कला असो किंवा अतिवास्तव असो; आजच्या चालू परिस्थितींतल्या नवकलेचं स्वरूप हें खरं म्हणजे अतिवास्तव कलेचं बाह्यात्कारी स्वरूप आहे. तिचं खरं स्वरूप आणि आत्मा आम्हांला अजून सांपडलेलाच नाहीं. मीं आतांपर्यंत अनेक शिल्पं केलेलीं आहेत. तुमच्या दृष्टीनें त्यांत कदाचित् कलेचा संदर्भ असूं शकेल; परंतु जो शोधायचा मी आज कित्येक वर्षे प्रयत्न करीत आहें तो त्यांतला आत्मा मला तरी अद्याप गवसलेला नाहीं. " असें कामत म्हणतात.

एकदां मीं त्यांना विचारलें, " हें पाहा कामत, जुनी भारतीय शिल्पकला अतिशय विशाल अशा स्वरूपाची आहे; केव्हां केव्हां तर ती बुद्धीला गुंग करून सोडते. त्या वेळच्या त्या कलावंतांनीं व्यक्तिचित्रं किंवा बाजारी शिल्पं केलीं नाहींत. तशीं विशाल शिल्पं आजच्या काळांत होऊंच शकणार नाहींत काय ? "

कामत म्हणाले, " हें पाहा, कालाबरोबर सर्व कांहीं बदलतं, तसं कलेचं स्वरूपहि बदलणार नाहीं का ? जुनी शिल्पकला अक्कल गुंग करून सोडते हें

मलाहि मान्य आहे, परंतु हा प्रश्न प्रत्येकाच्या अभिरुचीचा आहे. एक मात्र तुम्हांला कबूल केलंच पाहिजे कीं, जुनी कला विशिष्ट अशा धर्माच्या प्रचाराला कारणीभूत झाली, आणि वाङ्मयरूपानेंहि ती बहुजन समाजाच्या डोळ्यांसमोर राहिली. किंबहुना धर्माचा एक विशिष्ट प्रभाव जोंपर्यंत आमच्यावर कायम आहे तोंपर्यंत ती तशी अमर राहीलहि. परंतु नव्या कलेचं तसं झालेलं नाहीं. अजून तिचं स्वरूप वैयक्तिक आहे; प्रचाराचं मंडल तिच्याभोंवतीं नाहीं; आणि चालू काळांत तर दांभिकांनीं तिचा मुडदाच पाडला आहे. अनुकरणाची आम्हांला अत्यंत वाईट संवय लागलेली आहे. नवीन कांहीं दिसलं कीं त्याचा आत्मा शोधायच्या आधींच आम्ही त्याच्या प्रचाराला लागतों, ह्या गोष्टीनें तर कळसच चढविलेला आहे. मला तरी आमच्या आजच्या नवकलेला भवितव्य आहे, असं तिचं चालू स्वरूप पाहून वाटत नाहीं. मग तुमचं मत काय असेल तें असो."

वानप्रस्थाश्रमांत, भारतांतील कोनाकोपऱ्यांत हिंडून जिथें जिथें म्हणून खोदण्यालायक दगड दिसेल तिथें तिथें एखादें शिल्प खोदून ठेवायचें आणि पुढें निघून जायचें अशा रीतीनें आपली कलायात्रा पुरी करायची हेंच आपलें अंतिम ध्येय असल्याचें ते वारंवार बोलून दाखवतात.

* *
*

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........



## मणिपुरी नृत्य आणि
# नृत्यांगना जव्हेरी भगिनी

भारतीय नृत्यसृष्टींत जे चार नृत्यप्रकार विशेष रूढ आहेत ते असे—कथाकली, भरतनाट्यम्, मणिपुरी आणि कत्थक. पैकीं पहिले तीन हे अस्सल भारतीय. चौथा कत्थक हा यावनी आक्रमणाबरोबर भारतांत आला. मुळांतल्या ह्या 'जिप्सी' नृत्य-प्रकाराला पुढें दरबारगायक अमीर खुस्रूनें भारतीय संगीताच्या साजाचा थोडासा मुलामा चढविण्याचा प्रयत्न केल्यानें उत्तर हिंदुस्थानांतल्या अमीर-उमरावांत त्याचें भलतेंच कौतुक होऊं लागलें. त्यामुळें स्थानिक नर्तक लोक मागें पडूं लागले. त्यांना कोणी विचारीनासें झालें. त्यांची ती अवस्था स्वामी हरिदासांच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं. स्वामीजींनीं त्य जिप्सी नृत्यप्रकाराचें सूक्ष्म अवलोकन करून त्यांतील शृंगार, करुण, हास्य आदि रसांना परिपोषक अशीं कृष्णलीलामृतावर गाणीं रचलीं; आणि त्या

जिप्सी नृत्याचें पूर्णपणें आपल्यांत विलीनीकरण करून ' काल्का ' व ' बिंदा ' ह्या आपल्या दोन शिष्यांना शिकवून तयार केलें. भारतीय कत्थक हें स्वामीजींच्या प्रयत्नाचें गोड फळ आहे; परंतु कत्थकांत पुढें उत्तान शृंगाराला अधिक प्राधान्य मिळूं लागलें. अश्लीलतेला मर्यादा राहिली नाहीं. अवधचा बादशहा वाजिदअलि ह्यानें तर त्यावर कळस चढवला. त्याच्या अमदानींत ' कत्थक ' बहरलें खरें; पण नीतिमत्तेचा चुराडा झाला. त्यामुळें प्रतिष्ठित समाजाच्या मनांतून तो नृत्यप्रकार उतरूं लागला. त्याच्या मनोरंजनाला दुसरें कांहीं तरी सोज्ज्वळ असें हवेंसें वाटूं लागलें. तें इथें दुर्मिळ होतें असें मुळींच नव्हे; पण त्याकडे त्याचें दुर्लक्ष झालें होतें एवढेंच.

कथाकलींत पुरुषांगाचें रूप फार. वीर व रौद्र रसांना प्राधान्य अधिक. त्यामुळें त्यांतील स्त्रीभूमिका देखील पुरुषांनाच कराव्या लागत. (अजूनहि ही परिस्थिति आहे.) कारण त्यांतले अंगविक्षेप स्त्रियांना जमणें कठीण. पायाचें विस्फारणें आणि पवित्र्याची दोन पायांमधली कक्षाच जिथें अडीच फूट अंतराची असते तिथें अशा ह्या पवित्र्यानें कंबरेवर आलेला साऱ्या शरीराचा भार स्त्रीच्या कोमल गात्रांना कसा पेलवेल? मुद्राभिनयासाठीं अगदीं लहानपणापासूनच चेहेऱ्यावर तज्ज्ञाकडून पायाच्या तळव्यानें तेलाचें मालीश कित्येक वर्षें करून घ्यावें लागतें. कंबरेलाहि जोरकस असें (पायांनींच) मालीश करावें लागतें. एकंदर प्रकार देहदंडनानेंच साध्य होण्याच्या ह्या क्रियेमुळें हा नृत्यप्रकार एका विशिष्ट वर्गापुरताच मर्यादित राहिला. पुढचे दोन नृत्यप्रकार मात्र आवड असलेल्यांना थोड्याशा प्रयत्नानें साध्य होण्यासारखे होते. ते म्हणजे भरतनाट्यम् व मणिपुरी. भरतनाट्यम् हा नृत्यप्रकार हृदयंगम खरा, तरीहि थोडासा त्यांतल्या त्यांत कटकटीचा, शरीर घुसळून काढणारा; परंतु मणिपुरीचें तसें नाहीं. मणिपुरी मार्दवाला धक्का देणार नाहीं, सुकुमारतेला राक्षस ओरखडे काढणार नाहीं, रसपरिपोष करतांना सौंदर्यहानि होऊं देणार नाहीं; किंबहुना कृत्रिम अभिनयाला इथें थाराच नाहीं. सारें कांहीं सहजगत्या! त्याच्या अभिव्यक्तींत प्रौढपणा आहे, तसेंच सरलत्वहि आहे. खोटा दंभ तिथें आढळत नाहीं.

ह्या मणिपुरी नृत्याच्या शास्त्रीय प्रगतीचा पूर्वेतिहासहि मोठा मनोरंजक आहे. मुळांतल्या मणिपुरी लोकनृत्याला शास्त्राच्या कक्षेंत बसवणारे आद्य जनक

हे खुद्द मणिपूरचे महाराजाधिराज भाग्यचंद्र महाराज. भाग्यचंद्र महाराजांना संतान नव्हतें. संतानासाठीं त्यांनीं अपार कृष्णभक्ति केली. एके दिवशीं भगवान् श्रीकृष्णांनीं स्वप्नांत दर्शन देऊन त्यांना सांगितलें कीं, ' हे राजा, तुझ्या राज्यांतल्या नृत्यकलेंत माझ्या रास–लीलेला संपूर्ण रूप देशील तर तूं अपत्यवान होशील ! ' स्वप्नांतल्या त्या दृष्टान्तानें महाराजांना एक प्रकारची धुंदी आली. दुसऱ्या दिवशीं राज्यांतल्या साऱ्या नृत्यकारांना बोलावून शास्त्रशुद्ध असे रास-लीलेचे पांच नृत्यप्रकार त्यांनीं निर्माण केले. महारास, कुंजरास, उत्खल-रास, बसंत-रास व गोपगोपाळ-रास.



**एक मुद्रा**

महाराजांना नंतर कन्यारत्न झालें. लहानपणापासून ह्या मुलीचा कृष्णभक्तीकडे ओढा असल्यानें, तिची हौस म्हणून महाराजांनीं तिला ' नवदीप ' येथें एक सुंदर मंदिर बांधून दिलें. त्या मंदिराचें नांव ' श्रीगोविंद मंदिर '. ह्या मंदिरांत भगवान गोविंदाच्या समोर राजकन्या दिवसभर नृत्य करीत असे. तिनें आपलें तन, मन, धन सर्व श्री गोविंदाला वाहिलें. मणिपूरची मीरा अशा नांवानें ती प्रख्यात झाली. मणिपूरच्या, नृत्यांगनेखेरीज बाहेरच्या माणसाला ह्या मंदिरांत नाचूं दिलें जात नाहीं व नृत्यपारंगततेचें शेवटचें प्रमाणपत्र मिळतें तें ह्या गोविंदमंदिरांतच. त्याशिवाय पूर्णत्वाचा शिक्का बसूंच शकत नाहीं. कथाकलीच्या पहिल्या वंदनांत आव्हान आहे. अलपद्म मुद्रेचा उजवा हात पुढें आलेला, मुद्राख्या मुद्रेचा डावा हात थोडासा मागें आणि अडीच फुटांच्या अंतरांत विस्फारलेले पाय; त्यावर सगळ्या शरीराचा भार घालून, कंबर किंचित मागें घेऊन डोळ्यांनीं काळजाचा ठाव घेणारें कथाकलीचें वंदन जरब बसवतें, तर आजूबाजूला ' पताका ' ह्या मुद्रेचे किंचित् वक्र असे दोन्ही हात घेऊन छाती पुढें काढून मान मागें घेऊन तिला मोड देत नमस्कार करणारें

भरतनाट्यमचें वंदन अहंकारी वाटतें. कत्थकाची सुरुवात, ‘ सलामानेंच ’ होत असल्यानें अमीरांची अजीजी करणारी लाचारी कत्थकाच्या प्रथम वंदनांत आहे; परंतु मणिपुरीचें वंदन साध्या मुद्रेचें. मणिपुरीचा भाव-भंगिमा थोडासा विचित्र आणि कठीण आहे. त्याला ‘ त्रिभंगा ’ असें म्हणतात. त्रिभंगा म्हणजे शरीराचे तीन भाग वाकवणें. डाव्या बाजूला मान, उजव्या बाजूला उरोज, पुन्हा डावी कटी आणि उजव्या बाजूला गुडघे व पाऊलें जोडून त्याचें पहिलें वंदन असतें. येथें अंगाभिनयाला महत्त्व फार; आणि मुद्राभिनयाला थोडें.

संपूर्ण अंगचलन हें मणिपुरीचें वैशिष्ट्य आहे. त्याच्या आंगिक अभिनयाला ‘ बांसाची ’ उपमा देतात. वाऱ्याची झुळूक आली कीं बांबूचें बन जसें डोलतें तसें ह्या नृत्याचें चलन आहे. असो !



राधा

पस्तीस वर्षांपूर्वी मध्यमवर्गीतला प्रतिष्ठित समाज, केवळ नेत्रसुखापुरताच नृत्यकलेच्या जवळ जात असे; परंतु तिला उंबरठ्यापर्यंत आणली उदय शंकरांनीं. स्वतःच्या बहिणीला नृत्य शिकवून त्यांनीं आपल्या संचाद्वारें तिच्या नृत्याचें जाहीर प्रदर्शन केल्यानें समाजांत हलुहलू जागृति होऊं लागली. मागाहून रवींद्रनाथ टागोरांनीं समाजाच्या ढोंगी बंधनाचा बांध फोडून नृत्यकलेला माजघरापर्यंत प्रवेश दिला व आज प्रतिष्ठित समाजाचें तें एक आवश्यक असें अंग होऊन बसलें आहे.

ललितकलांच्या विश्वांत त्या त्या कलेची अफाट साधना करून ज्यांनीं ज्यांनीं त्यांत नांव घेण्यासारखें नैपुण्य मिळविलें, अशीं माणसें त्यांतल्या एखाद्या कलेचें नांव घेतल्याबरोबर चटकन् आपल्या नजरेसमोर उभीं

राहतात. कत्थक नृत्य म्हटलें कीं ‘ अच्छन महाराज ’, ‘ लच्छुमहाराज ’ ह्यांच्या तपोनिष्ठ परंपरेंतून निर्माण झालेली ‘ सितारा ’ ड़ोळ्यांसमोर उभी राहते. भरत नाट्यम् म्हटलें कीं ‘ बालसरस्वती ’ प्रमाणेंच ‘ कमला लक्ष्मण ’, ‘ वैजयंती ’, ‘ पद्मिनी आणि भगिनी ’ ज्याप्रमाणें आठवतात त्याचप्रमाणें मणिपुरी म्हटलें कीं ‘ जव्हेरी भगिनीच ’ दृष्टीसमोर उभ्या राहतात. मणिपुरी नृत्य म्हणजे धरबंद नसलेला लोकनृत्यांतलाच एक छोटासा प्रकार असावा अशी माझी कांहीं दिवस कल्पना होती; परंतु कांहीं वर्षांपूर्वीं आय. एन. टी. तर्फें योगेंद्र देसाई ह्यांनीं सादर केलेला ‘ गीत-गोविंद ’ हा कार्यक्रम एका मित्राच्या आग्रहावरून मीं भारतीय विद्याभवन-मध्यें पाहिला आणि त्यांतील नृत्यांनीं मी आश्चर्यचकित झालों. त्यांतल्या त्यांत नयना जव्हेरींनीं तर प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून टाकलें होतें. नृत्यनाट्य मनावर असा विलक्षण परिणाम करूं शकतें ह्याची त्या वेळेपर्यंत मला कल्पना नव्हती. त्यानंतर मीं त्यांच्या ‘ आम्रपाली ’ व ‘ वासवदत्ता ’ ह्या नृत्यनाटिका पाहिल्या होत्या; आणि पुन्हा एकदां मीं थक्क झालों होतों. मणिपुरी हें एक फाल्तू लोकनृत्य नसून ती एक विशाल नृत्यतरंगावलीच आहे असें मला वाटलें. माझा मित्र मला वारंवार माहिती सांगत होता—

“ हें बघ, तुझ्या भरत नाट्यम्‌मध्यें शरीर ताठ राहातं; पण ह्याच्यांत तसं नाहीं. ह्याच्यांत सबंध शरीराचं डोलन सारखं चालू राहतं. कत्थकाचं मुख्य ध्यान तबल्यावर, लयकारींत व निरनिराळ्या चक्रतालांत; पण ह्याच्यांतला कोमलपणा त्यांत नाहीं. ह्याच्यांत छंदरचनेचं महत्त्व अधिक. भरतनाट्यांत एकएक सुटे अभिनय आहेत. ह्याचे सर्व तुकडे एकांत एक मिसळलेले वाटतात आणि अस्ताई संपेपर्यंत डोलन संपत नाहीं हा विशेष. ”

एखाद्या माणसांतल्या विलक्षण अशा बऱ्या गुणानें आपण स्तिमित झालों कीं त्याच्या खाजगी आयुष्याबद्दल चौकशी करणें हा मनुष्य-स्वभावच आहे. त्याला अनुसरून माझ्या मित्राला मीं हळूच म्हटलें होतें,

“ पण काय रे, ह्यांचं घराणं एखाद्या नृत्यकाराचं आहे काय ? ”

" वेडा आहेस ! अरे मुंबईतील जीं कांहीं अत्यंत सुखवस्तु अशीं कुटुंबं आहेत त्यांतलंच एक जव्हेरी कुटुंब. पण ह्या भगिनींनीं मात्र अनलस वृत्तीनें गुरुसेवा करून साधना केली आहे व अजून करतात. "

ह्यानंतर माझ्या त्या मित्रानें नयनाबाईंची ओळख करून दिली होती व पुढें बाईंच्या घरीं झालेल्या एका खाजगी कार्यक्रमाला मला हजर राहावें लागलें होतें. ह्या कार्यक्रमांत मीं अस्सल मणिपुरी असे कांहीं शास्त्रोक्त नृत्यप्रकार पाहिले. गुरु बिपिन सिन्हा ह्या तपोनिष्ठा माणसाला भेटतां आलें, ' पुंगलोल जगोई ' हें मणिपुरी माणसानें केलेलें मुष्किल असें मृदंग-नृत्य पाहिलें, आणि बरीच माहितीहि मला मिळाली. विशेष नजरेंत भरली ती अलीकडे सहसा न आढळणारी गुरुभक्ति. जव्हेरी भगिनींचा गुरुबद्दलचा अपार आदर ही एक दुर्मिळ गोष्ट आहे. गुरु बिपिन सिन्हा ह्यांनीं पंडित विष्णु नारायण भातखंडे ह्यांचा आदर्श समोर ठेवून मणिपूर येथें नृत्याचें संशोधन सुरू केलें. त्यांच्यांतल्या अनेक विद्वानांत, ज्ञानवृद्धांत असलेल्या पूर्वापार मतभेदांची चर्चा करून, समेट घडवून आणून, एक शिक्षणक्रम निश्चित केला. स्वतः मेहनत करून गोविंदजी नर्तनालयाच्या सहा वर्षांच्या अभ्यासक्रमांत तो जोडून टाकला व अशा रीतीनें एक महान् कार्य पुरें करून ते पुन्हा मुंबईत आले आणि विद्यादानाचें कार्य करायला लागले. आज त्यांचा शिष्यसंप्रदाय फार मोठा आहे.

नयनाबाईंनीं १९४५ पासून शिक्षणाला सुरुवात केली. त्यासाठीं लगेच '४६ मध्यें खास मणिपूर येथें ६ महिने राहून गुरु ' अमुबिसिंह मैसनाब ' ह्यांच्याकडे त्यांनीं खास शैलीचें शिक्षण घेतलें. पुढें बिपिन सिन्हा ह्यांच्याकडे १२ वर्षांचा अभ्यासक्रम पुरा झाल्यानंतर मणिपुरांतल्या विद्वद्वर्यांचा आशीर्वाद घ्यावा म्हणून नयनाबाई पुन्हा मणिपुरला गेल्या; आणि भाग्याची गोष्ट अशी कीं, ज्या गोविंदजीच्या मंदिरांत कोणाहि बाहेरच्या माणसाला नाचूं दिलें जात नाहीं त्याच मंदिरांत तज्ज्ञांच्या समोर नयनाबाईंचें नृत्य झालें व तिथल्या सर्व गुरुजनांनीं मुक्त अंतःकरणानें नयनाबाई व त्यांच्या भगिनी ह्यांचें कौतुक करून प्रशस्तिपत्र दिलें. तिथला सुशिक्षित समाज देखील जव्हेरीभगिनींच्या नृत्यनैपुण्यानें खूष झाला; आणि

मणिपुरांतल्या वृत्तपत्रांनीं ह्या गोष्टीची मनापासून दखल घेऊन तिला फार मोठी प्रसिद्धि दिली.

नयना, रंजना, सुवर्णा व दर्शना ह्या चारहि भगिनी पदवीधर आहेत. अलीकडे त्यांनीं आपला असा एक वेगळाच आठ कलावंतांचा संच तयार केलेला आहे. त्यासाठीं लागणारा सर्व खास साज मणिपूर येथें बनवून आणलेला असून कांहीं कलावंतहि मणिपुरांतून आलेले आहेत. आपल्या ह्या संचाकडून आतांपर्यंत उत्तर हिंदुस्थान, गुजरात, कानपूर आदि बऱ्याच ठिकाणीं त्यांनीं कार्यक्रम सादर केले, व हे कार्यक्रम अत्यंत लोकप्रिय ठरले.

गेल्या महिन्यांत कांहीं खास पाहुण्यांकरितां आपल्या घरीं त्यांनीं एक छोटासा कार्यक्रम आयोजित केला होता. मी थोडासा उशिरानेंच पोहोंचलों. रंगमंचावर त्या वेळीं एक वेगळाच प्रसंग चालू होता. कुठें तरी कृष्णानें मुरली वाजवली होती. ‘ माझ्या मुरलींतून तशी विशिष्ट धून निघाली कीं नृत्याच्या तयारीनें तुम्ही धांवत या ’ असा संकेत केव्हां तरी त्यानें ठरवून दिला होता. त्यानें तशी धून वाजवली तेव्हां त्या गोपी आपल्या हातांतलीं सर्व कामें बाजूला ठेवून बेभान होऊन धांवत सुटल्या; परंतु त्या लीलानाटक्यानें नक्की कुठल्या दिशेला धून वाजवली हें मात्र त्या विसरल्या होत्या. कावऱ्या-बावऱ्या झालेल्या, उत्कंठिता अशा त्या गोपी गोविंदाला शोधीत होत्या. “ धीन ग्रे ग्रे धीन तेन्ता तेन्ता तेन्ता थै ” ह्या गतीची संथ लय चालू होती. कधीं त्याच्यांत रूपकाच्या सहा मात्रा येत ( आपल्याकडे सात आहेत ) तेवऱ्याच्या सात मात्रा येत, कंकनाच्या अकरा मात्रांचा एक तोडा येई, पंचम सवारीच्या पंधरा मात्रांचा एखादा तुकडा मधूनच वळसा घेई. असें करतां करतां शूलतालांतल्या ५४ मात्रांपर्यंत आवर्तनें होत; परंतु मूळचा आशय आणि त्याची अभिव्यक्ति कायम ठेवून हें सर्व चाललेलें होतें. एकीला कृष्ण सांपडला होता; पण ती दुसरीला दाद लागूं देत नव्हती; दुसरी तिसरीला दाद लागूं देत नव्हती, असा सर्वांनाच तो दशांगुळें उरलेला भगवान् सांपडला होता; पण त्या गोपींना मात्र वाटत होतें, कीं श्रीकृष्ण भगवान् आपल्याला एकटीलाच सांपडलेला आहे.

ह्या नृत्याचे प्रवीण असे आपल्या ह्या महाराष्ट्रांत अगदीं मोजकेच लोक आहेत. माझ्या माहितीप्रमाणें श्री. मुरलीधर साळवी हे व्यासंगी नृत्यशिक्षक मणिपुरींतले दर्दी आहेत व तज्ज्ञांकडून त्यांना तशीं शिफारसपत्रेंहि मिळाल्याचें ऐकतों.

ह्याशिवाय सविता कालीदास व निर्मला कालीदास ह्या कालीदासभगिनीहि ह्या नृत्यांत निपुण आहेत; परंतु त्या फारसे कार्यक्रम करीत नाहींत. आणखीहि असतील कदाचित्; परंतु सार्वजनिक ठिकाणीं तरी ते माझ्या पाहण्यांत आलेले नाहींत.

ह्या नृत्यप्रकाराचा समावेश युनिव्हर्सिटीनें आपल्या शिक्षण-क्रमांत कांहीं ठिकाणीं करून त्याला योग्य स्थान दिलें आहे, ह्याबद्दल युनिव्हर्सिटीला धन्यवाद दिले पाहिजेत. नृत्यकलेचा उपजत गुण असलेल्या मुलांना त्यापासून नक्की लाभ होईल.

★★
★



# अनवट रागांचा ज्ञानकोश
# मोहनराव पालेकर

१९४०–४१ सालीं गंधर्व कंपनी दुसऱ्यांदा गोव्यांत आली. पहिल्या खेपेस स्पेशल बोटीनें वैभवसंपन्न गंधर्व कंपनीचें आगमन झालें होतें. गोव्यांतल्या नाट्यप्रेमी लोकांना ती एक नवलाई होती; परंतु आकर्षण होतें तें मात्र बालगंधर्वांचें. गंधर्व हाच एकमेव चर्चेचा विषय होता. दुसऱ्या खेपेस तसें झालें नाहीं. ह्या दुसऱ्या खेपेला बालगंधर्वांबरोबरच आणखी एका गोष्टीनें गोमंतकीयांना विलक्षण आकर्षित केलें, तें म्हणजे ' स्वयंवरां '-तल्या कृष्णानें. पूर्वीच्या कृष्णाच्या मानानें हा कृष्ण फार वेगळा होता. त्याच्याजवळ व्यक्तित्व होतें, अभिनय होता आणि तिसरें म्हणजे त्याचें गाणें उजवें होतें; त्याच्या बांधेसूद शरीराप्रमाणेंच तालमीचें होतें. रुक्मिणीच्या लोकप्रिय पदांबरोबर किंबहुना अधिकच कृष्णाच्या पदांनींहि लोकांना मोहिनी घातली. माणूस लोकप्रिय झाला म्हणजे त्याच्या इतर खाजगी गोष्टींबद्दलहि साहजिकच लोकांना कुतूहल वाटायला लागतें. तो कोण आहे ? त्याचें गांव कोणतें ? त्याचें गाण्याचें शिक्षण कुणाकडे झालें ? त्याचें लग्न झालें कीं नाहीं ? इत्यादि इत्यादि. आम्हां विशींतल्या तरुणांना एकाच गोष्टीची माहिती हवी होती. कृष्णाची भूमिका करणाऱ्या कृष्णराव चोणकरांचें संगीताचें शिक्षण कुणाकडे झालें ? बारीक चौकशीअंतीं आम्हांला कळलें कीं श्री. मोहनराव

पालेकर नांवाच्या एका गृहस्थांकडे त्यांचें शिक्षण झालेलें होतें. आम्हांला त्या काळांत माहीत असलेल्या ठराविक खाँसाहेबांच्या यादींत हें नांव कुठेंच नसल्यानें त्याबद्दल विशेष असें कांहींच वाटलें नाहीं; परंतु तें नांव मात्र लक्षांत राहिलें. चाळीस सालीं मी मुंबईस आलों. गल्लीबोळांतून जिथून जिथून संगीताचे स्वर ऐकूं येतील, वाद्यांचे स्वर ऐकूं येतील तिथें तिथें थबकून मी ते कानांत सांठवीत असें.

तारा टेंपल लेनमधील भोजनालयांतून जेवून मी गल्लीच्या बाहेर पडत होतों. देवळाच्या बाजूला असलेल्या एका इमारतींतून आलेला एक चमकदार पल्टा माझ्या कानावर आदळला. माझे पाय जिथल्या तिथेंच खिळले. थोड्या वेळानें आणखी एक पल्टा तार सप्तकांतून फिरून खालीं मंद्रसप्तका-पर्यंत आला, आणि चीजेचे बोल म्हणून समेवर येऊन गायकानें गाणें संपविलें. त्या पल्ट्याचे स्वर माझ्या कानांत घुमत होते. त्याचा राग कोणता हें ओळखायचा मी प्रयत्न करीत होतों; पण कशाच रीतीनें त्याची ओळख मला पटेना. इतक्यांतच पावसाची एक जोरदार सर आली. झटकन् मी देवळाच्या आडोशाला उभा राहिलों. पावसाची सर आली तशी ती एकदोन मिनिटांतच गेली. इतक्यांत दोन इसम छत्री घेऊन त्या इमारतींतून बाहेर पडले. गल्लीच्या नाक्यावर येऊन एकानें दुसऱ्याचा निरोप घेतला आणि तो ग्रँटरोडच्या बाजूला वळला व दुसरा ऑपेरा हाऊसच्या बाजूला वळणार तोंच मीं त्याला हांक मारली " परीस माम ! "

परीस माम थांबला होता; मी जवळ आल्यानंतर माझी त्यानें आस्थेनें चौकशी केली होती. रतन पै नांवाच्या मुलाला मोहनराव पालेकर शिकवीत असल्यानें त्याच्या तालमीची आपण साथ करीत असल्याचें त्यानें मला सांगितलें होतें.

" म्हणजे हे आतांच त्या बाजूला वळले तेच मोहनराव काय ? "

" होय; तेच मोहनराव. उद्यां रात्रीं तिथें जन्माष्टमीला कार्यक्रम आहे. नवाच्या सुमारास ह्या इथेंच नाक्यावर उभा राहा; मी तुला तिथें घेऊन जाईन. " एवढें सांगून परशुराम पार्सेकर ' किल्नलेन 'मध्यें वळला आणि नुकत्याच ऐकलेल्या पल्ट्याचें स्वरूप आठवीत मी घरीं आलों.

छत्री डोक्यावर असल्यानें मोहनरावांचें दर्शन झालें नव्हतें; तें त्या अष्टमीच्या रात्रीं झालें. एका लोडाला टेकून बैठकीच्या बाजूलाच मोहनराव बसले होते. ओपन कॉलरचा साधा आंखूड कोट, शर्ट आणि लेंगा असा सुटसुटीत वेष. गवय्याला, विशेषतः तालीम देणाऱ्या गवय्याला लागणाऱ्या कुठल्याच खुणा त्या वेषांत नव्हत्या. तोंडांत एक अनिरुद्ध जळणारी फरमास विडी मात्र लक्ष वेधून घेत होती.

त्या अष्टमीच्या रात्रीं मी बऱ्याच जणांचीं गाणीं ऐकलीं. बहुतेक सगळे शास्त्रीय संगीतच गायले. रतन पैहि गायले आणि त्यानंतर मोहनराव गायले होते. परशुराम हा अत्यंत बिकट अशा पद्धतीनें वाजविणारा तबलजी; परंतु वाटेल तिथून उठून वांकडीतिकडी (माझ्या दृष्टीनें) कशीहि बोलतान करून मोहनराव बरहुकूम समेवर येत होते. लोक प्रत्येक समेला दाद देत होते. मला राग कळले नाहींत; पण ताल कळला. परशुरामाच्या ठेक्याला मोहनरावांनीं यत्किंचितहि दाद दिली नाहीं, एवढेंच एक त्यांचें मोठेंपण माझ्या लक्षांत राहिलें. बाकी त्यांचें गाणें मला कांहीं कळलें नाहीं.

दैवयोगानें कृष्णराव चोणकर आणि मी पुढें शेजारी झालों, आणि ऋणानुबंधीहि झालों. 'पुष्पसंगें मातीस वास लागे' ह्या न्यायानें नाहीं नाहीं म्हणतां निदान शिळोप्याच्या गोष्टींतून तरी अनवट राग थोडेसे ओळखतां येण्याइतपत माझ्या ज्ञानांत थोडीशी भर पडली. ह्या काळांत कुठें चांगलासा कार्यक्रम असला कीं न चुकतां आम्ही दोघे तो ऐकून येत असूं आणि त्यावर कितीतरी वेळ चर्चाहि करीत बसत असूं. आपल्याला आतां आणखी गाणें शिकलें पाहिजे, असें चोणकर मला वारंवार सांगत असत. 'थोडीशी परिस्थिति निर्माण झाली कीं मोहनरावांना बोलावून मी शिकायला सुरवात करणार आहे' वगैरे ते नेहमीं बोलत; आणि त्यांच्या अतीव इच्छेला देवानें एकदांचा ओ दिला. मोहनराव पुन्हा चोणकरांना तालीम द्यायला येऊं लागले.

तोडी, खटतोडी, खट, भटियार, शुद्ध भटियार, भूपनट, केदारनट, शुद्धनट, सावनी, सावनी नट, नट बिहाग असले प्रचंड राग मीं तब्बल

पांच वर्षें ऐकले; निरनिराळ्या घराण्यांच्या अनेक गोष्टी ऐकल्या. त्यांच्या गायकीची छाननी केली; आणि शिकवतांना मोहनरावांचें गाणेंहि ऐकलें.

'न कळतांचि पद अग्निवरी पडे। न करि दाह असें न कधीं घडे ॥'
असेंच कांहींसें माझ्या बाबतींत झालें. आपली तालीम कुणीतरी ऐकतो आहे, त्यापासून आपलें कांहींतरी भयंकर नुकसान होणार आहे, किंवा हा एक फार मोठा गुन्हा आहे असें मुळींदेखील मोहनरावांना किंवा चोणकरांना, दोघांनाहि वाटलें नाहीं. (इतर ठिकाणीं मला एकदां तसा अनुभव आला होता.) स्वतःबरोबरच आपलें गाणेंहि घेऊन परलोकीं गेलेल्या कांहीं 'बुजुर्ग' गवय्यांबद्दल बोलणें निघालें, कीं वैतागून वारंवार मोहनराव म्हणत "बाबा, गानविद्या ही कुणाची मक्तेदारी नाहीं. ती साध्य करील त्याची आहे. माझ्या गुरूच्या वडिलांचे हे उद्गार माझ्या कानांत सारखे घुमत असतात. शेवटीं खाँसाहेब अलादियाखाँ देखील रडले. आपली ही गानविद्या आपल्याबरोबरच जाणार म्हणून त्यांना वाईट वाटत होतें." ह्या त्यांच्या उद्गारांमुळें त्यांची तालीम ऐकली हा अपराध केला, असें मलाहि कधीं वाटलें नाहीं. मोहनरावांचा स्वभाव काव्यशास्त्रविनोदप्रिय. आयुष्याचे त्रिविध ताप भोगल्यामुळें स्वानुभवांची झिलई त्यावर चढलेली. तेव्हां गप्पांना एक सार्थ रंग येई—अगदीं चीजेच्या तोला-मोलाचा. मत देतांना माणूस सहजपणानें स्वानुभव सांगतोच. ह्या स्वानुभवांतून नकळत श्रोत्याला त्याचें चरित्रहि कळायला लागतें. 'येतां जातां उठत बसतां' जें जें मीं ऐकलें, त्यांतून मोहनराव पालेकर ह्यांची एक व्यक्तिरेखा, जी माझ्या मनावर ठसली, तिची ही रूपरेखा...

यशवंतराव सुंदरराव पालेकर ऊर्फ मोहनराव ह्यांना समजायला लागल्यापासून आपण गवय्या व्हावें असें नेहमींच वाटत होतें. त्यांच्या प्रतिष्ठित घराण्यांत आतांपर्यंत असला 'भयंकर' विचार कुणाच्याहि डोक्यांत आला नव्हता. इतर मुलांपेक्षां आपल्या ह्या मुलाचा आवाज फार चांगला आहे आणि शाळेंत त्याबद्दल त्याचें कौतुक होतें, एवढ्यावर वडील खूष होते. बंडोपंत दामले (शाळेचे गायनमास्तर) ह्यांनीं ग्रहणशक्तीबद्दल कौतुकानें दिलेली शाबासकी ऐकून जिज्ञासा थोडीशी वाढे इतकेंच; परंतु त्याचें

पर्यवसान मुलानें मुबारक अलि (सुप्रसिद्ध गायक भेंडीबाजारवाले नजीरखाँ ह्यांचा मुलगा) बरोबर भेंडीबाजारांत बकाल वस्तींतून गाणें ऐकत हिंडणें इतपत होईल आणि लोकापवादाचें काहूर उठेल, असें मात्र त्यांना कधींहि वाटलें नव्हतें. "मुबारक अलि हा असामान्य गायक आहे, आणि चांगलें गाणें ऐकायचें असेल, त्यापासून कांहीं शिकायचें असेल तर कलावंत असतील तिथें 'शोध' घ्यायला पाहिजे; कलावंताच्या ठिकाणीं उच्च-नीच, लहान-थोर अशी भावना नसते." इत्यादि प्रवचन सतरा-अठरा वर्षांच्या मोहनरावांनीं आपल्या छंदाच्या समर्थनार्थ केलें; परंतु तें उपड्या घागरीवर पाणी ठरलें; आणि ह्या शुद्ध नादाच्या अर्थाचें 'व्यसन' ह्या अर्थीं पर्यवसान होऊन वैतागानें मोहनरावांना घर सोडावें लागलें.

अशा मुलांना आश्रय म्हणजे त्या काळांतल्या नाटक कंपन्यांचे सताड उघडे दरवाजे. मोहनरावांनींहि अशाच एका दरवाजांतून प्रवेश केला. त्या नाटक मंडळीचें नांव होतें 'भारत नाटक मंडळी.'

भारत नाटक मंडळींत मोहनरावांचें व्हावें तसें कौतुक झालें नाहीं; त्याला कारण ती मंडळी फक्त गद्य नाटकें करी. मोहनरावांच्या गाण्याचा तिथें कांहीं उपयोग नव्हता; परंतु तिथल्या चांगल्या आतिथ्यशील वातावरणाचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला आणि मोहनराव लहानसहान कामें करीत तिथेंच राहिले. एक दिवस अचानक तेथें केशवराव भोसल्यांचें आगमन झालें. त्यांना एक गायक स्त्रीपार्टी हवा होता आणि त्याच्या शोधांत ते फिरत होते. कंपनीच्या मालकांनीं मोहनरावांची फार शिफारस केली; परंतु कारणें कांहींहि असोत, मोहनराव कबूल झाले नाहींत. केशवरावांनीं त्यांच्याजवळून गाऊन घेतलें होतें. त्यांची स्तुतीहि केली होती.

कांहीं कांहीं माणसांच्या स्वभावांत एक वेगळ्याच तऱ्हेचा हट्टीपणा असतो. सर्वसामान्य माणसांपेक्षां असलीं हीं हट्टी माणसें निराळीं. ह्यांनीं एकदां नाहीं म्हटलें, म्हणजे प्राणावर बेतलें तरी तें 'नाहींच!' जेवणार नाहीं म्हणजे नाहीं; खाणार नाहीं म्हणजे नाहीं! मोहनरावांजवळ कांहींसा असलाच हट्टीपणा आहे. (कित्येक वर्षें असलेलें, सुटायला अशक्य असें, विडीचें व्यसन असेंच एकदां जिन्यांतून फेंकून दिलें आणि आजतागायत ते तिला शिवले नाहींत.)

केशवरावांना त्यांनीं येत नाहीं म्हटलें; पुढें केशवरावांनीं कितीहि आग्रह केला तरी ते एकदां नाहीं म्हणाले ते गेलेच नाहींत; परंतु योगायोगानें गोविंदराव टेंब्यांच्या ' शिवराज संगीत मंडळींत ' मात्र एकाच आमंत्रणानें ताबडतोब दाखल झाले. शिवराज संगीत मंडळीचा मुक्काम त्या वेळीं इंदूर येथें होता. नाटक कंपनी म्हटली म्हणजे ती बोलक्या प्राण्यांची सर्कसच ! नानातऱ्हेच्या स्वभावाचीं माणसें. केवळ अंगच्या थोड्याशा कलेच्या गुणाबद्दल त्यांच्याविषयीं सहानुभूति बाळगावी ! एरव्हीं भयंकर ! इतर भोजनभाऊं-बरोबरच अहमदभय्या नांवाचाहि एक भोजनभाऊ कंपनीच्या दरबारांत शिरस्त्याप्रमाणें भूषण म्हणून, एक गवय्या असावा ह्या नात्यानें ठेवला गेला होता. असा बावळासा दिसणारा, सर्वच बाबतींत गबाळ्या असा, ह्या इसमाजवळ गाणें शिकणार कोण ? मिळालेले पैसे तो भांग पिण्यांत घालवी आणि लगेच निष्कांचन होई. विशेष म्हणजे कंपनींतल्या त्या डाळभाताचा त्याला इतका कंटाळा आला होता, कीं क्वचित् एखाद्या मटनाच्या दुकाना-जवळ नुसता तासन्तास उभा राहून वासावरच तो संतोष मानीत असे. मोहनरावांची आणि त्याची गट्टी जमायला हेंच एक विशेष कारण झालें.

" मुझे मटन खिलाओगे भय्या ? "

" हां, अगर मुझे गाना सिखाओगे तो ! " आणि ह्या देवाणघेवाणीच्या काल्पनिक करारावर सह्या होऊन शिक्कामोर्तब झालें व मटनाच्या रतिबावर मोहनरावांचें, कधीं कल्पनेंतहि नसलेलें एक अत्यंत खानदानी असें पायाशुद्ध शिक्षण सुरू झालें. वेष बावळा असलेला हा इसम म्हणजे विविध कलानिधि आहे हें मोहनरावांच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं; परंतु त्याची खरी ओळख त्यांना सहा महिन्यांनंतर पटली. त्याचें असें झालें—

खाँसाहेब भूर्जीखाँ ( अलादिया खाँसाहेबांचे चिरंजीव ) सहज एकदां शिवराज मंडळींत आले, आणि एका खाजगी भेटींत मोहनरावांच्यासमोर त्यांनीं अहमदभय्याला कुर्निसात केला. बाजूला उभे असलेल्या मोहनरावांकडे वळून ते म्हणाले—

" बाबा मोहन, हा माणूस म्हणजे आमच्या वडिलांच्या गुरूचा अर्थात् खाँसाहेब जहांगिर खाँसाहेबांचा नातू आहे. फार थोर व्यक्ति आहे ही ! "

वर्षानुवर्षें सेवा करूनहि जें मिळणें दुर्लभ तें किती सहजतेनें आपल्याला मिळतें ह्याची मोहनरावांना त्या वेळीं जाणीव झाली. ज्याची आपण सेवा करावी, तोच उलट आपली सेवा करतो. आपण फक्त मटन विकत आणतों; परंतु तें शिजवणें, खाऊं घालणें, आणि भांडींदेखील घांसून ठेवणें, मायेनें आपली वास्तपुस्त करणें...इत्यादि गोष्टी आठवून त्यांना फार वाईट वाटलें. ते म्हणाले देखील—

"खाँसाहेब, तुम्हीं मला असं अज्ञानांत कां ठेवलं ?"

"जाऊं दे रे, तो भूर्जी एक वेडा आहे नि तूं सात वेडा आहेस." एवढें बोलून खाँसाहेबांनीं बोळवण केली झालें !

सतत अडीच-तीन वर्षे अव्याहतपणें अहमदभय्याकडून मोहनरावांना तालीम मिळाली.

घरच्या अडचणीची आणि तांतडीनें निघून येण्याबद्दलची तार आल्या-मुळें मोहनराव कंपनी सोडून निघून आले; परंतु येतांना त्यांना फार वाईट वाटलें; खाँसाहेबांनाहि वाईट वाटलें. आपला हा प्रेमळ भाऊ आपल्याला सोडून चालला आहे, कदाचित् त्याची आपली पुन्हा भेट झाली तर झाली, ह्या कल्पनेनें त्यांना वाईट वाटलें. जातां जातां आपली भेट म्हणून एक अत्यंत अवघड राग मोहनरावांना त्यांनीं शिकवला. ती आठवण घेऊन मोहनराव घरीं परत आले, पण पुन्हा कंपनींत गेले नाहींत. कुटुंबियांच्या सुखासाठीं त्यांना आपल्या सर्व छंदांवर पाणी सोडावें लागलें आणि त्यांनीं बँकेंतली नोकरी स्वीकारली.

ह्यानंतरचा आयुष्यक्रम म्हणजे अर्थातच गृहस्थाश्रम आला. मुंबईतल्या गेल्या पस्तीस वर्षांतल्या आपल्या नियमित वास्तव्यांत त्यांनीं विविध तऱ्हेचीं स्थित्यंतरें पाहिलीं. इथें त्यांना पै. खाँसाहेब मंजीखाँ, मरहूम अलादियाखाँ आदि थोर थोर गायकांचा सहवास लाभला, त्यांच्याशीं चर्चा करायला मिळाल्या, बरेंवाईट कळलें; आणि मिळविलेल्या पक्क्या ज्ञानांत भरहि पडली. ह्यामुळें अनुभवांचें वैशिष्ट्य मुबलक झालें. सहज बोलतां बोलतां देखील दुसऱ्यानें लक्षांत ठेवण्यासारखें मोहनराव बोलतात.

" अरे आवाज कसा असावा ? बुलंद, रंगेल नजाकतीचा. जितना लंबा, उतना चौडा, उतना ही पाक. "

" लेको, ' व्हॉइस कल्चर ' शिकण्यासाठीं बाहेर कशाला जातां ? केशरबाईकडे जा. तिच्या साधनेची चौकशी करा. अरे, खाँसाहेब अलादिया खाँ सांगायचे, कीं तिच्यासारखी मेहनती आणि पल्लेदार आवाजाची बाई मला आयुष्यांत कुठें मिळाली नाहीं. इथें घरचं सोडा लेको आणि बाहेर जा ! "

अगदीं स्पष्ट माणूस ! चिडला म्हणजे भीडमुर्वत ठेवायचा नाहीं. खऱ्या गुणाची तोंडभर स्तुति करील.

" काय सुंदर गाते हो ती माणिक वर्मा ? वा ! वा ! अलीकडच्या मुलांत ही शोभा गुर्टु चांगली आहे हो ! हो ! आणि ती मालविका रॉय देखील बरी आहे. हा राम मराठे कुशाग्र आहे हां ! काल तुम्ही जयपुर-वाले ऐकला काय ? तो गुणी गंधर्व, फार चांगला आहे तो. असं गायला पाहिजे. तुमच्यामुळें गुरु पुढें आलाय् ! केशरबाईमुळें अलादियांचं नांव झालं कीं नाहीं ? " हें बोलणें इथेंच तोडून मग ते राजकारणांत घुसतील, साहित्यांत घुसतील, पु. ल. देशपांड्यांच्या लेखाचें कौतुक करतील; आणि कुठें तरी, कसा तरी लिहिलेल्या फालतू संगीत रिपोर्टावर कडक ताशेरे झाडतील.

कृष्णराव चोणकर, निमकर, टिळक, सुरेश हळदणकर, पोतदार, रतन पै, कमल सांगेकर हा त्यांचा शिष्यपरिवार. ' उदंड मुलें नानापरी, वडिलांचें मन अवघ्यांवरी. ' ह्याप्रमाणें सगळ्या शिष्यांवर सारखें प्रेम. गुरुपौर्णिमेला तें बघून घ्यावें.

उनिआरा घराणें हें इतर सांप्रदायी घराण्यांपेक्षां फार वेगळें घराणें आहे. कै. भास्करबुवांसारख्यांनीं दोन घराण्यांची गायकी पचविल्यानंतर मागाहून त्या घराण्याचा गंडा बांधला. बड्याबड्यांची मति कुंठित व्हावी अशी त्यांच्या रागांची मांडणी, आणि अस्ताई-अंतरे. दैववशात् मोहन-रावांना तें सहजसुलभ मिळालें. जसें तें मिळालें तसेंच त्यांनीं शिष्यांना दिलें ह्यांतच त्यांचें थोरपण सामावलेलें आहे.

असे आहेत मोहनराव !

* *
*



कला-दिग्दर्शक

# मुरलीधर रामचंद्र आचरेकर

आचरेकरांच्या जीवनविहारावर दृष्टिक्षेप टाकला, तर एक तुफानी घोडदौड आपल्या नजरेसमोरून सरकत जाते. वास्तविक एका श्रद्धाळू, स्वप्नाळू, ध्येयनिष्ठ अशा पिढींत आचरे-करांचा जन्म झालेला; परंतु आत्मनिष्ठ वृत्ति झुगारून देऊन, मागच्यांना मागें ढकलून, बरोबरीच्यांना बाजूला सारून आणि पुढच्यांना धक्का देऊन ज्यांनीं आपला विकास धडाडीनें साधला, असे गेल्या पिढींतले जे कांहीं मोजकेच कलावंत आपल्या नजरेसमोर चटकन् उभे राहतात, त्यांपैकीं आचरेकर हे प्रथम श्रेणींतले होत.

तिसऱ्या इयत्तेंतच शिक्षण सोडून कलाक्षेत्रांत प्रवेश; तें शिक्षण पुरें व्हायच्या आंत चित्रकला स्टुडियो काढला; त्यावरच्या कमाईतून लगेच ' लिथो प्रेस ' घेतला; तो धंदा व्यवस्थित चालू असतांना पदवीसाठीं पुन्हा स्कूल ऑफ आर्टमध्यें प्रवेश; प्रदर्शनांत आपल्या चित्राला रौप्य-पदकाचा मान मिळाल्यावर, ती स्फूर्ति घेऊन मागचापुढचा विचार न करतां उच्च शिक्षणाच्या ध्यासानें विलायतेला प्रयाण; प्रसिद्ध अशा ' गोलमेज परिषदेचें ' प्रत्यक्ष चित्रण करून मान्यवर लोकांकडून शाबासकी; भारतांत परतल्यावर

बादशहा पंचम जॉर्जच्या कारकीर्दीच्या रौप्यमहोत्सवाचें चित्रण करण्यासाठीं व्हाइसरॉयच्या शिफारशीनें इंग्लंडला पुन्हा प्रयाण; स्कूल ऑफ आर्टचे डेप्युटि डायरेक्टर म्हणून नेमणूक; 'रूपदर्शिनी' ह्या उत्कृष्ट पुस्तकाच्या प्रकाशनासाठीं 'रेखा पब्लिकेशन' ह्या संस्थेची स्थापना; कलादिग्दर्शक म्हणून सिनेमासृष्टींत प्रवेश; एक अत्यंत यशस्वी कलादिग्दर्शक म्हणून ख्यातनाम; १९५२ मध्यें इंडियन फिल्म डेलिगेशनबरोबर प्रतिनिधि म्हणून अमेरिकेला प्रयाण; स्कायस्क्रेपर्स ॲंड फ्लाइंग गंधर्व, ह्या, अमेरिकेंतल्या अनुभवांवरील सचित्र पुस्तकाचें लेखन आणि 'रेखा प्रकाशन' तर्फे त्याचें प्रकाशन; 'आचरेकर्स फाइन आर्ट अकादमी' ह्या संस्थेंत विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचें कार्य इत्यादि इत्यादि !

असा हा आचरेकरांच्या जीवनविहारावरील धांवता दृष्टिक्षेप ! एवढ्या विविध भूमिका एकाच क्षेत्रांत यशस्वीरीत्या वठवणारे आचरेकरांसारखे चित्रकार फारच थोडे आहेत.



**श्रुतिका** : आचरेकरांचें तैलरंगांतील एक आलेखन

आचरेकरांची वृत्ति अमीरी आहे. "चराचर सृष्टींतल्या सर्व सुखदुःखांची अनुभूति इतर सामान्य माणसाप्रमाणें कलावंतालाहि झाली पाहिजे. देहाचं भान विसरून सर्वमुक्त राहणं, डोक्यावरील केस आणि दाढी वाढवून उगाच फकीरी वृत्तीचं ढोंग करणं ह्यापासून मी बाजूला आहें ! सामान्य माणूस कर्तबगारीच्या जोरावर केवळ स्वप्नवत् अशीं सुखं मिळवूं शकतो; मग सामान्यापासून आगळ्या असणाऱ्या कलावंताला तीं सुखं कां मिळवितां येऊं नयेत ? त्यासाठीं त्यानें आपल्या कलेला राबवली पाहिजे ! ती 'अमीरी' भोगली पाहिजे; नि मग वाटल्यास तुम्ही विरागी व्हा ! आणि आत्मानंदा-

साठीं भव्य दिव्य असं कांहीं निर्माण करा !" हे त्यांचे नेहमींचे विचार आहेत; आणि आतांपर्यंत तशा वृत्तीनें ते वागतहि आलेले आहेत.

जी जी आयुष्याच्या कल्याणाची संधि आली तिच्याकडे दुर्लक्ष न करतां, त्यांनीं अवधान राखून तिचा फायदा घेतला. जिथें बंडोखोरीचा अवलंब करायला पाहिजे तिथें तो केला; आपलें चुकलें तिथें नमतेंहि घेतलें; आणि प्रगतीच्या मार्गावरील घोडदौड चालू ठेवली. आज आचरेकर अशा ठिकाणीं आहेत, कीं नव्या पिढींतल्या कलावंताला त्यांच्याकडे पाहण्यासाठीं मान उंचावतांना ती बरीच ताणावी लागेल !

•



लुब्धा : आचरेकरांचें एक वजनदार आलेखन

आचरेकरांच्या वेळच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीसमोर एक विशिष्ट परंपरा होती. ध्येयवादाबद्दलच्या संकेताच्या मर्यादा शिष्टमान्य झालेल्या होत्या. त्या मर्यादेपर्यंत जो जाऊं शके, तो सर्वमान्य होई. श्रेष्ठांकडून त्याच्यावर पूर्णत्वाचें शिक्कामोर्तब झाल्यानें तोहि समाधानाचा निःश्वास सोडी, आणि व्यवसायाला मोकळा होई. त्यांतल्या त्यांत प्रपंच साधून जो थोडासा 'परमार्थ' करीत असे त्याचें चारचौघांत थोडेंसें कौतुक होई, त्याला कृतार्थता वाटे; पण ह्याच परंपरेच्या बंधनांच्या छायेंत राहूनहि विजेसारखे चमकले आचरेकरच !

श्री केतकरांकडे प्राथमिक शिक्षण चालू असतांनाच आचरेकरांनीं लहान सहान कामें करून द्रव्यार्जन करायला सुरुवात केली होती. पुढें 'स्कूल ऑफ आर्ट' मध्यें चौथ्या वर्षाचा अभ्यासक्रम चालू असतांना तर त्यांची कमाई कांहीं शेंकड्यांच्या घरांत होती. एक छोटासा कमर्शिअल स्टुडिओ व एक लिथो प्रेसहि ते चालवीत होते. वाढतीं कामें मिळूं लागलीं,

तेव्हां एक दिवस शिक्षणाला रामराम ठोकून त्यांनीं आपलें सर्व लक्ष धंद्यांत केंद्रित केलें. अर्थार्जन जसजसें वाढत जातें तसतसा त्या मोहाच्या विळख्यांत सांपडलेला माणूस अधिकाधिक आवळत जातो. त्यांतच त्याला अमाप सुख वाटत असतें. आचरेकरांचेंहि तसेंच झालें होतें. मात्र मनाला एक रुखरुख सलत होती. बरोबरीचे चित्रकार पदवीच्या बिरुदावलीनें मिरवत होते. आचरेकरांजवळ ती नव्हती. मिळवीत असलेल्या पैशानें ती विकत घेतां येत नव्हती. ' बॉम्बे आर्ट सोसायटीचीं ' प्रदर्शनें भरत, आचरेकरांचे समवयस्क पदवीधर पारितोषिकें मिळवीत. तीं प्रदर्शनें आणि त्यांतले गौरवांकित मानकरी पाहून परत येण्यापलीकडे आचरेकरांच्या हातांत दुसरें कांहीं नव्हतें. त्यांच्या मालिकेंत आपलें नांव गोवलें गेलें पाहिजे, असें मनाशीं कितीहि घोकलें तरी तें होणें शक्य होतें काय? त्यासाठीं पुन्हा ' स्कूल ऑफ आर्ट 'मध्यें गेलें पाहिजे; शिक्षणक्रम पुरा करून ' पदवी ' घेतली पाहिजे; धंद्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून मोठमोठीं चित्रें केलीं पाहिजेत; तीं प्रदर्शनांत मांडलीं पाहिजेत......

अशा ह्या भंडावणाऱ्या विचारांत पांच वर्षें लोटलीं होतीं. मग एकाएकीं आचरेकरांच्या सुप्त बंडखोर वृत्तीला जाग आली. त्यांनीं लिथो प्रेस विकून टाकला, स्टुडिओ मित्राच्या हवालीं केला आणि एका भल्या दिवशीं ' स्कूल ऑफ आर्ट 'मध्यें पदवी परीक्षेसाठीं नांव नोंदवून स्वारी अभ्यासक्रमासाठीं हजर झाली. त्यांना पाहून धुरंधर मास्तर थक्क झाले.

" आचरेकर, अरे तुझ्या बरोबरचे विद्यार्थी तर केव्हांच ' डिप्लोमा ' घेऊन गेले. आणि तूं आतां इतक्या उशिरानें आलास ? "

" पण मला ' डिप्लोमा ' घेतल्याशिवाय चैन नाहीं मास्तर. "

" अरे पण तुझा तो लिथो प्रेस आणि स्टुडियो ह्यांकडे तुझं दुर्लक्ष झालं, तर तुझा चांगला चालता व्यवसाय गोत्यांत नाहीं का येणार ? "

" मीं तो व्यवसाय पूर्णपणें बंद केला आहे मास्तर ! मला पदवी हवी आहे ! "

मास्तर कांहीं बोलले नाहींत. कुतूहलानें त्यांनीं आचरेकरांवर एक वात्सल्यमय दृष्टिक्षेप टाकला एवढेंच; पण नव्यानें सुरू केलेल्या ह्या आयुष्याला

पहिला जबरदस्त धक्का वर्षअखेरीस मिळाला होता. आचरेकर डिप्लोमाच्या परीक्षेंत नापास झाले होते. त्यांचें मन खट्टू करणारी पहिली गोष्ट घडली होती. त्यांतल्यात्यांत समाधान एवढेंच होतें, कीं ' बॉम्बे ऑर्ट सोसायटीच्या ' प्रदर्शनांत ठेवण्यासाठीं बरींचशीं चित्रें बाकीच्या वेळांत त्यांना करतां आलीं. तीं त्यांनीं प्रदर्शनांत ठेवलींहि; आणि आश्चर्य असें, कीं ध्यानीं मनीं नसतांना त्या वर्षीचें ' रौप्यपदक ' आचरेकरांच्या चित्राला मिळालें; इतकेंच नव्हे तर मांडणीचा एक उत्तम नमुना म्हणून त्या वेळचे आर्ट स्कूलचे प्रिन्सिपॉल सर ग्लॅडस्टन सॉलोमनसाहेब, ह्यांनीं तें चित्र विकत घेऊन स्कूल ऑफ आर्टच्या आर्ट गॅलरींत ठेवून दिलें. ह्या घटनेमुळें आचरेकरांच्या जीवनाला वेगाची गति मिळाली. एकदां नापास झाल्यानें निराश होण्या-ऐवजीं प्रदर्शनांत मिळवलेल्या रौप्यपदकानें त्यांचा उत्साह वाढला आणि स्कूल ऑफ आर्टमधल्या ' होमवर्क ' प्रदर्शनांत मिळालेल्या बक्षिसानें तो द्विगुणित झाला. ह्याला साथ मिळाली सॉलोमनसाहेबांच्या कृपादृष्टीची व डिप्लोमा परीक्षा पास झाल्यावर पुढील उच्च शिक्षणासाठीं विलायतेला जाण्या-चेहि विचार मनांत जोरानें घोळूं लागले. आप्तेष्टांत ते बोलून दाखविल्यानें त्याला चालना मिळाली. कुणीं स्नेह्यानें वर्तमानपत्रांत बातमी म्हणून ती छापूनहि टाकली.

आतां काय करावें ! विलायतेला जायचें म्हणजे तें सोपें का होतें ? चित्रें काढून इथें पैसा कमावतां येईल; पण तेथें कोण कुत्रा विचारणार ? लोक आपले विचारीत " आचरेकर, केव्हां चाललांत ?" परंतु निश्चित तारखेचें उत्तर आचरेकरांजवळ होतें थोडेंच ? अशा वेळीं ज्ञातिबांधव आठवतात, ज्ञातिसंस्था आठवतात; परंतु आचरेकरांना तेथें अपमानित व्हावें लागलें होतें. पुन्हा एकदां त्यांच्यांतली हट्टी वृत्ति जागी झाली. जवळची सर्व पुंजी गोळा करून त्यांनीं इंग्लंडच्या बोटीच्या तिकिटांत खर्च केली आणि राहिलेली बाकी फक्त २५ पौंड बरोबर घेऊन त्यांनीं इंग्लंडच्या बोटींत पाऊल ठेवलें.

' धारिष्ट्यास दैव धार्जिणें ' अशी एक म्हण आहे. व्हायचें असेल तें होईल अशा निश्चयानें आचरेकरांनीं इंग्लंड गांठलें. इंग्लंडमध्यें त्यांना

त्यांच्या अंगीं असलेल्या हरहुन्नरीपणाचा फार उपयोग झाला. कुठें एका सिंहली गाणाऱ्याबरोबर तबल्याची साथ कर, कुठें मेनकेच्या ताफ्याबरोबर सतारिया म्हणून बस, चित्रकलेंतलीं बारीक सारीक कामें कर, अशा रीतीनें 'रॉयल कॉलेज ऑफ आर्ट' मधलीं कष्टदायक पावणेदोन वर्षें गुजरलीं. ह्या अवधींत इतिहासप्रसिद्ध अशा गोलमेज परिषदेचें चित्रण त्यांनीं प्रत्यक्ष केलें.

भाग्यरवि उगवायची वेळ झाली, कीं हवी ती संधि आपोआपच चालून येते. गोलमेज परिषदेचें तें चित्र प्रसिद्ध अँग्लोइंडियन पुढारी सर हेन्री गिडनी ह्यांनीं पाहिलें आणि आचरेकरांची ओळख करून घेतली. त्या ओळखीचा आचरेकरांनीं योग्य फायदा करून घेतला. त्यांनीं सर हेन्रीचें तैलचित्र करून दिलें. योग्य मोबदल्याबरोबरच सर हेन्रींनीं, लेडी विलिंग्डनला आचरेकरांनीं केलेलें गोलमेज परिषदेचें चित्र दाखवून, आचरेकरांची व्हाइसरॉयच्या ह्या पत्नीशीं ओळख करून दिली. लेडी विलिंग्डननीं ह्या चित्राची फार स्तुति केली. परिणामीं त्या वेळच्या हिंदुस्थान सरकारतर्फे तें चित्र पांच हजारांना विकत घेण्यांत आलें. (बहुधा हें चित्र 'मेंबर्स लॉबीमध्यें' असावें.) लेडी विलिंग्डननीं हिंदुस्थानांत परतल्यावर खास शिफारस केल्यामुळें व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डनचें मोठें तैलचित्र करण्यासाठीं आचरेकरांना दिल्ली येथें पाचारण करण्यांत आलें. व्हाइसरॉय-सारख्या बड्या असामीचें तैलचित्र करायचा मान एकदां मिळाल्यावर मग काय विचारतां ? आचरेकरांच्या दाराशीं अनेक राजेमहाराजांच्या खाजगी चिटणिसांची रीघ लागली. ग्वालेर काय, जयपूर काय, इंदौर काय ! अखेर हीं कामें आवरायला त्यांना दिल्लींतच राहावें लागलें. उन्हाळ्यांत बडी मंडळी सिमल्याला जात. अनायासें आचरेकरांना सिमल्याच्याहि वाऱ्या कराव्या लागत. हें सर्व चालू असतांना आणखी एक घटना घडली. इंग्लंडचे बादशहा पंचम जॉर्ज ह्यांच्या कारकीर्दीच्या रौप्यमहोत्सवसमारंभाचें प्रत्यक्ष चित्रण करण्याकरितां तिथें जाण्याबद्दल हिंदुस्थान सरकारतर्फे त्यांना विनंती करण्यांत आली. आणि ह्या सर्वोच्च मानाचा आचरेकरांनीं सानंद स्वीकार केला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २१०६६ दि: ५/२१
क्रमांक ९०० नों: दि: २/७/६१

महोत्सवाचें प्रत्यक्ष चित्रण करणें म्हणजे सामान्य गोष्ट नव्हती. तें काम आतांपर्यंत युरोपियन चित्रकारांशिवाय दुसऱ्या कुणीं केलें नव्हतें. प्रत्यक्ष इंग्लंडमध्यें ह्या बाबतींत त्यांना फार त्रास सहन करावा लागला; पण आचरेकरांनीं धडाडीनें आपली दाद लावून घेतली आणि चित्रण पुरें केलें. त्यांतलें एक चित्र ' हाऊस ऑफ पार्लमेंट ' मध्यें आहे. बाकीचीं चित्रें बिकानेरच्या महाराजांनीं विकत घेतलीं.

दिल्लीला परतल्यावर आधींपासून तुंबलेलीं कामें पुन्हा चालू झालीं होतीं. आचरेकरांनीं मनापासून त्यांच्यांत लक्ष घातलें होतें. व्यवसाय उत्तम प्रकारें चालत असल्यानें दिल्ली सोडून जायची गरज नव्हती. तिथेंच स्थायिक व्हायचा विचार करून आचरेकरांनीं स्वतःसाठीं उत्तम जागा, मोटर आदि सुखसोयींच्या गोष्टीहि घेतल्या होत्या; परंतु त्यांचें मन स्थिर झालेलें असलें, तरी दैव ' जिप्सी ' होतें !

इथें मुंबईत त्या वेळीं आर्ट स्कूलचे प्रिन्सिपॉल सॉलोमनसाहेब निवृत्त झाले होते; आणि जिरार्डसाहेब त्यांच्या जागीं गेल्यानें डेप्युटि डायरेक्टरच्या जागेवर लायक माणसाच्या नेमणुकीच्या ते शोधांत असतांना त्या जागेसाठीं आचरेकरांच्या नांवाची शिफारस झाली. आचरेकरांनीं त्या वेळीं ग्वालेर दरबारच्या सजावटीचें काम घेतलेलें होतें; शिवाय इतर कामें बरींच होतीं. दिल्ली सोडायचा त्यांचा विचार नव्हता; परंतु ' पैशाच्या दृष्टीनें नसलें तरी सन्मानाच्या दृष्टीनें ', अशा जागेवर आपली नेमणूक होत असतांना सोडा कशाला ? पैसा काय पुढें केव्हांहि मिळवतां येईल. अशा विचारानें तडका-फडकीं त्यांनीं दिल्ली सोडली आणि ' डेप्युटि डायरेक्टर ' म्हणून ते स्कूल ऑफ आर्टमध्यें दाखल झाले; परंतु हा सौदा त्यांना अत्यंत महागांत पडला. त्याचीं दुःखें त्यांना पुढें कित्येक दिवस भोगावीं लागलीं. जिरार्डच्या हाता-खालीं काम करणें म्हणजे एक मोठेंच दिव्य होतें. रोज कटकटी निर्माण होत. शिपायांचीं भांडणें, मास्तरांच्या कागाळ्या, विद्यार्थ्यांची मस्ती इत्यादि गोष्टींची निरवानिरव करतांना दिवस पुरत नसे; आणि स्वतःचें खाजगी काम कांहींच करतां येईना. निरनिराळ्या विषयांची साधना करतां येईल, विद्यार्थ्यांना शिकवतां शिकवतां आपलीहि प्रगति होईल ह्यासाठीं ते स्कूल

ऑफ आर्टमध्यें आले; पण साधना राहिली एका बाजूला आणि नसत्या लफड्यांत आचरेकर सांपडले. दोन वर्षेपर्यंत हा त्रास कसाबसा सहन करून एक दिवस राजीनामा देऊन ते तिथून बाहेर पडले; पण ह्या दोन वर्षांत वातावरणांत केवढा तरी बदल झाला होता. लढाई जोरांत चालू होती. राजेमहाराजांचें चैनीकडे दुर्लक्ष झालें होतें. 'व्यापारी चित्रकलेचें' विश्व बदललें होतें. त्या जागा नव्या पिढींतल्या उदयोन्मुख लोकांनीं व्यापल्या होत्या. सगळीकडे धकाधकी चालू होती.

आतांपर्यंतचें आचरेकरांचें जीवन खुशालचेंडूचें होतें पण स्कूल ऑफ आर्टमध्यें नेमणूक झाल्यावर त्यांनीं गृहस्थाश्रम पत्करला होता. जबाबदारी वाढली होती. जें गेलें होतें त्याचा विचार करून भागणार नव्हतें. नवे मार्ग शोधायला हवे होते.

अचानक एके दिवशीं आचरेकरांचा पत्ता हुडकीत प्रसिद्ध निर्माते 'कारदार' ह्यांच्याकडून एक माणूस येऊन, त्यानें कारदारांनीं त्यांना बोलावलें असल्याचा निरोप सांगितला. आचरेकरांनीं काढलेलीं उमर-खय्यामच्या जीवनावरील कांहीं चित्रें कारदारांना फारच आवडलीं होतीं. ह्या माणसाचा आपल्या 'शहाजहान' ह्या चित्रपटासाठीं उपयोग करून घ्यायचें कारदारांनीं ठरविलें होतें; परंतु सिनेमाच्या तंत्राची आपल्याला कांहींच माहिती नाहीं, असें जरी आचरेकरांनीं प्रत्यक्ष भेटींत त्यांना सांगितलें, तरी तें शिकून घेण्यासाठीं वाटेल त्या सवलती आचरेकरांना द्यायला कारदारांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं; आणि अशा रीतीनें आचरेकरांचें पाऊल सिनेमांत पडलें.

'शहाजहान' चित्रपटासाठीं आचरेकरांनीं अविश्रांत कष्ट केले. बारीक सारीक गोष्टींसाठीं कित्येक रात्री जागून काढल्या. फलतः त्यांच्या ह्या पहिल्याच चित्रपटानें उत्तम कला-दिग्दर्शक असा किताब मिळवून दिला. आतांपर्यंत कारदार, मेहबूब, पांचोली, राजकपूर, गुरुदत्त, नायडू इत्यादि निर्मात्यांबरोबर अनेक चित्रपटांचें कला-दिग्दर्शन त्यांनीं केलेलें आहे. विशेषतः 'आवारा' ह्या राजकपूरच्या चित्रपटांत त्यांनीं निर्मिलेलें स्वप्न-

रंजन अद्वितीय होतें. तज्ज्ञांनींहि त्याची वारेमाप स्तुति केली आहे; आणि त्याबद्दल अनेक पारितोषिकेंहि त्यांना मिळालेलीं आहेत.

'रेखा पब्लिकेशन' ह्या संस्थेचा जन्महि असाच अकल्पित झाला. अजंठ्याला जाऊन, आलेखन करून आचरेकर परत आले आणि 'रूप-दर्शिनी' हें पुस्तक तयार करून त्याचें हस्तलिखित घेऊन ते प्रकाशकाच्या दारांत गेले; पण त्यानें सांगितलेल्या अनेक अडचणी ऐकून तसेच परत आले. मग हें पुस्तक स्वतःच प्रकाशित करायचें ठरवून त्यांनीं त्यासाठीं 'रेखा पब्लिकेशन' ही संस्था भीतभीतच स्थापन केली; परंतु आज ह्या संस्थेचा व्याप वाढला आहे. एक उत्कृष्ट प्रकाशन म्हणून रूपदर्शिनीला अखिल भारतांतलें बक्षिसहि मिळालें आहे. 'फिल्म डेलिगेशन' बरोबर प्रतिनिधि म्हणून अमेरिकेला जाऊन आल्यावर 'स्कायस्क्रेपर्स ॲण्ड फ्लाइंग गंधर्व' हें प्रवासवर्णनात्मक सचित्र पुस्तक हें रेखा पब्लिकेशनचें दुसरें प्रकाशन म्हणून प्रसिद्ध झालें.

असा हा चित्रकार आचरेकरांचा, विस्तारभयास्तव त्रोटक लिहिलेला जीवनपरिचय !

दांडगी अवलोकनशक्ति, जबरा आत्मविश्वास, धडाडीचा पदक्षेप वगैरे गोष्टींनीं जीवनांत त्यांनीं मानाचें स्थान मिळवलेलें आहे. त्यांचें मुख्य वैशिष्ट्य म्हणजे आलेखन. अगदीं मोजक्याच चित्रकारांत त्यांच्यासारखें प्रमाणबद्ध आलेखन आढळेल. पेन्सिल किंवा क्रेयॉन एवढ्याच साधनांनीं फळ्यावर ताणलेल्या कागदावर ते खेळायला लागले, कीं लीलेनें चाललेल्या त्या आलेखनांकडे पाहतां पाहतां मन एका वेगळ्याच ऊर्मीनें भरून येतें. त्या आलेखनांतली प्रमाणबद्धता, मांडणी, सुंदर बोलकी रेषा इत्यादि गोष्टी जादूची कांडी फिरवल्याप्रमाणें ज्या वेळीं आकार घेऊं लागतात, त्या वेळीं त्यांची ती किमया पाहून वाटतें, ह्यांच्या पिढीनें केवढी जबरदस्त तपश्चर्या केली असेल ! समूहचित्रांचें असें यथातथ्य आणि प्रमाणबद्ध आलेखन, ह्यापुढें ह्या विसाव्या शतकांत एखाद्याच्या हातून उतरेल कीं नाहीं शंकाच आहे ! नव्या पिढींतल्या कलावंताचे डोळे वास्तवाचें अत्यद्भुत रूप शोधून काढण्यासाठीं भिरभिरत आहेत. पारंपरिक स्वरूपाच्या वास्तव चित्रणाला

आज कारागिरी म्हटलें जातें. श्रद्धाळु, स्वप्नाळु माणसाची–जरी तो कलावंत असला तरी त्याची–गणना आज वेड्यांत केली जाते; परंतु हा सगळा कालमहिमा आहे. ‘ गीता ’ तीच – जी भगवंतांनीं अर्जुनाला सांगितली; परंतु ज्ञानेश्वरांपासून विनोबांपर्यंतच्या बुद्धिवाद्यांनीं तिचा गूढार्थ वेगवेगळ्या तऱ्हेनें स्पष्ट करून सांगितला ! ज्याला ज्याचा आवडेल, समजेल त्यानें त्याकडे वळावें.

नवचित्रकलेबद्दल बोलतांना आचरेकर एकदां म्हणाले होते, “ कांहीं प्रतिभावंतांनीं स्तिमित करून सोडण्यासारखा आविष्कार अवश्य केलेला आहे; किंबहुना बंधनाच्या पोलादी चौकटींतून मोकळें करून त्यांनीं स्वतंत्र विचारशक्तीला चालना दिली, असंच मी म्हणेन; परंतु ह्या मोरांबरोबर कांहीं लांडोरींचा धुडगूस पाहिला म्हणजे मात्र आमच्यासारख्यांना दुःख होतं. ” परवां बोलतां बोलतां सहज चेष्टेनें मीं त्यांना म्हटलें होतें—

“ आचरेकर, इथपर्यंतची नेत्रदीपक मजल तुम्हीं मारलीत; आतां पुढें काय ? ”

“ अहो, गेलीं पन्नास वर्षं मीं काय केलं ? पहिलीं वीस वर्षं शिक्षणांत गेलीं. पुढें कळायला लागतं न लागतं तों प्रपंच आठवला; राजाराणीच्या संसाराला सुरुवात झाली. त्यामुळें त्यापुढचीं वर्षं नव्या संसाराचं बस्तान बसवण्यांत गेलीं. तोंपर्यंत चाळिशी आली. म्हणजे कलेंतल्या आत्म्याच्या साक्षात्काराचा किरण ज्या वेळीं आपल्याला दिसायला लागतो, आणि आतां कांहींतरी केलं पाहिजे असं आपल्याला वाटतं, त्या वेळीं जीव थकलेला असतो; दुसरा मजलादेखील चढवत नाहीं आणि मग वाटायला लागतं, अरे अरे, आपण कांहीं केलं नाहीं. ” मला मात्र वाटतें, आचरेकरांच्या पिढींतले सर्वच चित्रकार व्यासंगी होते; ध्येयवादी होते. ते सर्वच आलेखन उत्तम करीत; परंतु ठसकेदार, वजनदार आणि तेवढेंच रेखीव आलेखन करावें आचरेकरांनींच.

**
*



## श्रद्धाळु संगीत-निर्देशक
## वसंत देसाई

“ असाध्य तें साध्य । करितां सायास । कारण अभ्यास ”

असें महाकवि तुकारामांनीं स्वानुभवानें सांगितलें. भारतांतल्या ख्यातनाम संगीतनिर्देशकांत असामान्यत्व पावलेले श्री. वसंत देसाई ह्यांचेंसुद्धां तसेंच आहे. आज ते कीर्तीच्या शिखरावर आहेत; परंतु त्यासाठीं त्यांना करावा लागलेला अट्टाहासहि विलक्षण आहे. वसंतरावांचें अफाट यश हें सहजसाध्य नसून, गेल्या तेहतीस वर्षांच्या खडतर कष्टांनीं पेरलेल्या संगीतभक्तीच्या संचिताचें तें अत्यंत गोमटें व रसाळ असें फळ आहे.

ध्येयसिद्धीसाठीं गेल्या पिढीला अविश्रांत श्रम करावे लागले. तापत्रय भोगावे लागले. त्या मानानें आजची पिढी अत्यंत भाग्यवान् म्हटली पाहिजे; परंतु गेल्या पिढीनें भोगलेल्या त्या झंझावाती जीवनामुळें त्यांच्या अनुभवाच्या पंखांना गरुडपंखांचें बळ लाभलें. त्या कीर्तिवंत, कर्तबगार आणि आदर्श निर्माण करणाऱ्यांच्या चरित्रांकडे आपण लक्ष दिलें, तर प्रथमदर्शनींच आपल्या दृष्टीसमोर त्यांच्या जाज्वल्य निष्ठा, दृढ निश्चय, कमालीची सोशिक वृत्ति व अंगिकारलेल्या ध्येयाबद्दलची अपार श्रद्धा

इत्यादि गुण दिसूं लागतात. आशा–निराशेच्या फेऱ्यांत सांपडून चिंतेच्या भोंवऱ्यांत सांपडलेल्या त्यांच्या नावेला कित्येक वेळां नावाड्याशिवाय पैलतीर गांठावें लागलें. कित्येकांनीं फक्त कर्म करणें एवढाच आपला अधिकार मानला, फलाची अपेक्षा केलीच नाहीं. कांहींना 'याचि देहीं' फलप्राप्ति झाली; पण ते राहिले साधुवृत्तीनें, इतरांना मार्गदर्शन करीत–दीपस्तंभासारखे. त्या निष्ठावंतांचीं चरित्रें जाणत्यांकडून ऐकलीं कीं हृदय भरून येतें; आपोआप हात जुळतात; श्रद्धा जागृत होते.

वसंतरावांना स्फूर्ति दिली ती अशाच चरित्रांनीं. संगीताराधनेसाठीं लागणारी शुद्ध निष्ठा कुलपरंपरेनें त्यांच्या रोमरोमांत होती. गांवच्या देवळांतल्या देवानें, रोज ढोलकें घेऊन आपल्यासमोर वेडींवांकुडीं तरीहि भक्तीनें गायिलेलीं भजनें ऐकून त्यांना लयकारीचें वरदान दिलें होतें. आणि अस्मिता जागृत करणारी आईची करडी शिकवण पुनः पुन्हा साद घालीत होती "वसंता, तूं कांहीं तरी केलं पाहिजेस! तूं कांहीं तरी केलं पाहिजेस!"

गोमंतकाच्या उत्तरेकडे पसरलेल्या कोंकणपट्टींतील 'श्रीमठ सोनोर्डे' ह्या खेड्यांत वसंतरावांचा जन्म. तसें देसायांचें कुटुंब सधन; परंतु वडिलांच्या रंगेल आणि उधळपट्टीच्या स्वभावामुळें वसंतरावांच्या आईला मुलांना घेऊन विभक्त राहावें लागलें. अशा रीतीनें बालपणींच वडिलांचें कृपाछत्र हरपल्यामुळें, जेमतेम कुडाळ गांवच्या प्राथमिक शाळेच्या तिसऱ्या इयत्तेचा उंबरठा वसंतराव ओलांडूं शकले. कुडाळ गांवच्या लहानशाच देवळांत रोज रात्रीं भजन होई. गळ्यांत ढोलकें अडकवून वसंतराव भजनाची साथ करायचे. पुढें पुढें ते स्वतः भजनें म्हणूं लागले. गांवचे लोक कौतुक करूं लागले. आपल्या आवाजानें लोकांचें मनोरंजन होतें, त्यावरून आपल्या अंगांत इतरांपेक्षां कांहीं विशेष गुण असला पाहिजे ह्याची वसंतरावांना ह्याच वेळीं जाणीव झाली. त्यांना आसपासच्या पंचक्रोशींतलीं भजनासाठीं आमंत्रणेंहि येऊं लागलीं. रात्रभर भजनें करायचीं आणि पहांटे बैलांच्या गाडींतून पुन्हा भजनें म्हणत गांवांत यायचें हा नित्यक्रम ठरला, व लोकप्रियतत भर घालण्यासाठीं भजनाला नवनव्या चाली लावायच्या छंदाचें बीजारोपण ह्याच वेळीं झालें. आजहि वसतरावांना ते दिवस आठवून

गाडींवरून येतें. गांवच्या सीमेवरचा तो अवघड उतार, भुताटकीनें भरलेला तो 'चांभाराचा व्हाळ', तो पार व्हावा म्हणून बैलांच्या गळ्यांतील घुंगुरूंच्या नादांत केलेला हरिनामाचा गजर आदि गोष्टी आठवल्या म्हणजे ते म्हणतात—

"अहो मीं जीवन पाहिलं आहे! आजच्या ह्या वैभवाचीं बीजं प्रथम तिथें पेरलीं गेलीं. पार्श्वसंगीताची आजची माझी किमया तिथल्या नादब्रह्मांत सामावलेली आहे. घडि घडि ते दिवस आठवतात."

फुलपांखरासारखें जीवन वसंतरावांना फार दिवस लाभूं शकलें नाहीं. 'तुझ्या ह्या भजनी पेशानें योगक्षेमाचा आपला प्रश्न अधिक बिकट होत चाललेला आहे–' अशी जेव्हां मातोश्रींनीं करडी जाणीव करून दिली, तेव्हां स्वारीचे डोळे उघडले. पुनश्च एकदां, आपण कांहीं तरी केलें पाहिजे ह्या जाणिवेनें उचल खाल्ली, आणि १४ वर्षांच्या वसंतानें शेजारच्या गांवीं आलेल्या एका नाटक कंपनींत गुपचुप पलायन केलें; परंतु कंपनीला कांहीं ह्या मुलाचा विशेष उपयोग करून घेतां आला नाहीं. थोडे दिवस राहून गेल्या वाटेनें वसंतराव परत गांवीं आले. ध्येयाच्या मार्गावरील अपयशाचा सौम्यसा फटका वसंतरावांना बसला होता; पण करतात काय? मान खालीं घालून टोलनाक्यावर भावाला मदत करण्यांत दिवस घालवण्यावांचून त्यांना गत्यंतर नव्हतें. फावल्या वेळीं पुन्हा भजनें सुरू झालीं. टोलनाक्यावरच्या वसुलीसाठीं रात्रीचीं जीं जागरणें होत, तीं सुसह्य व्हावीं म्हणून भजनांतली हातपेटी मिळवून–मनोरंजन म्हणून का असेना–वाजवतां वाजवतां स्वरज्ञान होऊं लागलें, आणि प्रकाशाचा एक किरण दिसूं लागला. आपलें विश्व वेगळें आहे; आपण कांहीं तरी निराळें करण्याकरितां जन्माला आलेलों आहों; तें करण्याची जबरदस्त इच्छा आहे; पण मार्ग सांपडत नाहीं. काय करावें?

* * *

"मला ॲक्टर व्हायचंय्!"

शांतारामबापू हंसले. त्यांनीं एकदां आपाद-मस्तक ह्या मुलाला न्याहाळलें, आणि ते कांहीं बोलले नाहींत. त्या मूक वृत्तीनेंच जणूं त्यांना सांगावयाचें होतें

'रे तूं काय बरळतोस? तुला ना शरीर, ना वाणी, ना इतर कसले गुण. आणि नट व्हायची तुझी महत्त्वाकांक्षा! कसं शक्य आहे हें?' परंतु मुलगा कुडाळसारख्या दूरच्या गांवांतून आला होता. त्याच्या अंगांत नसलें, तरी दृष्टींत तेज होतें. दुरापास्त असतांना देखील त्यानें आपली भेट घेतली होती, हा विशेष त्यांच्या लक्षांत आला. त्यांचें मन कळवळलें, आणि ह्या मुलाला त्यांनीं कंपनींत ठेवून घेतलें.

चुलत्याच्या उत्तेजनानें वसंतराव प्रभात फिल्म कंपनींत आले खरे; पण इथें काय करावें हें त्यांना कळेना. मूकपटांच्या त्या जमान्यांत असल्या किरकोळ मुलांचा काय उपयोग होता? पण इच्छा असली म्हणजे मार्ग सांपडतो म्हणतात. वसंतरावांचेंहि असेंच झालें. कोल्हापुरांत राहून त्यांना बराच काळ लोटला होता. नटांच्या यादींत नांव घातलें जाऊन महिना सात रुपये पगारहि झाला होता. नटाला लागणारी शरीर-संपदा कमावण्याचा मार्ग मोकळा झाला होता. रोज १०० जोर आणि १०० बैठका काढणाऱ्यास एक कप दूध मिळायचें. तें कपभर दूध आजकाल ते मिळवूंहि लागले होते. घोड्यावर बसणें, दांडपट्टा फिरवणें, भाला फेंकणें, उड्या मारणें आदि मूकपटांना लागणारीं कसरतीचीं कामेंहि त्यांना येऊं लागलीं होतीं. असेंच एक दिवस सकाळींच कंपनीच्या बिऱ्हाडीं दुधासाठीं धांवत असतां कोल्हापूरच्या देवल क्लबाचे आजीव सभासद बाबा देवल ह्यांनीं ह्या मुलाची मायेनें चौकशी केली. आपली सारी हकीगत सांगून झाल्यावर संगीतसाधने-बद्दलची आपली तळमळ वसंतरावांनीं बाबा देवलांच्या कानावर घातली, आणि त्या पुण्य-पुरुषानें दयार्द्र दृष्टीनें देवल क्लबाचा दरवाजा वसंतरावांसाठीं सदैव उघडा ठेवला.

हिंदुस्थानांतले नामांकित गवय्ये कोल्हापूर संस्थानांत आले कीं, देवल क्लबाला भेट दिल्यावांचून जात नसत. पै. खाँसाहेब मंजीखाँचा सायंकाळचा रियाज देवल क्लबांत होई. कै. गोविंदराव टेंब्यांची रोजची एक फेरी असायचीच. आपल्याला मिळालेली संधि वसंतरावांनीं फुकट घालवली नाहीं. कुणाला सिगारेट आणून दे, कुणाला पान आणून दे, कुणाला चहा आणून दे, कुणाच्या पाठीमागें तंबोरा धरून बस; एखाद्याचा साथीदार

ऐन वेळीं आला नाहीं तर ठेकाहि वाजव, अशीं लहान सहान कामें सेवा-भावानें करणाऱ्या वसंतरावांना त्या गवय्यांकडून शिक्षण मिळालें नसलें, तरी प्रेमळ आशीर्वाद मात्र भरपूर मिळाले. त्या महात्म्यांचे ते समर्थ आशीर्वाद त्या वेळीं नसले तरी पुढील रखरखीत आयुष्याला सांवली देत राहिले.

बोलपटांचें युग सुरू झालें, तशी प्रभात फिल्म कंपनी आपला संच घेऊन पुण्याला आली. कंपनीबरोबर वसंतरावहि आले. आपण कांहीं तरी केलें पाहिजे हा विचार त्यांना सदैव गांजीत होता; पण हातून कांहीं होत नव्हतें. परिस्थितीच निर्माण होत नव्हती. नाहीं म्हणायला व्यायामाच्या नादानें शरीर थोडें पीळदार झालें होतें; आणि ओझरतें का होईना गानदेवतेचें दर्शन त्यांना देवल क्लबांत घडलें होतें. ' अयोध्येचा राजा ' ह्या बोलपटाचें संगीत-दिग्दर्शन गोविंदराव टेंब्यांच्या हवालीं करण्यांत आल्यानें प्रभात फिल्म कंपनीच्या म्यूझिक हॉलमध्यें सांगकाम्या म्हणून राबण्या-पलीकडे वसंतरावांना तिथें विशेष स्थान नव्हतें; परंतु देवल क्लबापासून आपली मनोभावें सेवा करणाऱ्या ह्या मुलाकडे गोविंदरावांनीं वात्सल्यानें पाहिलें. त्याचा संगीत शिकण्याचा नाद आणि सचोटी पाहून हळुहळू आपल्या ज्ञानभांडारांतील एक एक चीज ते वसंतरावांना समजावून देऊं लागले; त्यांचा थोडा थोडा उपयोगहि करून घेऊं लागले.

' अयोध्येचा राजा ' पुरा झाला, ' माया मच्छिंद्र ' झाला आणि असे अनेक बोलपट प्रकाशित होऊन प्रभात कंपनी लौकिकाच्या शिखरावर चढली; परंतु वसंतराव अजून अंधारांत चांचपडत होते. निश्चित ध्येयाचा मार्ग त्यांना दिसत नव्हता. एक फायदा झाला होता. कंपनींत झाडू मारण्या-पासून, ट्रॉली फिरवणें, लाइट धरणें, दिग्दर्शकांच्या हाताखालीं लहानसहान कामें करणें इत्यादि गोष्टींमुळें सिनेमाच्या शास्त्रांतले खांचखळगे समजूं लागले होते. ह्या हरहुन्नरीपणामुळें शांतारामबापूहि विश्वास टाकूं लागले होते. ह्या वेळीं प्रभातमध्यें दोन उत्कृष्ट संगीतदिग्दर्शकांची भर पडली होती. चिकित्सक आणि बुद्धिमान् असे केशवराव भोळे आणि संगीत-कलानिधि मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर. गोविंदरावांपासून लाभलेल्या ज्ञानाचा

विकास पुढें ह्या दोन संगीतदिग्दर्शकांच्या सान्निध्यांत झाला; परंतु अजून ध्येय निश्चित होत नव्हतें; तें अजून सुप्तावस्थेंतच होतें. आतां मात्र एकाएकीं त्याला उजाळा मिळाला. फर्ग्युसन कॉलेजांत वसंतरावांचें गाणें झालें. आणि इथें पहिलें सुवर्णपदक मिळाल्यानें त्यांना स्फूर्ति मिळाली. ध्येय निश्चित झालें. आपण गाणें शिकलें पाहिजे ही भावना दृढ झाली. आणि गणपतींत पुण्यांतल्या गल्लीबोळांत आठ-दहा बैठका झाल्यानें अधिक उत्तेजन मिळालें. पुढच्या वर्षीच्या बेगमीसाठीं म्हणून 'फैज महम्मदखाँचे भाचे आलम खाँ,' ह्यांच्याकडे वसंतरावांनीं रीतसर शिक्षण घ्यायला सुरुवात केली.

अशीं अडीच वर्षें गेलीं; आणि एक दिवस एक गोड बातमी त्यांच्या कानावर आली. 'माणूस' बोलपटांतल्या मुख्य नायकाच्या भूमिकेसाठीं आपली नियुक्ति झाल्याचें त्यांना कळलें. आतांपर्यंत आपण कांहीं तरी केलें पाहिजे हें मनाशीं नुसतें घोकतच राहिलों; तें करण्याची आतां वेळ आली. पडतील ते कष्ट आपण करूं; पण मिळालेल्या संधीचा भरपूर फायदा घेऊं; नायक म्हणून नामांकित होऊं इत्यादि स्वप्नरंजनांत वसंतरावांचे दिवस जात होते; परंतु स्वप्नानें फुगवलेला तो भला मोठा रबरी फुगा अचानक एक दिवस फुटला. वसंतरावांच्या वांट्याला ती भूमिका आलीच नाहीं. अपयशानें त्यांचें मन खट्टू झालें; त्यानें आक्रोश केला; पण सांगणार कुणाला?

प्रभात सोडून शांतारामबापू मुंबईस आले आणि नव्या चळवळी त्यांनीं हातीं घेतल्या. त्या आधीं वसंतराव मुंबईत आलेच होते. प्रभातच्या नांवाची पुण्याई पाठीशीं असल्यानें एक दोन चित्रपटांचें संगीतनियोजनाचें काम त्यांना मिळालें होतें. शकुंतला ह्या आपल्या बोलपटाच्या संगीतदिग्दर्शनासाठीं शांतारामबापूंनीं आपली निवड केली आहे ह्या बातमीनें आयुष्यांतला सर्वांत मोठा आनंद वसंतरावांना दिला; आणि आपली निवड योग्यच झाली, असें अविश्रांत श्रम करून त्यांनीं सिद्ध करून दिलें. कालिदासाच्या ह्या महाकाव्यानें ज्या अनेक महाभागांना अमर केलें, त्यांत संगीतदिग्दर्शक वसंतराव देसायांचीहि वर्णी लागली. साऱ्या भारतवर्षांत वसंतराव देसाई हें नांव दुमदुमलें. राजकमलच्या प्रत्येक बोलपटाचीं आगळीं वैशिष्ट्यें मान्य करतांना श्रेष्ठांनीं

संगीत-दिग्दर्शकाच्या कौशल्याचीहि तारीफ मुक्त मनानें केली. आजवरींची अर्चना फळाला आली; आणि कीर्ति व लक्ष्मीचा वरदहस्त वसंत देसायांच्या मस्तकीं स्थिर झाला. 'अमर भूपाळीनें' महाराष्ट्रालाच नव्हे, सबंध भारताला वेड लावलें तें वसंतरावांच्या कल्पक व श्रद्धामय चालींमुळेंच.

वसंतरावांची आजची स्थिति, जरा सिंहावलोकन केलें तर खुद्द त्यांनाच भ्रमांत पाडते. आपण होतों कुठें, आणि आहों कुठें, ह्याबद्दलच्या विचारानें ते दिङ्मूढ होतात. ज्यासाठीं अमाप कष्ट केले, अट्टाहास केला तें खरोखरीच लाभलें का? हें सारें स्वप्न तर नाहीं ना? कीं पूर्वीं पाहिलें तें सारें स्वप्न होतें? एक ना दोन, अनेक प्रश्न त्यांना भंडावतात; पण कांहीं का असेना, आजची ही परिस्थिति हें केवळ स्वप्न नसून प्रत्यक्षांत आपण ती भोगीत आहों अशी का एकदां त्यांना जाणीव झाली, कीं पुन्हा ते नव्या कार्याला आरंभ करतात; परंतु मन पुन्हा पुन्हा धांवतें तें मागें 'सोनवड्यापासून पुण्यापर्यंत!'

वसंतरावांच्या संगीतांत प्रामुख्यानें जें लक्षांत येतें, ती जबरी लयकारी आणि फुलक्या गीतांतदेखील त्यांनीं कौशल्यानें केलेला शास्त्रीय संगीताचा वापर! आजच्या सिनेसृष्टींत खानदानी संगीत शिकलेले असे संगीत-निर्देशक मोजकेच. वसंतरावांचा क्रमांक त्यांत निश्चितच वरचा. तानरसखाँची परंपरा सांभाळणारे खाँसाहेब इनायत खाँ ह्यांच्यापाशीं त्यांनीं बारा वर्षे अभ्यास केलेला आहे. डागर बंधूंकडे ते दीड वर्ष शिकले, आणि अष्टेकर बुवांकडेहि त्यांना एक वर्ष तालीम मिळालेली आहे. त्यामुळें वेगळ्या रस्त्यानें गेलें तरी मुळांतलें ज्ञान तज्ज्ञांना दिसणें स्वाभाविक. 'खेमटा' हा लोकप्रिय ठेका वसंतराव निरनिराळ्या अंगानें वापरतात. कधीं तो बोलाच्या रूपानें येतो तर कधीं आडवळणानें अनाघाती असा समेवर येतो. आपलें ताल-शास्त्रांतलें प्रावीण्य 'झनक झनक' मध्यें मुक्त हस्तानें वापरण्याची त्यांना ज्या वेळीं संधि मिळाली, त्या वेळीं चंपक सवारी, ब्रह्मताल आदि तालांची पार्श्व-संगीतांत त्यांनीं कुशलतेनें रेलचेल केली. वसंतरावांचा स्वभाव शांतारामबापूंच्या सहवासानें प्रयोगशील बनल्यामुळें, वेगवेगळे प्रयोग करणें त्यांना अधिक आवडतें. बिस्मिल्ला, अमीर खाँ, सलामत, नजाकत आदि गायकांचा योग्य

उपयोग त्यांनीं सिनेमांत केलेला आहे. तो यशस्वीहि झालेला आहे. पार्श्वसंगीताची समय-सूचक योजना करणारा त्यांच्यासारखा कुशल दिग्दर्शक आज विरळा. निदान मला तरी दुसरा कोणी दिसत नाहीं.

एवढ्या पदवीला पोहोंचलेला हा श्रद्धाळु कलावंत एकाकी आहे. त्यांचें मजबूत शरीर पन्नाशीची झुळुक लागल्याची जाणीव देत नसलें, तरी ध्येयाच्या ध्यासानें मस्तकावर चढलेला रुपेरी मुलामा त्यांच्या कष्टसाध्य जीवनाची साक्ष देतो. गुरुजनांबद्दलची श्रद्धा वारंवार त्यांचें मस्तक लववते. 'शांताराम-बापूंच्या शिकवणीचें व कृपेचें हें लेणें आहे,' हे शब्द वारंवार त्यांची वाचा उच्चारते. ह्या श्रद्धेंतच त्यांच्या यशाचें गमक आहे.

ह्या व्यापापासून मुक्त होण्यासाठीं संन्यास घ्यायचा असें ते वारंवार ठरवीत आहेत. आश्रम बांधून राहायची त्यांची इच्छाहि जबरदस्त आहे, पण अदृष्टांत काय आहे देव जाणे !...

* *
*



# तबलानवाज खलीफा
# अमीरहुसेन खाँ

" मी हें असलं हलकं काम करणार नाहीं ! " स्फुंदस्फुंदून रडत 'मुनीर' आपल्या मेव्हण्याला सांगत होता.

" पण तुला तें करावं लागेल. जोंपर्यंत 'कलाकार' म्हणून व्यायची पात्रता नाहीं तोंपर्यंत तुला तें सहन करावं लागेल. अपमान झाला म्हणून तूं रडलास, त्यामुळें फार फार तर तुझी समजूत घातली जाईल; पण आमच्यासारखा मान तुला मिळणार नाहीं. एका थोर उस्तादाचा तूं मुलगा आहेस. कबूल आहे; पण खाणं-पिणं आणि उनाडक्या करणं, ह्याच्या व्यतिरिक्त दुसरा कोणता गुण तुझ्या अंगांत आहे ? सांग. आपलं खानदान सांगायची तुला शरम वाटली पाहिजे. "

उस्ताद अहमदबक्ष रागानें बोलले खरे, पण हीं शीघ्रकोपी माणसें तितक्याच थोर अंतःकरणाचीं, पहाडाएवढ्या उंच मायेचीं. त्यांनीं मुनीरला जवळ घेतला. त्याचे डोळे पुसले. त्याला कुरवाळला. आणि त्याची समजूत घातली; पण मेव्हण्यानें करून दिलेली बोचकी समज मुनीरच्या अंतःकरणाला फार लागली. त्याच संध्याकाळीं त्यानें 'मुझफ्फर नगर' सोडलें आणि तो थेट मुंबईला आला. त्याला पाहून उस्ताद कालेखाँ चकित झाले.

" अब्बाजान, मला तबला शिकवा. अगदीं ह्या घटकेपासून. उद्यां म्हणूं नका; आत्तां सुरुवात करा ! "

एका प्रख्यात गायिकेच्या साथीला सारंगी वाजवीत, निरनिराळ्या शहरीं हिंडणाऱ्या आपल्या जांवयाबरोबर केवळ चैनीकरितां म्हणून गेलेल्या आपल्या ह्या एकुलत्या एक मुलाच्या स्वभावांत एकाएकीं असें कोणतें परिवर्तन झालें ? कोणती घटना त्याला कारणीभूत झाली असावी ? इत्यादि प्रश्न कालेखाँनीं आपल्या मनालाच केले; पण उघडपणें त्यांनीं ह्यासंबंधीं मुलाला कांहींहि विचारलें नाहीं. सतत जवळ असलेलें प्यारें हत्यार त्यांनीं मुलाच्या पुढें केलें आणि रियाजाचा पहिला मंत्र सांगितला.

पाया आतां मजबूत झालेला आहे, मजले चढवायला हरकत नाहीं. अशी जेव्हां कालेखाँची खात्री झाली तेव्हां परम गुरु लखनौचे हुसेनअलि खाँसाहेब ह्यांच्या पायावर त्यांनीं मुलाला घातलें, आणि विद्या देण्याबद्दल विनंती केली.

उस्ताद हुसेन अलींनीं तब्बल आठ वर्षें मुनीरखाँजवळून रियाज करवून घेतला. आणि ' कीर्तिवंत हो ! ' असा महान् आशीर्वाद घेऊन मुनीरखाँ मुंबईला परत आले.

फरुकाबादचे उस्ताद ' बलिबक्ष ' त्या वेळीं मुंबईत होते; आणि त्यांचा मुक्काम कालेखाँकडेच होता. मुनीरखाँ तयार होऊन आले होते खरे; परंतु बलिबक्षांचा तबला ऐकून ते धुंद झाले. वडिलांना विनंती करून त्यांनीं त्याच दिवशीं बलिबक्षांचा ' गंडा ' बांधला आणि इथून पुढें दहा वर्षें आपल्या ह्या परात्पर गुरूच्या चरणांजवळ राहून त्यांनीं ज्ञान संपादन केलें. असें सांगतात कीं जें नवीन ऐकलें तें घेण्याचा खाँसाहेब मुनीरखाँना पुढें इतका हव्यास जडला, कीं त्यांनीं हिंदुस्थानांतील नामवंत अशा वेगवेगळ्या घराण्यांतल्या २४ उस्तादांशीं गंडा बांधला होता. त्यामुळें ' उस्तादांचेहि उस्ताद ' अशा पदवीला ते पात्र झाले. इतकें झाल्यानंतर मुनीरखाँ मुंबईत स्थायिक झाले व त्यांनीं विद्यादानाला सुरुवात केली. आणि ज्या ज्या विद्यार्थ्यांच्या मस्तकावर ह्या महात्म्यानें हात ठेवला ते ते सर्व शागीर्द ख्यातनाम झाले; गुरूचें नांव चिरंजीव करते झाले.

मुनीरखाँच्या शिष्यवर्गांतील, उस्ताद अहमदजान थिरकवा, शमसुद्दिन खाँ, मुस्ताक हुसेन, नजीर खाँ, अल्ला मेहेर, गुलाम हुसेन खाँ, सुब्राय मामा, विष्णु शिरोडकर इत्यादि तीस शागीर्दांनीं खूप नांव केलें; परंतु त्यांच्यामागून त्यांची गादी चालवणारे खलीफा एकच. त्यांचा भाचा उस्ताद अमीरहुसेन खाँ.

मुनीरखाँना एक मुलगा होता व तो तबल्यांत खूप तयारहि होता; परंतु तो अकालीं गेला. त्यामुळें आपल्या भाच्यावर—अमीरहुसेनवर—त्यांनीं फार प्रेम केलें. अमीरहुसेनचें पहिलें शिक्षण त्यांच्या वडिलांजवळ झालें. अहमद बक्ष हे सारंगींत व तबल्यांत सारखेच तयार होते. ते गातहि चांगले. अखेरपर्यंत ते हैद्राबाद संस्थानांत नोकरीला होते. एकदां दौऱ्या-वरून परततांना मुनीर खाँ हैद्राबादला आपल्या बहिणीकडे आले असतांनां त्यांनीं भाच्याची तयारी ऐकली व ताबडतोब ते त्याला मुंबईला आपल्याकडे घेऊन आले; आणि त्याला रीतसर तालीम द्यायला सुरुवात केली. रात्रीं बारा वाजतां रियाज सुरू व्हायचा तो सकाळीं सहा वाजेपर्यंत चालायचा. अशीं सहा वर्षे रियाज झाला आणि अमीर खाँना वडिलांकडे जायची इच्छा झाली. मामांची परवानगी घेऊन ते हैद्राबादेंत आले; पण वडिलांनीं इथेंहि रियाजांत खंड पाडूं दिला नाहीं. मोहल्ल्यांतल्या लोकांना त्रास होऊं नये म्हणून त्यांनीं दूर एकांतांत ह्या मुलाला जागा घेऊन दिली. आणि त्या निर्जन ठिकाणीं नेहमींप्रमाणें रात्रीं १२ ते सकाळीं ६ वाजेपर्यंत खाँ-साहेब रियाज करायचे. अशांत एके दिवशीं मोहल्ल्यांत एक वेगळाच प्रकार घडला. त्यामुळें खाँसाहेब विलक्षण अस्वस्थ आले. बाहेरून आलेल्या एका तरुणानें तीन दिवसपर्यंत अव्याहत सायकल चालवली. तीन दिवसपर्यंत हा इसम न थांबतां सायकल चालवूं शकतो, मग आपल्याला तीन दिवसपर्यंत सारखा, एकसारखा तबला कां वाजवतां येऊं नये ? अशा हट्टवादी विचारानें खाँसाहेबांना घेरलें, आणि लगेच तो ते अमलांत आणायचा प्रयत्न करूं लागले. कित्येक दिवस हा प्रयत्न चालू होता; पण पुढें प्रकृतीवर त्याचा परिणाम होऊं लागला. त्यामुळें वरिष्ठांच्या लक्षांत ही गोष्ट येऊं लागली आणि एकदांचें हें गुपित बाहेर पडलें; परंतु ही गोष्ट जितकी अवघड

तितकीच वेडेपणाची आहे, अशी समजूत घातल्यानंतर खाँसाहेबांनीं हा नाद सोडून दिला; पण मेहनत फुकट गेली नाहीं. अजून वयाच्या ६२ व्या वर्षीं देखील खाँसाहेब पांच सहा तास सहज वाजवूं शकतात, ह्याचें श्रेय त्या हठयोगी रियाजालाच आहे. वयाची चाळिशी उलटेपर्यंत खाँसाहेबांनीं अविरत अभ्यास केला. तोंपर्यंत व्यवसाय केला नाहीं, स्वसुख पाहिलें नाहीं. 'मुनीरखाँच्या गादीला लायक खलीफा झाला.' अशी जेव्हां तज्ज्ञांकडून शिफारस झाली, तेव्हांच खाँसाहेब हैद्राबाद सोडून बाहेर पडले. ठिकठिकाणीं नांव गाजवीत गाजवीत, जीवन स्थिर व्हावें म्हणून १९४० च्या आसपास त्यांनीं मुंबईंत पाय ठेवला.

थिरकवाहून विद्वान् किंबहुना थिरकवाइतका मोठा तबलिया हिंदुस्थानांत आणखी कुणी असूं शकेल, ह्याची आम्हांला जाणीवच नव्हती. आमचें दैवत म्हणजे थिरकवा. नुकतेच ते मुंबईंत येऊन मुक्काम गाजवून गेले होते. पेशकार, तिय्या, दुपल्ली, तिपल्ली, लग्गी, परान, चक्रताल, असले नवखे शब्द ओठावर नाचत होते. मी तर अगदीं भारून गेलों होतों. भेटेल त्याला थिरकवाचें वादन तोंडानें ऐकवत होतों. असाच एक दिवस पंढरी नागेशकर भेटला. त्यालाहि मीं थिरकवा सुनवला. माझ्या उथळ ज्ञानाची बहुधा त्याला कल्पना आली असावी. जातां जातां तो एवढेंच म्हणाला होता—

"अमीर हुसेनांक आयकल्या? तांकांय एकदां आइक आं!" पंढरी 'अमीरहुसेन' हें नांव माझ्या मनावर कोरून गेला; पण कित्येक महिने गेले तरी त्यांना ऐकण्याची संधि मला आली नाहीं. पुढें एक दिवस पंढरीनेंच त्यांचा कार्यक्रम घडवून आणला होता, तो ऐकायला मिळाला, आणि तेव्हां मला जाग आली. वाटलें, तबल्याचें विश्व आपल्याला वाटतें तेवढें छोटें नाहीं. तें फार मोठें आहे. आतांपर्यंत आपण पाहिले होते ते फक्त त्यांतले सुलतान आणि वझीर; परंतु खलीफापर्यंत कांहीं आपण पोहोंचूं शकलों नव्हतों.

त्यांच्या त्या वादनांत थिरकवाचा नाटकी ढंग नव्हता. स्तिमित करून टाकणारी छाप नव्हती. भारून टाकणारें व्यक्तित्व नव्हतें. दिसत होती ती

गहन विद्वत्ता. परंपरा सांगणारी शुद्ध नायकी. घराण्याचा प्रामाणिक आविष्कार ! कार्यक्रम संपला तसे खाँसाहेबांभोंवतीं आम्ही कडें करून उभे राहिलों. खाँसाहेब आपला इतिहास सांगत होते. मध्येंच ते म्हणाले—

" अहो, ह्या नागेशकरानें तुम्हांला माझा परिचय करून दिला नसता तर मीं कांहीं मुंबईत राहिलों नसतों. "

आणि गोष्ट खरी होती. जीवनाला स्थैर्य यावें म्हणून खाँसाहेब मुंबईत आले खरे ; पण इथें त्यांची दाद लागेना. दिवसेंदिवस परिस्थिति जाचक होऊं लागली. एक दिवस त्यांच्या एका मित्रानें एका चित्रपटनिर्मात्याजवळ खाँसाहेबांची शिफारस केली व तो त्यांना तेथें घेऊन गेला. खाँसाहेब तेथें गेले त्या वेळीं त्या निर्मात्याच्या पत्नीच्या गाण्याचा रियाज चालू होता. तबल्याच्या साथीला पंढरी नागेशकर होते. निर्मात्यांनीं रियाज बंद केला व खाँसाहेबांकडे तबला द्यायची नागेशकरांना विनंती करून आपण ऐकत बसले. तो निर्माता समजदारीच्या बाबतींत काय असेल तो असो; परंतु नागेशकरांसारखा तबला जाणणारा तरी श्रोता आपल्याला मिळालाच आहे, ह्या विचारानें खाँसाहेबांनीं वाजवायला सुरुवात केली. अस्सल फरुकाबादी बाजाची ती खुबसुरत उधळण ऐकून नागेशकर तर गुंग झालेच होते पण वादन संपल्यावर तो निर्माता म्हणाला होता—" खाँसाहेब, माझ्याकडे फक्त ६० रुपये पगाराची नोकरी आहे. तुमची किंमत लाख मोलाची आहे. ही जागा तुम्हांला देऊन तुमच्या विद्वत्तेचा उपमर्द मी करूं इच्छित नाहीं. आणि तसं केलं तर मी पापी ठरेन. "

खाँसाहेबांना काय करावें समजेना. ६० तर ६० ! ' हो ' म्हणावें तर त्यानें मान देऊन पेचांत टाकलेलें. ' नाहीं ' म्हणावें तर त्याहि साठ रुपयांना मुकणार ! असे विचार मनांत आले खरे; पण खाँसाहेब कांहीं बोलले नाहींत. निरोप घेऊन ते घरीं जायला निघाले. इतका वेळ तेथें गप्प असलेला नागेशकर खाँसाहेबांच्या मागोमाग धांवत आला. त्यानें वळणावरच खाँसाहेबांना गांठलें; आणि आपला पत्ता देऊन आपल्याकडे केवळ भेटीला—चहाला यायचें त्यांना आमंत्रण दिलें. हे अमीरहुसेन

खाँसाहेब म्हणजे कोण होते, ह्याची खरी जाणीव नागेशकरला झाली होती. तबलावादन-कलेंतला नवा साक्षात्कार त्याला झालेला होता.

ठरलेल्या दिवशीं खाँसाहेब नागेशकरांच्या घरचा पत्ता हुडकीत आले. पाहतात तर तेथें तबलाप्रेमी अशीं पन्नास साठ माणसें जमलेलीं. मध्यभागीं बैठक घातलेली. तेथें ५–६ हत्यारें ठेवलेलीं. खाँसाहेब समजले. ते एवढेंच म्हणाले फक्त—

" क्या इसी लिये मुझे बुलाया था ? "

पण नागेशकरांचा आदरभाव त्यांनीं ओळखला होता. मुकाट्यानें ते बैठकीवर बसले. त्यांच्यांतला खलीफा जागृत झाला; आणि एकामागून एक पेशकार, कायदे, रेले आकार घेऊं लागले. इथून पुढें खाँसाहेबांना खूप प्रसिद्धि मिळाली. नागेशकरांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करल्यावर जो तो अहमहमिकेनें त्यांचा शिष्य होण्याचा प्रयत्न करूं लागला. तबलाप्रेमी मंडळी तबला शिकूं लागली होती; आणि खाँसाहेब भरभरून ज्ञानामृत पाजीत होते.

शिष्यांबद्दल त्यांना अपार प्रेम. एखादा शिष्य चार दिवस आला नाहीं तर—कितीहि दूर असला तरी—ते त्याला हुडकीत जातील. त्याची तशी परिस्थिति नसली तर त्याला मदत करतील. समजावतील; पण त्याच्याकडून रियाज करून घेतील. आज त्यांचे सर्व शिष्य चांगले मिळवते आहेत व ह्या सर्व शिष्यांना आपल्या गुरुमाउलीबद्दल अपार प्रेम वाटतें.

आजचे प्रसिद्ध तबलावादक नागेशकर, केरकर, शरीफ, गुलाम रसूल, बोडस, कल्लन, निखिल घोष, थत्ते, माळी, साळुखे हे सर्व खाँसाहेबांचे आवडते शागीर्द आहेत. खाँसाहेबांचा मुलगा फकीर हुसेन हा आतां भावी खलीफा आहे व तो बराच तयार झाला आहे. घराण्याचें नांव तो उजळील ह्याबद्दल शंका नाहीं.

खाँसाहेबांचें घराणें साथ-संगत कधींहि करीत नाहीं. त्यांच्या घराण्यांतील गुरुजनांपासून ती परंपरा चालू आहे. तसें पाहिलें तर एक प्रकारें तो त्यांचा अपमानच होय !

आपल्या शिष्यांकडून योग्य मेहनत होत नाहीं ह्याबद्दल ते नेहमीं कष्टी होतात. अशा वेळीं बोलतां बोलतां त्यांची दृष्टि गतकालाचा वेध घेऊं लागते आणि मग ते बोलूं लागतात—

" बंधो, तसा काल पुन्हा येणार नाहीं. सुबत्तेचं, आरामाचं, सद्-भावनांचं तें युग संपलं; आतां केवळ त्याच्या आठवणीवर जगायचं. हिमालयाएवढे ते तपस्वी, आणि आकाशाला गवसणी घालणारी—खडतर साधनेनं मिळवलेली—त्यांची ती कला—आ हा, हा, हा ! विद्युल्लतेसारखा झगझगाट ! सम्राट दिपून जायचे त्यांच्या तेजानें. मग सामान्यांचा काय पाड ? राम सहाय, बलदेव सहाय, बाचा मिश्र हे बनारसी बाजाचे राजे. मोठे सिद्धीचे. एक नवं घराणं त्यांनीं निर्माण केलं. लखनौचे हुसेन अलीखाँसाहेब, पंजाबचे कादरबक्ष खाँसाहेब, फरुकाबादचे बलिबक्ष खाँसाहेब; एक एक माणूस देवतुल्य होता. एकेकानें अशी कर्तबगारी दाखवली कीं त्यांच्या नांवापासून एक नवा ' बाज ' तयार झाला; पण मी आजच्या विद्यार्थ्यांना दोष देत नाहीं. सध्यांच्या ह्या धकाधकीच्या कालांत एक डोळा आजच्या चिंतेवर आणि दुसरा उद्यांची चिंता मिटवण्याच्या भानगडींत गुंतलेला असल्यानें डोळे उघडे ठेवून रियाज कसा होणार ? तरी बिचारे धडपडतात; त्यांतल्या त्यांत वेळ काढतात व मनांतल्या एका कप्प्यांत मीं सांगितलेलं कुठें तरी ठेवून देतात. तेंच अधिक आहे. "

एवढें बोलून झालें कीं साहजिकच खाँसाहेब आपल्या आजी—माजी शिष्यांचे गुण गाऊं लागतात; आणि त्यांतच त्यांना सुख वाटूं लागतें.

दिल्ली, आग्रा, बनारसी, पूरब, फरुकाबादी व पंजाब हे सहाहि बाज खाँसाहेब सारख्याच तयारीनें वाजवूं शकतात. पंजाब घराण्याच्या कादरबक्षांसारखेच तेहि चक्रतालांचे राजे आहेत.

कांहीं दिवसांपूर्वी ऑ. इं. रेडियोच्या मुंबई केंद्रानें त्यांची व एका मामुली पखवाजियाची जुगलबंदी ठेवली होती. (तशी ती ठेवण्याऱ्यांचा तो एक मोठाच शहाणपणा (?) होता!) त्या प्रसंगीं खाँसाहेबांनीं 'एकताला' वाजवला व एक एक असे चमकदार चक्रताल पेश करायला सुरुवात केली कीं तो पखवाजी बिचारा किंकर्तव्यमूढ झाला. कार्यक्रम संपल्यावर तो

चक्क खाँसाहेबांना शरण आला, व आपल्याला कांहीं तरी सांगायची त्यानें विनंती केली.

खाँसाहेब ज्या वेळीं 'कायदा' वाजवतात त्या वेळीं त्यांतील 'द, त, क, न, ग, ट, र इत्यादि शास्त्रोक्त सप्तसूर लक्ष ठेवून टिपून घ्यावे. तबल्याची मेहनत ही ताकदीवर अवलंबून नाहीं. पुष्कळांचा तसा गैरसमज आहे; पण ती नसांची मेहनत आहे. नसा जसजशा वळणांत तयार होत जातील तसतसें पुढें वादन सुलभ होत जातें. ह्या बाबतींत उदाहरण देतांना ते एका स्त्रीचें देतात. 'एका अत्यंत देखण्या, तितक्याच नाजूक बाईचें अतिशय स्पष्ट आणि खुबसुरत तबलावादन ऐकल्यानें केवळ ताकदीनेंच माणूस ह्या कलेंत टिकाव धरूं शकतो ह्यावरचा माझा विश्वास उडाला' असें ते आवर्जून सांगतात.

परवांच ते मला रस्त्यांत भेटले. आदाब अर्ज झाला. तसें मीं म्हटलें— "कुठें गेला होतां खाँसाहेब एवढ्या दुपारीं ?"

"अहो मीं तो नऊ मात्रांचा 'अनंतताल' तयार केला आहेना, तो एका शिष्याला समजावायला गेलों होतों. त्याला बिचाऱ्याला व्यवसायामुळें वेळ मिळत नाहीं. या केव्हां तरी—साडेसात मात्रांचा 'मुक्तताल' ऐकवतों तुम्हांला. अष्टांगपूर्ण केलाय् मीं तो. आतां येतां ?"

'साडेसात ?' माझ्या डोळ्यांसमोर काजवे चमकूं लागले. मी म्हणालों, "खाँसाहेब, अहो साध्या खेमट्या, दादऱ्यांत अजराडा पद्धतीनें तुम्हीं वाजवायला सुरुवात केली, तर ताल टिकत नाहीं आमचा; आणि साडे सात मात्रा, नऊ मात्रा, असल्या ब्रह्मघोटाळ्यांत आम्हांला कां टाकतां ?"

"कुछ नहीं भय्या, देखो......"

आणि खाँसाहेब तिथेंच समजावायला लागतात, "पंचमसवारी जानते हो ना—धिंऽतिर किट धिंऽताना । धीधी नाधी धीना......"

अत्यंत निगर्वी, मधुरभाषी, नम्र असा हा ६३ वर्षांचा कलावंत हातांत 'हत्यार' आलें कीं त्या क्षेत्रांतल्या एखाद्या ऐन उमेदींतल्या माणसाला

लीलया लाजवील. कारण आपल्या खडतर सेवेनें त्यांनीं गुरुजनांकडून मिळविले ते आशीर्वाद ! शाप नव्हे !

खाँसाहेब अहमदजान थिरकवा, खाँसाहेब अमीर हुसेन, खाँसाहेब अल्लारखा, खाँसाहेब शमसुद्दीन, खाँसाहेब निजामुद्दीन, बनारसचे कंठे महाराज असे हे जबरदस्त योगी आतां पुढच्या पिढींत दिसतील कीं नाहीं शंकाच आहे.

निदान मला तरी आकाशानें आपला माथा इथेंच टेकला आहे असें वाटतें.

★★
★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..३१०९८.. वि: ........
क्रमांक ..२०००.. नों: दि: ........




## 'मैहर' घराण्याचा आधारस्तंभ
# उस्ताद अलि अकबर खाँ

'चिल्ल्याचं' नांव काढलं कीं माझ्या अंगावर कांटा उभा राहतो. नुसतं चिल्ल्याचंच नाहीं, तर 'चिल्ला' करायची ती अंधारकोठडी आठवली तरी काळजांत धडधडतं. खूप मार खाल्लाय् मीं त्यासाठीं. आपल्या एकुलत्या एक मुलाला कुणीं वडिलांनीं इतकं मारलं असेल असं नाहीं मला वाटत! चिल्ल्याबद्दल मीं बालपणांत ऐकलं होतं फक्त, कीं 'चिल्ला करणं' म्हणजे एका अंधारकोठडींत स्वतःला कोंडून घेऊन चोवीस तास अखंड साधना करणं; परंतु प्रत्यक्ष प्रसंग आला तेव्हां भीतीनें माझी गाळण उडाली. त्या खोलींत शिरायला मन धजेनाच! वडिलांच्या माराला भिऊन व वडील घरांत असेतोंपर्यंत मी तिथें बसत असें; पण ते कामाकरितां बाहेर गेले कीं 'सरोद' काखेंत मारून मी तिथून धूम ठोकीत असें. एखाद्या वेळीं ते घरांत परतण्याच्या वेळेचा माझा अंदाज चुकत असे. घरांत आल्याबरोबर ते आधीं त्या कोठडीकडे वळत. माझा रियाज चालू आहे कीं नाहीं ह्याचा अंदाज घेत; पण मी त्या जागेवर नाहीं हें त्यांच्या लक्षांत आलं कीं त्यांच्या रागाचा पारा तारसप्तकाच्या षड्जाच्याहि वर जाई. आणि मग जो मार खावा लागायचा तो तर कांहीं विचारूं नका.

परंतु ह्यांत माझ्या वडिलांना मी मुळींच दोष देत नाहीं. एक अद्वितीय संगीताचार्य म्हणवून घ्यायला त्यांना अफाट परिश्रम करावे लागले. फार फार तर चार पांच वर्षे मला 'चिल्ला' करावा लागला असता. तोहि खाण्यापिण्याची सर्व व्यवस्था चोख व चैनीची असतांना; पण माझ्या पिताजींची परिस्थिति सगळ्याच बाजूंनीं अडचणींनीं वेढलेली होती. आयुष्यांतलीं ५० वर्षें त्यांना 'चिल्ला' करावा लागला. ती कहाणी रोमांचित करणारी आहे, आदर्श आहे, उद्बोधक आहे—होतकरू, उत्साही अशा विद्यार्थ्याला वाटेवरल्या सावलीसारखी.'

*　　　*　　　*

पद्मश्री उस्ताद अलाउद्दीन खाँसाहेबांचें घराणें दशग्रंथी ब्राह्मणाचें. मूळ पुरुष दीनानाथ देवशर्मा दारिद्र्याला कंटाळून आपल्या एकुलत्या एक मुलाला घेऊन रानोमाळ भटकत असतां रात्रीच्या वेळीं कालीमातेच्या एका पडक्या देवळांत निवाऱ्याला राहिले. कूकिया नांवाच्या नरभक्षक लोकांच्या वस्तींतलें हें देऊळ. दीनानाथांना त्याची जाणीव नव्हती. आसपासचीं फुलें वेंचून आणून त्यांनीं कालीमातेची पूजा आरंभिली. त्यांच्यांतलें ब्रह्मतेज जागें झालें. आणि ओठांवाटे पुरुषसूक्त स्रवूं लागलें. त्या महामंत्राचा ध्वनि आसमंतांत घुमला. त्या आवाजानें नरभक्षक



पद्मश्री खाँसाहेब अलाउद्दीन खाँ

कूकियांचीं अस्त्रें थरथरलीं. ज्या माता-पित्याच्या पोटीं आपण जन्म घेतला त्यांनाच आपल्या पोटांत सुरक्षित ठेवण्याकरितां थोडीशी वृद्धावस्था आली कीं मारून खाणारे, असे हे निर्बुद्ध, पण निस्सीम कालीभक्त कूकिये धांवत देवळांत आले. समोरचा देखावा पाहून त्यांच्यांत काय परिवर्तन झालें

कोण जाणे ! परत जाऊन फळांफुलांनीं भरलेल्या अनेक टोपल्या त्यांनीं दीनानाथांच्याजवळ आणून ठेवल्या.

त्या रात्रीपासून दीनानाथांच्या आयुष्यांत परिवर्तन झालें. त्यांचें दारिद्र्य संपलें; परंतु दीनानाथांच्या मुलानें एका वेगळ्याच मार्गाचा अवलंब केला. बालपणापासून दारिद्र्यानें गांजलेल्या ह्या मुलाच्या मनांत श्रीमंतांबद्दल एक विलक्षण अढी निर्माण झाली होती. सूडबुद्धीनें त्याच्या मनांत घर केलें होतें. कांहीं दिवसांनीं ह्या कुकियांची त्यानें एक संघटना निर्माण केली व गांवांत जाऊन धनिकांना लुटायला आरंभ केला. गांवांतल्या जमीनदाराच्या मालमत्तेचा आधीं तपास करायचा, दारिद्र्यानें गांजलेल्या तिथल्या गरिबांचेहि पत्ते काढायचे, त्या जमीनदाराला लुटायचा व त्याचें लुटलेलें धन त्या गरिबांना वांटून द्यायचें असा त्यानें सपाटा लावला.

लॉर्ड क्लाइव्ह त्या वेळीं विजयी होऊन हिंदुस्थानचें सम्राटपद इंग्लंड देशाकडे गेलें होतें. जमीनदारांचा तो रक्षक होता. तें त्याचें ब्रीद होतें. ह्या लुटारूंना पकडून देणाऱ्याला त्यानें लाखों रुपयांचें इनाम घोषित केलें. अशा संकटग्रस्त परिस्थितींत दीनानाथ देवशर्मांच्या त्या मुलानें मुसलमानी धर्म स्वीकारून स्वतःला ‘ सिराजू ’ हें नांव घेतलें. आतां तर त्यानें उघड आव्हान देऊन डाके घालणें सुरू केलें. एकदां सिलहटमधील एका ब्राह्मण जमीनदाराची एक लहान मुलगी त्याला लुटींत सांपडली. सिराजूनें तिला लहानाची मोठी करून आपली सून करून घेतली. ह्या सुनेनें त्याच्या जीवनांत परिवर्तन घडवून आणलें. तिनें त्याला त्याच्या ह्या व्यवसायापासून परावृत्त केलें.

हाच लुटारू ‘ सिराजू ’ हा अलाउद्दीन खाँसाहेबांच्या घराण्यांतील मूळ पुरुष. सिराजूचा नातु जाफर महम्मद, त्याचा मुलगा सादर हुसेन, सादरचा सदूखाँ व सदूखाँपासून अलाउद्दीन अशी ही वंशावळ.

अलाउद्दीनचे वडील अत्यंत संगीतप्रेमी. जिथें गाणें ऐकायला मिळेल तिथें ते आदरानें जायचे. त्यासाठीं १५-२० मैल चालत जावें लागलें तरी त्यांची तयारी असे. आपल्या मोठ्या मुलाची संगीताची आवड पाहून दोन संगीतज्ञहि त्यांनीं घरांत ठेवले होते. अशा वातावरणांत अलाउद्दीन

वाढत होते. अर्थातच उपजत असलेल्या त्यांच्यांतील संगीतप्रेमाचा विकास होऊं लागला. हलुहळू त्याचा परिणाम असा होऊं लागला, कीं शाळेंत जायचें निमित्त करून गांवांतल्या शिवमंदिरांत दिवसभर चालू असलेल्या साधूंच्या सुस्वर भजनांत हा मुलगा तल्लीन होऊं लागला.

एक दिवस शाळेंतल्या शिक्षकांनीं घरीं तक्रार पाठविली. 'गेला एक महिना तुमचा मुलगा शाळेंत गैरहजर असतो. कारण कळवा!' अलाउद्दिनांनीं वडिलांना खरी हकीकत सांगितली. वडील थोडेसे नाराज झाले; परंतु मुलाच्या संगीतप्रेमाचें त्यांनीं मनांतल्या मनांत कौतुक केलें. आईला मात्र ही गोष्ट मानवली नाहीं. तिनें मुलाचे हात-पाय बांधून त्याला एका खोलींत कोंडून ठेवलें. आपल्या अंगांतल्या असेल नसेल त्या बळानें मार देऊन शिवाय दोन दिवस त्याला अन्नपाणीहि दिलें नाहीं. तिसऱ्या दिवशीं अलाउद्दीनची थोरली बहीण मधुमालती माहेरीं आली होती. तिनें त्याची सुटका केली. ह्या अवधींत थोरल्या मुलाला शिकवायला ठेवलेल्या त्या दोन उस्तादांचीहि अलाउद्दीनच्या आईनें रवानगी केली.

संगीताच्या आराधनेसाठीं तळमळत असलेला अलाउद्दीनचा जीव कांहीं दिवस थांबला. वडिलांच्या बोलण्यांतून गायक लोकांच्या अनेक गोष्टी त्यानें ऐकलेल्या होत्या. मोठ्या भावाला शिकवणारे ते दोन उस्तादहि खानदानी गवय्याबजवय्यांच्या अनेक रंजक गोष्टी सांगत. कलकत्त्याला त्यांतले बरेच गवयी राहत असतात असाहि पत्ता त्याला लागलेला होता. त्यानें खूप विचार केला व एक दिवस आईच्या पेटींतून दहा रुपये चोरून अलाउद्दीन पळाला. दरोडेखोर पूर्वजाच्या आत्म्यानें ह्या वेळीं त्याच्या अंगांत संचार केला असावा.

मजल दरमजल करीत तो कलकत्त्याला पोंचला. त्या वेळीं रात्रींचे १२ वाजले होते. गंगेच्या एका घाटावरच्या पायरीवर त्याचा थकला भागला जीव झोंपीं गेला. सकाळीं उठून त्यानें पाहिलें, कोटासकट त्याची पुंजी गायब झाली होती. आतां काय करावें? एवढ्या मोठ्या कलकत्ता शहरांत त्याचें कोण ओळखीचें होतें? घरीं तरी कसें परतणार? दहा अकरा वर्षांच्या त्या मुलाला रडण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. तो मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागला. चौकशीला आलेल्या एका पोलिसानें त्याला 'मूर्ख'

म्हणण्याखेरीज दुसरें कांहीं केलें नाहीं. निमतल्ला घाटावर कांहीं गांजेकस साधु धुमी पेटवून बोलत बसलेले होते. तिथल्या एका साधूला त्यानें आपली हकीकत सांगितली. “ कांहीं चिंता करूं नकोस बेटा. जा, गंगेंत न्हाऊन घे. आणि तें बघ समोर अन्नछत्र चालू आहे. तिथें जाऊन पोटभर खाऊन घे जा ! ”

त्या लुळ्या, पांगळ्या, आंधळ्या भिकाऱ्यांत जेवतांना अलाउद्दीनला फार वाईट वाटलें; पण करतो काय ? असे कांहीं दिवस तें ‘ कंगाली जेवण ’ जेवण्यापलीकडे त्याला गत्यंतर नव्हतें. जो जो भेटे त्याला त्याला तो सांगे ‘ बाबा, मीं गाणं-बजावणं शिकण्याकरितां दूर देशांतून आलेलों आहें. मला कुणी उस्ताद भेटवा ! ’ पण उस्ताद कुठें राहतात तें घाटावर येणाऱ्या सामान्य माणसाला काय माहिती असणार ? एक दिवस विख्यात धृपदगायक लुलु गोस्वामी घाटावर आंघोळीला आले होते. अचानक ह्या मुलाची व त्यांची गांठ पडली. स्वामींनीं त्याची चौकशी केली व ते त्याला घरीं घेऊन आले. स्वामींच्या घरीं पुष्कळ विद्यार्थी होते. तें वातावरण पाहून अलाउद्दीनला आनंद झाला. अखेर दैवानें खैर केली असें त्याला वाटलें.

“ बारा वर्षेपर्यंत स्वर-साधना करावी लागेल. तसं वचन देशील तरच मी शिकवीन. ” स्वामी म्हणाले.

“ अहो बारा वर्षे काय, जीवनभर ती करावी लागली तरी हरकत नाहीं. माझी तयारी आहे. ” अलाउद्दीननें उत्तर केलें.

आणि त्या दिवसापासून जीवनक्रम बदलला. स्वामींनीं शिष्यत्व बहाल केलें. असे कांहीं दिवस गेले. स्वामींनीं बरेच पल्टे शिकविले होते; कांहीं ध्रुपदें शिकविलीं होतीं, विषममात्रांचे ताल पक्के करून घेतले होते. अचानक एके दिवशीं लुलुस्वामी प्लेगनें आजारी झाले आणि त्यांनीं आपली जीवन-यात्रा संपविली. अलाउद्दीनला आकाश कोसळल्यासारखें झालें. त्याच्या तोंडापर्यंत आलेला घास कुणींतरी हिरावून नेला होता. त्याचें सांत्वन करणाराहि तिथें कुणी नव्हता. आतां आधार एकच होता, तो म्हणजे

पुन्हा त्या लुळ्या आंधळ्या भिकाऱ्यांत जाऊन दोन वेळां जेवणें आणि गंगामाईच्या घाटावरच्या पायऱ्यांवर आयुष्याची चिंता करीत झोंपीं जाणें.

लुलस्वामींकडे अलाउद्दीनच्या कांहीं ओळखी झाल्या होत्या. त्यांच्या जोरावर नम्रपणें वशिला लावून स्वामी विवेकानंदांचे भाऊ हाबुदत्त ह्यांच्याकडे शिकायला राहण्याची इच्छा त्यानें व्यक्त केली. हाबुदत्त उत्तम-पैकीं वादक होते. क्लॅरिओनेट, सतार, फिडल आदि वाद्यें ते उत्तम वाजवीत. मुलाची जिज्ञासा पाहून त्यांनीं शिकवायचें कबूल केलें. ह्याशिवाय लुलस्वामींकडे साथीला मृदंग व तबला वाजविणारे नदुबाबू ह्यांच्याकडे संधान बांधून तबला व मृदंगहि अलाउद्दीन शिकूं लागला. मिळेल तें शिकून घ्यायचें हेंच त्यानें आपलें ध्येय ठरविलें.

नदुबाबूंनींहि अलाउद्दीनच्या ग्रहणशक्तीवर लुब्ध होऊन 'मिनर्व्हा थिएटर' मध्यें मासिक बारा रुपये वेतनावर त्याला नोकरी लावून दिली. मिनर्व्हा थिएटरांत हजारा उस्ताद नांवाचे उत्तम शहनाईवादक होते. त्यांच्याजवळ अलाउद्दीन फावल्या वेळांत शहनाई शिकूं लागले.

अशा रीतीनें पांच वर्षें लोटलीं. अलाउद्दीन बऱ्याचशा देशीविदेशी वाद्यांवर हात फिरविण्यांत तरबेज झाले होते. मुक्तागाछा संस्थानांत दरवर्षीं एक गाण्याबजावण्याची फार मोठी मैफल भरत असे. त्या मैफलीला हजर राहण्याचा योग अलाउद्दीनला आला. १६–१७ वर्षांच्या युवकाकडे पाहून संस्थानच्या राजानें त्याला प्रश्न केला, "मुला, तूं काय करतोस ?"

मुलानें गर्वानें उत्तर केलें,

"मेरी तरह का उस्ताद तो आपको सारे देश में नहीं मिलेगा. दुनियाका हर बाजा मैं बजा सकता हूँ।"

अलाउद्दीन आत्मविश्वासानें उत्तरला खरा; परंतु दुसऱ्या दिवशीं तिथें मैफलीसाठीं जमलेल्या तेजःपुंज तपस्व्यांकडे पाहून त्याचा गर्वभार पार उतरला. त्या छान मैफलींत एकएकजण आपली तयारी दाखवूं लागला. सारी सभा डोलूं लागली. त्यांतल्यात्यांत लांब लांब दाढीवाल्या एका महापुरुषानें 'सरोद'वर वाजविलेली 'तोडी' ऐकून अलाउद्दीनच्या

अंगावर रोमांच उभे राहिले. त्या तोडीनें त्याला स्वतःची जाणीव करून दिली. त्याला रडूं कोसळलें. कार्यक्रम संपवून तो दाढीवाला उस्ताद बाहेर पडत होता. अलाउद्दिनानें चटकन् पुढें होऊन त्याचे पाय धरले आणि म्हणाला, " गुरुवर्य, माझा उद्धार करा. वाटेल ती सेवा करीन. मला सरोद शिकवा. "

त्या तपस्व्यानें अलाउद्दीनला हात देऊन उठवलें व कांहींहि न बोलतां तो त्याला आपल्या घरीं घेऊन गेला. तो तपस्वी म्हणजे विख्यात सरोद-नवाज खाँसाहेब अहमदअलीखाँ होते.

उस्ताद अहमदअलींनीं अलाउद्दीनला मनापासून शिकविलें. ह्या शिष्यावर त्यांचा अपार जीव जडला. थोड्याच दिवसांत अलाउद्दीनवर ते संपूर्ण विश्वास टाकूं लागले. कार्यक्रमासाठीं अहमदअलींना देशभर फिरावें लागे. बिदागी म्हणून मिळालेली सारी रक्कम ते आपल्या शिष्याजवळ ठेवायला देत. जमा आणि खर्च ह्याची चौकशी त्यांनीं कधींहि केली नाहीं. बसल्या बसल्या एकदां अहमदअलि सहज शिष्याला म्हणाले, " अलाउद्दिन, स्वतःचं एक लहानसं घर असावं असं मला सारखं वाटतं रे ! पण द्रव्याभावीं ही गोष्ट होणं शक्य नाहीं असंहि वाटतं. "

कांहीं न बोलतां अलाउद्दिन आंत गेला व एक लाकडी पेटी घेऊन आला. गुरुसमोर त्यानें ती उघडली आणि तो म्हणाला, " खाँसाहेब, ही तुमची कमाई. दहा हजारांच्या आसपास ही रक्कम असावी. बघा त्या रकमेंतून घर उभारतां आलं तर ! "

खाँसाहेबांना भडभडून आलें. शिष्याच्या देखरेखीखालीं त्यांनीं घर बांधून घेतलें व पुढें त्याच्या अभ्यासक्रमाकडे ते अधिकाधिक लक्ष देऊं लागले. परंतु एक दिवस ते म्हणाले, " मजजवळ तूं बरंच शिकलास. एकाच गुरूजवळ अशा तऱ्हेचं हें वाद्य शिकण्यांत जास्त वेळ घालवूं नये. रामपूर दरबारच्या उस्ताद वझीर खाँसाहेबांकडे जा. फार मोठी आसामी आहे ती. त्यांचा नुसता आशीर्वाद मिळाला तरी जन्माचं कल्याण होईल. त्यांची भेट होणं हें एक दुरापास्त कार्य आहे. पण तूं ती घेशील; आणि कसंहि करून ती घेच. जा. माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे ! "

उस्ताद अहमद अलींचा आशीर्वाद घेऊन अलाउद्दीन निघाला; पण रामपूरला येऊन बरेच दिवस झाले तरी वझीरखाँचें दर्शन होईना. सकाळीं सहा वाजल्यापासून संध्याकाळीं ६ वाजेपर्यंत त्यांची बाहेर जाण्याची जी जी वेळ असेल ती ती साधून पाहिली; पण दर्शन घडेना. एक वर्ष लोटलें. अखेर हार खाऊन आत्महत्या करायचें ठरवून आत्महत्येचें कारण सांगणारें एक पत्र एका मौलवीकडून लिहून घेऊन, राजेसाहेब व वझीर खाँसाहेब ज्या गाडींतून फिरायला जात असत त्या आठ घोड्यांच्या गाडी-खालीं अलाउद्दीननें आपला देह आंथरला.

कधीं नव्हे तो गाडीच्या घोडयांचा लगाम खेंचला गेला. एक जोरदार हिसका बसून गाडी उभी राहिली. क्रोधाविष्ट होऊन राजेसाहेबांनीं विचारलें, "आखिर मामला क्या है?" शिपायांकडून अलाउद्दीनला पकडण्यांत आलें. त्याच्याजवळचें तें पत्र राजेसाहेबांना देण्यांत आलें. राजेसाहेबांची कृपाळु दृष्टि अलाउद्दीनकडे वळली आणि इथेंच परात्पर गुरु वझीर खाँसाहेबांचें दर्शन घडलें.

राजेसाहेबांच्या विनंतीवरून वझीरखाँनीं शिकवायचें कबूल केलें; पण प्रतिज्ञा करून घेतली, "अपनी विद्या किसी भी कुपात्र को नहीं दूँगा। कुसंगति में नहीं पडूँगा। अपनी इस विद्या के बदले किसी से कुछ माँगूँगा नहीं। किसी वेश्या को विद्यादान नहीं करूँगा।"

अखेर परात्पर गुरूंनीं शिष्य म्हणून अलाउद्दीनचा स्वीकार केला. अलाउद्दीन धन्य झाला. तीस वर्षेपर्यंत रात्रंदिवस गुरूची सेवा करीत त्यानें शिक्षण घेतलें व तीस वर्षांनीं गुरूंनीं आशीर्वाद दिला.

"जाओ, देशभ्रमण करो। शिक्षा, दीक्षा और परीक्षा ये तीनों ही विद्या हैं। गुणी लोगों का गाना-बजाना सुनो और उन्हें अपना गाना-बजाना सुनाओ।"

तो आशीर्वाद घेऊन अलाउद्दीन खाँसाहेब निघाले. देशभर त्यांचें नांव झालें. अखेर 'मैहर' संस्थानांत राहून सरस्वतीची सेवा करीत त्यांनीं अनेक शिष्य तयार केले. सतारिया रविशंकर, अन्नपूर्णा, सरोदनवाज अलि अकबर, भट्टाचार्य, पन्नालाल घोष, निखिल बानर्जी, बहादुर खाँ, शरणराणी माथूर,

गोपालकृष्ण इत्यादि त्यांच्या शिष्यांनीं हिंदुस्थानभर नांव केलेलें आहे. दोन वर्षांपूर्वी भारत सरकारनें पद्मश्री हा किताब देऊन त्यांचा गौरव केला.

"असें हें माझ्या वडिलांचें चरित्र. तें माझ्या दृष्टीसमोर होतें; पण माझ्या बालमनानें चिल्ल्याचा धसका घेतला. एक दिवस विहिरींतून पाणी काढायचा दोर घेऊन मी त्या अंधारकोठडींत आलों आणि रियाज करीत बसलों. रात्र झाली तरी मीं उठलों नाहीं. वडिलांना वाटलं, आतां कदाचित् मी रंगलों असेन, म्हणून त्यांनीं माझी चौकशी केली नाहीं. मध्यरात्रीं सारं शांत झाल्यावर खिडकीला दोर बांधून व सरोद पोटाशीं धरून हळूच मी खालीं उतरलों; आणि धूम ठोकली. कुठें जायचं हें मीं ठरवलं नव्हतं; परंतु मुंबईचं मला फार मोठं आकर्षण होतं. माझ्याकडे फक्त पांच रुपये होते. स्टेशनवर येऊन मी गाडींत चढलों. सुदैवानें ती गाडी मुंबईकडेच चालली होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां कुठल्या तरी एका स्टेशनवर चेकरनें मला हटकलं. माझ्याजवळ तिकीट नाहीं असं पाहून त्यानें मला अटक केली व स्टेशनवर डांबून ठेवलं. संध्याकाळपर्यंत मी तिथेंच बसून राहिलों. स्टेशनमास्तरनें माझं वय लक्षांत घेऊन व माझा सरोद पाहून माझी सुटका केली. रात्र झाली तशी मी पुन्हा गाडींत चढायचा विचार करून स्टेशनच्या दुसऱ्या टोकाला काळोखांत कुणाला न दिसेल अशा बेतानें उभा राहिलों. रुळांच्या पलीकडे एकान्त जागीं कांहीं हमाल आपसांत जुगार खेळत होते. मीं तें पाहिलें. एका रुपयाला दोन रुपये मिळत होते. मजजवळ असलेल्या पांच रुपयांचे दहा रुपये होतील, त्या दहांचे वीस होतील, अशा आशेनें मीहि त्यांच्यांत सामील झालों. काखेंत माझा सरोद होता. तो सांभाळीत मीं पैसे लावले, परंतु माझे पांचहि रुपये गेले. जवळचं घड्याळ त्यांनाच विकून मीं दहा रुपये घेतले व पुन्हा ते लावले; पण दुर्दैवानें तेहि गेले. जुगारांत हरायचा तो माझा पहिला आणि अर्थातच शेवटचा प्रसंग. शेवटीं लोकांनीं माझा रडका चेहेरा पाहून, दया येऊन वर्गणी काढून मला कांहीं रुपये दिले व मला मुंबईच्या गाडींत बसवलें. फिरून माझा प्रवास सुरू झाला. भुसावळ स्टेशनांत चेकरनें आणखी एकदां मला पकडलें व स्टेशनवर उतरून मला पोलिसांच्या हवालीं करून तो निघून गेला. इथें माझी चौकशी

झाली. माझ्या घराण्याचं नांव न सांगतां मी माझं भलतंच नांव सांगितलं. वेळ संध्याकाळची होती. इतक्यांत एक पारश्यासारखा दिसणारा गृहस्थ आपल्या मंडळीसह फिरायला त्या ठिकाणीं आला होता. त्यानें माझी चौकशी केली. मजजवळचं तें वाद्य बारकाईनें पाहिलं आणि मला सोडवून आपल्याबरोबर घेऊन तो गांवांत आपल्या बंगल्यावर आला. तिथें त्यानें आपल्या मित्रमंडळींना जमा करून माझ्या सरोदवादनाचा कार्यक्रम केला. कार्यक्रम फारच रंगला. एवढ्या लहान वयांत मीं दाखविलेलं कसब पाहून तो खूष झाला. भुसावळला मी त्याच्या बंगल्यावर एक महिनाभर राहिलों. आजूबाजूला माझे खूप कार्यक्रम झाले. मजजवळ पैसेहि बरेच जमले. ते घेऊन एक दिवस मी मुंबईत आलों व एका मोठ्या हॉटेलांत उतरलों. मन मानेल तसा खर्च केला. पंधरा दिवसांतच माझे सर्व पैसे संपले होते. मी पुन्हा कंगाल झालों. शेवटीं रेडिओंत गेलों. श्री. बुखारी त्या वेळीं स्टेशन-डायरेक्टर होते. श्री. दिनकरराव अमेम्बलनीं माझा सरोद ऐकला. त्यांनीं बुखारीसाहेबांजवळ शिफारस करून रेडिओच्या वाद्यवृंदांत माझा समावेश करून घेतला. इथें मी फक्त बावीस दिवसच होतों. ह्या अवधींत मुंबईतल्या माझ्या वडिलांच्या एका स्नेह्यांनीं वडिलांना तार करून मीं मुंबई रेडिओ स्टेशनवर असल्याचं कळविलं. केवळ वाद्यवृंदांत मीं वाजविलेला सरोद ऐकून त्यांनीं माझी परस्पर चौकशी केली, व मला नकळत वडिलांना तार ठोकली होती. शेवटीं वडील इथें आले आणि मला घेऊन गेले. माझी त्यांनीं खूप समजूत घातली व निराळ्या रीतीनें शिकवायचं आश्वासन देऊन पुढें ते मला तसं शिकवूं लागले. ह्यानंतर मात्र वडिलांचं मन न दुखवतां मीं रियाज केला. अगदीं कसून केला. 'आतां पुरे' असें वडिलांनीं म्हणेपर्यंत केला व त्यांचा आशीर्वाद घेऊनच मीं बाहेर पाऊल टाकलं.

असा हा माझा इतिहास !"

भारतांत कुठल्याहि प्रमुख प्रांतांत होणाऱ्या संगीत महोत्सवांत तंतकारांचीं तीन नांवें प्रामुख्यानें जाहीर केलीं जातात. तीं म्हणजे आलिअकबर, रविशंकर व विलायत खाँ ह्यांचीं. ह्या तिघांचीहि साधना

अचाट! तसेच तिघेहि अत्यंत लोकप्रिय आहेत. अलिअकबर अत्यंत शांत तर रविशंकर थोडेसे चंचल. विलायतखाँची वृत्ति बरीच तामसी वाटते. जरा मनावेगळें कांहीं घडलें तर रंगमंचावरून कडक शब्दांत ते खडसावतील. अलिअकबरांच्या इच्छेविरुद्ध कांहीं गोष्टी घडल्या तर ते तिथें ढुंकूनहि पाहायचे नाहींत. साथीला बसलेल्या तबलजीनें कांहीं उणें अधिक वाजवलें तर त्याच्याकडे वळून नासिकच्या द्राक्षांएवढे आपले लहानगे डोळे वटारून नुसतें हंसतील एवढेंच. नव्या संशोधनांत ते इतके गुंग असतात कीं, चार प्रश्न केले तर एकाचें उत्तर मिळतें. अति विचारांनीं तापलेल्या डोक्यावरून केसांनीं केव्हांच पोबारा केला आहे. त्यामुळें सत्तरी उलटलेल्या एखाद्या संशोधकासारखा डोक्याचा मधला भाग गुळगुळीत झाला आहे. तसा स्वभाव मिस्किलच. बराचसा विनोदीहि. देशाटन, पंडितमैत्री, सभासंचार ह्यांमुळें चातुर्याची साय त्यावर आलेली आहे.

आशीश, ध्यानेश, राजेश, दिनेश, प्राणेश, अमरेश अशीं हीं शकारानें संपणारीं त्यांच्या मुलांचीं नांवें; पण एक थोरला आशीश त्यांच्या पक्का ओळखीचा. बाकीच्यांना हांका मारतांना प्राणेशला ते दिनेश म्हणतील किंवा राजेशला अमरेश म्हणतील; आणि मग राजेशनें ‘मी अमरेश नाहीं’ असें म्हटलें कीं त्यालाच विचारतील, ‘तूं राजेश? मग अमरेश कुठला?’ आणि मग मुलांत खसखस पिकेल.

सरोद हा सारंगीसारखाच निराकारी. सतारीसारखे त्याला पडदे नसल्यानें कसबी वादकाखेरीज इतरांकडून तो वाजविला गेला असतां तेवढा रंजक वाटत नाहीं. बीन, सुरसिंगार, सुरबहार व रबाब ह्या चारहि वाद्यांचा सरोद हा प्रतिनिधि आहे. विशेषतः ध्रुपद अंगाची आलापी हें त्याचें मुख्य अंग. आलापी, बिलंपत-जोड, मध्य-जोड, द्रुत-जोड, अति द्रुत-जोड, लडी, लडगुथा, लड-लपेट, तार-परण, लडी झाला, ठोक झाला व सीधा झाला. अशा बारा अंगांनीं घराणेदार उस्ताद अस्ताई वाजवतात व त्यानंतर गतीला हात घालतात.

नव्या रागांचें संशोधन अलिअकबरांनीं विशेष केलें. चंद्रनंदन, नंदकंस, गौरीमंजिरी, लाजवंती वगैरे राग त्यांनीं अष्टांग परिपूर्ण केले. ह्याशिवाय

कांहीं कर्नाटकी रागिण्यांचें प्रचलित हिंदुस्थानी संगीत पद्धतींत विलीनीकरण करून, एक नवा प्रयोग लोकप्रिय करून दाखविलेला आहे. ( उदा. वाचस्पति वगैरे. )

दामोदरलाल काब्रा, शरण राणी, बडोद्याचे हिज हायनेस, शिशिर चौधरी हा त्यांचा शिष्यसंप्रदाय. आठ-दहा चित्रपटांचें संगीत-दिग्दर्शनहि त्यांनीं केलें आहे. परंतु मला अलिअकबर आवडतात ते आलापी संपवून गतीला हात घालतात तेव्हां. ढंगदार, बांधेसूद, उल्हासाला पालवी फोडणारी, कोंडलेल्या चैतन्याला उसळून वर आणणारी, मनाला गुदगुल्या करणारी गत वाजवावी अलिअकबरांनींच !

एका समारंभानिमित्त मैहर घराण्याच्या तीन पिढ्यांना मीं एकत्र पाहिलें. मध्यभागीं द्रोणाचार्यांसारखे शोभणारे अलाउद्दीन खाँसाहेब, उजव्या बाजूला अलिअकबर व रविशंकर, पाठीमागें आशीश व अन्नपूर्णा, चार सरोद व एक सतार अशी ती मैफल होती.

अत्यंत मधुर, अतिशय वजनदार, तेवढेंच शुद्ध असें कांहींतरी कानावर संस्कार करीत होतें; परंतु मनावर ठसत होती ती आयुष्याशीं झगडून ब्रह्म निर्माण करणाऱ्या त्या तपस्व्याची—अलाउद्दीन ख़ाँची—मूर्ति !

* *
*



## व्यासंगी कलावंत
# दत्तात्रेय गणेश गोडसे

आयुष्याच्या उन्नतीला साहाय्यभूत होणारीं, वारंवार स्फूर्ति देणारीं अशीं जीं कांहीं साधक माणसें माझ्या पौगंडावस्थेंत मीं नजरेसमोर ठेवलीं होतीं त्यांपैकीं दत्तात्रेय गणेश गोडसे हे एक आहेत. त्यांच्या कुंचल्याची समर्थ रेषा, आपली भावना दुसऱ्याला अनुभवतां येईल अशा रीतीनें व्यक्त केलेली मांडणी, रंगांच्या ठेवणींतला जिवंतपणा व ह्या सर्वांहूनहि एक विशिष्ट असा वेगळेपणा, माझ्या मनावर कायमचा पगडा ठेवून गेला. एखाद्या लहानशा कथाचित्रांतदेखील त्यांची विधियुक्त व्यासंगी दृष्टि होतकरू माणसाला विचारांत टाकी. 'इलस्ट्रेटेड वीकली'-मधलीं त्यांचीं त्या वेळचीं कथा-चित्रें सुबक मांडणी व रंगांच्या मोजकेपणामुळें चर्चेचा विषय झालीं होतीं. 'हळदणकर्स फाइन आर्ट स्कूल' मधला मी विद्यार्थी असल्यानें मागील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसंबंधींची माहिती देतांना गुरुवर्य हळदणकरांनीं वारंवार गोडशांच्या अभ्यासु वृत्तीचा उल्लेख करावा. 'मलबारहिलवरील बहुतेक सर्व मोठ्या वृक्षांचीं यथातथ्य चित्रणें गोडशांनीं एकाग्रतेनें केलीं;' किंवा 'ब्रीच कँडी येथील बरेचसे खडक गोडशांना


ओळखत असले पाहिजेत, इतक्या वेळां गोडसे तिथें जाऊन बसले आहेत व त्यांनीं तिथें बसून ड्रॉइंग्स् केलेलीं आहेत.' असे गुरुवर्यांनीं काढलेले उद्गार ऐकले कीं मुळांतला आदर दुणावे.

'अभिरुचि' हें त्या काळांतलें माझें अतिशय आवडतें मासिक. त्यांतल्या खळबळ उठवणाऱ्या लेखांचे बहुतेक लेखक टोपण नांवाचे असत. 'निषाद आणि शमा', 'पुरुषराज आळुरपांडे', 'मौजे पारलई', 'दत्तात्रेय शंकर पानसे' हीं त्यांतलीं कांहीं ठळक नांवें. हे लोक मोठे रसपूर्ण लिहीत. बोंचक, खोंचक, व्याजोक्तिपूर्ण, व्यंग्योक्तिपूर्ण, ढोंगीपणाचा बुरखा फाडून टाकणारें असें. साहित्याचा धूर्तपणें व्यापार करणाऱ्या, कांहीं वरून साळसूद अशा वाङ्मयचोरांविरुद्ध अभिरुचीनें आव्हानपूर्वक आघाडी उभारली होती, व ह्या आघाडीचे सेनानी वरील टोपणनांवी लेखक होते. इतकें चांगलें लेखन करणारीं हीं पडद्याआडचीं माणसें कोण आहेत, ह्याबद्दलची तीव्र जिज्ञासा सच्चा वाचकाला वाटणें स्वाभाविक होतें. मुंबईच्या अनेक प्रथितयश साहित्यकारांचीं नांवें ह्या बाबतींत घेतलीं जात; पण माझ्या एका विद्वान मित्रानें खरीं नांवें मला सांगितलीं होतीं. तथापि दत्तात्रेय शंकर पानसे हा गृहस्थ म्हणजेच दत्तात्रेय गणेश गोडसे आहे, असें जेव्हां त्यानें खात्रीपूर्वक सांगितलें तेव्हां मात्र मीं थक्क झालों होतों. चित्रकलेएवढीच दर्जेदार, व्यासंगी अशी लेखनकलाहि ह्या माणसाच्या अंगांत आहे, हें जेव्हां मला कळलें तेव्हां मात्र गोडशांच्या व्यक्तिरेखेनें मी पुरा भारून गेलों. गोडशांना भेटावें असें मला फार वाटूं लागलें; पण योगायोग जमून आला नव्हता.

हळ.णकर मास्तरांचे आणि गोडशांचे संबंधहि कांहींशा वेगळ्या चाकोरीचे. एकदां बोलतां बोलतां मास्तर ती आठवण सांगून गेले; पण त्यांतल्या आगळेपणानें मनांत घर केलें. उन्हाळ्याच्या सुटींत मास्तर मुंबई-बाहेर जात आणि वर्ग सुरू व्हायच्याआधीं दोन दिवस परत येत. येतांना निरनिराळ्या ठिकाणीं केलेलीं बरींचशीं निसर्गचित्रें आणीत. हीं निसर्गचित्रें विकलीं जात व मास्तरांचा प्रवास फायदेशीर होई. त्या वर्षींहि वर्ग बंद झाल्यावर मास्तरांनीं बाहेरगांवीं जायची सर्व तयारी जय्यत ठेवली होती.

एक दिवस एक कॉलेज-विद्यार्थी मास्तरांजवळ आला; आणि आपली ओळख देऊन तो म्हणाला–

" कॉलेजची परीक्षा मीं नुकतीच दिली आहे. सुटीचा काळ गांवाला जाऊन मोकळा घालवण्यापेक्षां तुमच्या स्टुडिओंत येऊन अभ्यास केला तर अधिक बरं वाटेल मला. आपण मला शिकवाल काय ? "



**गोडसे ह्यांनीं केलेल्या शीर्षकाच्या मांडणीचा एक उत्तम नमुना.**

" त्याचं असं आहे, उन्हाळ्याच्या सुटींत मीं बाहेरगांवीं जातों आणि हा प्रवास मला फायदेशीर असतो. मी नाहीं गेलों, तर माझं नुकसान होईल. तेव्हां तुम्ही असं करा, क्लास सुरू झाला कीं या. "

" पण त्यानंतर माझं कॉलेज सुरू होईल; आणि त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं; किंबहुना वक्तशीरपणा राहणार नाहीं, ह्याचं मला अधिक वाईट वाटेल ! "

" पण माझं नुकसान करून मी तुम्हांला शिकवीत बसूं काय ? "

" आपलं नुकसान किती होईल ? "

ह्या प्रश्नानें मात्र हळदणकर मास्तर चरकले थोडेसे; पण उत्तर देणें भाग होतें. साधारण आठवण करून ते म्हणाले,

" हें पाहा, तसं कांहीं नक्की सांगतां येत नाहीं; पण चार-पांचशेंच्या आंत सहज. " टाळायच्या उद्देशानें मास्तरांनीं आंकडा सांगून टाकला.

" पण समजा, तेवढे पैसे तुम्हांला दिले, तर तुम्हीं शिकवूं शकाल काय ? "

मास्तरांना काय उत्तर द्यावें, कळेना; पण कांहीं तरी उत्तर द्यायचेंच म्हणून ते म्हणाले, " हो, अवश्य शिकवीन की, त्यांत काय ? "

मास्तरांनीं सांगितलेली रक्कम घेऊन मुलगा दोनतीन दिवसांत हजर झाला. तेवढी रक्कम मास्तरांसमोर ठेवून तो म्हणाला,

" आतां तरी बाहेरगांवीं जायचा बेत रद्द करून मला शिकवायचं मनावर घ्याल का ? "

मास्तर थक्क झाले होते. मुलाची अतीव जिज्ञासा त्यांनीं ओळखली होती; आणि शिकवायचें ठरविलें होतें. ' त्यानंतर अक्षरशः सकाळीं सहा वाजल्या-पासून संध्याकाळीं सहा वाजेपर्यंत एकाग्रतेनें व विचारपूर्वक अभ्यास करणारा त्या मुलासारखा, म्हणजेच गोडशांसारखा विद्यार्थी मला भेटला नाहीं ' असे



**निजामाच्या पिकदाणींत मुखरस टाकणारा कलावंत**
**गोडसे ह्यांनीं सूचक रेषांत उभें केलेलें एक प्रसंगनिष्ठ चित्र.**

हळदणकर मास्तरांचे उद्गार असत. माझ्या दृष्टीनें हळदणकर मास्तरांनीं सांगितलेली ती गोष्ट मुळींच सामान्य नव्हती. एक म्हणजे फीची मोठी रक्कम एकदम आणून देणारा हा विद्यार्थी खानदानी होता—सामान्य कुळांतला नव्हता; आणि दुसरें असें कीं, अशी सुखासीन परिस्थिति असतांनाहि जी गोष्ट करायचें मनांत आणलें तिचा अभ्यास योगीवृत्तीनें तो करीत होता. पुढच्यांना आदर्श निर्माण करून ठेवीत होता.

गोडसे टाइम्सच्या चित्रकला विभागांत असतात हें मला कळल्यावर त्यांना भेटायला मी टाइम्समध्यें गेलों, परंतु त्याच वेळीं टाइम्स सोडून ते दिल्लीला गेले होते. माझी निराशा झाली होती. नंतर दोन-तीन-वर्षें अशींच गेलीं; आणि एक दिवस 'सायन' येथें गोडसे ह्यांनीं एक चित्रकला स्टुडिओ उघडल्याची बातमी मला लागली. श्री. पु. ल. देशपांडे ह्यांचे व गोडशांचे फार चांगले संबंध असल्याचें मला माहीत होतें. देशपांड्यांकडून मीं गोडशांना एक पत्र घेतलें आणि त्यांचा सायनचा स्टुडिओ गांठला. दरवाज्याच्या समोरच एक पुऱ्या उंचीचा, दणकट बांध्याचा, चांगलाच गोरा असा एक इसम--उभ्यानें--बोर्डावर–एकाग्रतेनें काम करण्यांत गर्क होता. केसांना त्यानें कुठलेंच खास असें वळण दिलें नव्हतें. त्यांना स्वच्छंद सोडलेले होतें. मान खालीं असल्यानें त्यांचा चेहेरा मला दिसत नव्हता. पण ते गोडसे असल्याचें मीं अनुमान केलें. मीं त्यांच्या तंद्रीचा भंग केला नाहीं. थोडा वेळ उभा राहिलों. बऱ्याच वेळानें त्यांचें माझ्याकडे लक्ष गेलें आणि चांगलाच परिचय असल्यासारखे ते उद्गारले, "या साहेब!"–मी भीतभीत आंत गेलों. नमस्कार केला. आणि देशपांडे ह्यांनीं दिलेलें पत्र काढून त्या गृहस्थाला दिलें. त्यांनीं तें वाचलें; आणि लगेच विचारलें, "मग केव्हांपासून येतां? आतांपासून कामाला बसणार असल्यास ताबडतोब व्यवस्था करतों."

माझा अंदाज बरोबर ठरला होता. ज्या गृहस्थापाशीं मीं पत्र दिलें ते गोडसेच होते. त्यांच्या ह्या पहिल्याच भेटींत दोन गोष्टीं मीं टिपल्या. एक, कलावंत ह्या शब्दाला जुळणारें भरदार व्यक्तिमत्त्व व दुसरें, मितभाषी-पणाची झांक दाखवणारा दबका आवाज. सायन येथील गोडशांच्या

स्टुडिओंत मी महिना सव्वा महिनाच राहूं शकलों. कांहीं अपरिहार्य कारणामुळें अभ्यासक्रमांत बराच खंड पडूं लागला. त्यांतून कंपनीबरोबर मला नागपूर-अमरावतीच्या दौऱ्यावर जावें लागलें आणि त्यांत दोन महिने गेले. माझी मलाच लाज वाटूं लागली व पुढें मी जाऊंच शकलों नाहीं. दुर्दैव ! गोडशांची ह्या बाबतींत मीं क्षमा मागितली. ते कांहीं बोलले नाहींत. त्यांनीं माझ्या मर्जीवरच सोडून दिलें; पण परिस्थितीच अशी निर्माण झाली कीं, उत्कट इच्छा असूनहि मीं दबला गेलों. मात्र त्या सव्वा महिन्यांत गोडशांकडे येत असलेल्या अनेक थोर व्यक्तींचें दर्शन मला झालें. साहित्यिक, कलावंत, प्रकाशक ज्यांच्याज्यांच्याबद्दल मला अत्यादर होता, त्यांतलीं बरींच माणसें मीं गोडसे ह्यांच्या स्टुडिओंत पाहिलीं. जेमतेम सहाच आठवडे; पण ह्या सहा आठवड्यांत त्यांनीं मला अनेक गोष्टी समजावल्या. ड्रायब्रश, ब्रशस्ट्रोक्स, स्क्रीन वापरणें, अक्षरांची रचना, अंतर काढणें, ओघवता ब्रश फिरवणें वगैरे कित्येक गोष्टी मी गोडशांपासून शिकलों. पुढच्या आयुष्यक्रमांत मला त्यांचा फार उपयोग झाला. गोडशांशीं अधिक जिव्हाळ्याचे संबंध आले.

लहानपणापासूनच गोडशांचा चित्रकलेकडे ओढा असला तरी कुठल्याहि कलेकडे व्यवसाय म्हणून वळावें हें त्यांच्या मालगुजार वडिलांना पसंत नव्हतें. आपल्या ह्या एकुलत्या एक मुलानें वकिल-बॅरिस्टर व्हावें असेंच त्यांना वाटत होतें; परंतु दत्तोपंतांचें मन रुक्ष विषयांपेक्षां घरांतच असलेल्या सप्त सुरांच्या तबल्यांत व कीर्तनांत अधिक रंगत होतें. एखाद्या वाद्यवृंदाला लागणारा सर्व साज घरांतच होता; परंतु वडिलांचा कर्मठ पीळ कणखर होता. त्यामुळें मुलाचें कलासक्त मन धाकानें खुरटलें. गायन-वादन हें हीन दर्जाचें हा सर्वसाधारण समज; पण चित्रकला ही त्यांतल्यात्यांत पेलणाऱ्या दर्जाची. शालेय चढाओढींत दत्तोपंतांनीं त्यांत दाखविलेलें नैपुण्य कौतुकाचें ठरलें. बस्स ! कोंडून ठेवलेल्या कलासक्त भावनांना एवढा आधार पुरेसा होता. इंटर होऊन पुढील शिक्षणासाठीं दत्तोपंत मुंबईला आले व विल्सन कॉलेजांत दाखल झाले. सुरुवातीला उल्लेखिलेला व हळदणकर मास्तरांकडे घडलेला प्रकार तो ह्याच सुमाराचा. मात्र विश्वविद्यालयाची पदवी घेतल्या-

शिवाय तिकडे वळतां कामा नये अशी वडिलांची सक्त ताकीद होती. दत्तोपंतांनीं ती पाळलीहि.

बी. ए. झाल्यानंतर चित्रकलेच्या पुढील शिक्षणासाठीं दत्तोपंत इंग्लंडला गेले व तेथील ‘ स्लेड स्कूल्स ’ ह्या चित्रकला विद्यालयांत नांव घालून त्यांनीं अभ्यासाला सुरुवात केली. दीड वर्ष लोटलें आणि एकाएकीं महायुद्ध सुरू झालें. तशाहि परिस्थितींत न डगमगतां दत्तोपंतांनीं अभ्यास चालू ठेवला असता; पण परत येण्याबद्दल वडिलांनीं तगादा लावला. ‘ ह्यापुढें एक पैहि न पाठविण्याची ’ धमकी दिली. दत्तोपंत परत आले व अत्यंत थोड्या पगारावर टाइम्स ऑफ इंडियाच्या चित्रकला विभागांत होतकरू म्हणून त्यांना घेण्यांत आलें. टाइम्समध्यें नोकर म्हणून जाण्यांत त्यांचा फार मोठा हेतु होता. तिथें असलेल्या प्रो. लँगहॅमर ह्या अत्यंत हुशार चित्रकाराशीं चित्रकलेचे पुढील धडे घ्यावे, हा हेतु मनांत धरून ते तिथें गेले. प्रो. लँगहॅमर ह्यांनीं शिकवायचें कबूल केलें, पण मासिक फी चाळीस रुपये सांगितली. टाइम्समधून मिळणाऱ्या साडेसतरा रुपयांत आणि फीच्या चाळीस रुपयांत अडीचपट तफावत होती; पण दत्तोपंतांना त्याची पर्वा वाटली नाहीं. त्यांनीं प्रोफेसरसाहेबांजवळ शिकायला सुरुवात केली; आणि ही घरंदाज तालीम त्यांना थोडी थोडकी नव्हे तर सात वर्षें मिळाली. चित्रकलेच्या प्रांतांत इतर कुणाला सहसा न मानणारे लँगहॅमरसाहेब ‘ गोडसे माझा विद्यार्थी आहे ’ असें अभिमानानें सांगतांना मीं ऐकलेलें आहे.

टाइम्स सोडून गोडसे दिल्लीला गेले. तिथली नोकरी मोठ्या पगाराची होती. सुखासीन होती. आणखी एक-दोन वर्षांत हजार रुपयांच्या आसपास नेऊन ठेवणारी होती; पण गोडशांना तें वातावरण मानवलें नाहीं. त्यांच्या अभ्यासु वृत्तीला नोकरींत कोंडून राहणें आवडेना. वास्तविक आतांपर्यंत दहा अकरा वर्षांचें शिक्षण पाठीशीं होतें. शिष्टांकडून मान्यता मिळाली होती; पण काय त्यांच्या मनांत आलें कोण जाणें, दिल्ली सोडून ते मुंबईला आले, व इथून पुढें त्यांनीं–कुणाहि बुद्धिजीवि माणसानें हेवा करावा असा–आत्मविकास साधला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 39066 विः 4/12
क्रमांक 2000 नोंः दिः 8/79

कुठल्याहि गोष्टीची थोडीशी अनुभूति झाली कीं तिच्या मुळाला हात घातल्याशिवाय गोडशांचा संशोधक आत्मा शांत होत नाहीं. लहानपणीं त्यांना तबला किंवा पखवाज शिकायची फार इच्छा होती; पण सोवळ्या संस्कारांना तें मानवत नव्हतें. त्यांच्यांतला वादक कलावंत एके दिवशीं जागा झाला. त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं; एकदम पानसे घराण्याशीं गंडा बांधला.

अभिरुचींत लेखन झालें तें ह्याच काळांत. त्यांतलीं अजोड सिनेमा-परीक्षणें गोडसेच लिहायचे. तसें पाहिलें तर गोडशांनीं लिखाण थोडेंच केलेलें आहे; पण ह्या थोड्याशा लिखाणानेंदेखील महाराष्ट्रांतील विचार-वंतांच्या मालिकेंत त्यांनीं निश्चित असें स्थान कमावलेलें आहे. अमर भूपाळीवरील सत्यकथेंतले लेख, ' नांगी ' ही त्यांतलीच लेखमाला, हें लेखन म्हणजे त्यांचा सखोल व्यासंग दाखवणारीं उदाहरणें होत. ' छंद ' मासिकांतून श्री. के. नारायण काळ्यांना दिलेलीं उत्तरें गोडशांचा कला-व्यासंग किती जबरदस्त आहे हें दाखविणारा आरसा आहे. सिनेमाचें कलादिग्दर्शन अनुभाविण्यासाठीं सगळा व्यवसाय सोडून गोडसे सिनेमा व्यवसायांत शिरले. दोन अडीच वर्षे बुडीत गेलीं; परंतु अनुभव घेतल्या-शिवाय त्यांनीं माघार घेतली नाहीं. नाटकाच्या नेपथ्याबद्दलचें त्यांचें ज्ञान ' मुंबई मराठी साहित्य संघ ' चांगलें जाणतो. रात्रीं तीन-तीन वाजेपर्यंत तिथें चर्चा करीत बसलेल्या गोडशांना मीं पाहिलेलें आहे व हें सारें नाटकाचा एकहि फुकट पास न घेतां. मला वाटतें साहित्य संघाचे जे निरलस, निःस्पृह असे कार्यकर्ते आहेत त्यांत गोडसे वरच्या क्रमांकाचे. केसरींत येणारीं त्यांचीं ऐतिहासिक संशोधित चित्रणें ' रिप्ले ' ह्या जगप्रसिद्ध चित्रकाराच्या तोलाचीं पण वेगळीं अशीं आहेत. आणि ' दीपावलि ' मासिकांत चालू असलेली ' पोत ' ही लेखमाला ही त्यांच्या विशाल व्यासंगाचें होऊं घातलेलें मंदिर आहे.

प्रत्येक गोष्टींतलें कलात्मक सौंदर्य इतक्या सूक्ष्म दृष्टीनें, संशोधक वृत्तीनें न्याहाळणारा गोडशांसारखा कलावंत माझ्या पाहण्यांत नाहीं. एका मालगुजार कर्मठ कुलांत जन्म घेऊनहि श्रीमंतीचा यत्किंचितहि गर्व नसलेला,

सुखाला दूर लोटून, बुद्ध्या, दुःखांतल्या सुखाचा शोध घेणारा असा हा आदर्श कलावंत. रोज झोपायच्या आधीं दहा स्केचेस करायचींच हा गेल्या पंचवीस वर्षांपासूनचा नियम. त्या व्रताचा भंग त्यांच्याकडून अजून झालेला नाहीं. आतांपर्यंत लाखों स्केचेस् करून झालीं तरी तो नियम मोडलेला नाहीं.

गोडशांचा व माझा प्रत्यक्ष परिचय होऊन पंधरा वर्षं सहज लोटलीं. आतांशा त्यांची ती पहिली टवटवीत वृत्ति चटकन् दिसत नाहीं. तिला कुठें तरी सुप्त असा तडा गेल्यासारखा वाटतो. त्या कारणांचा शोध घेणें मला कठीण नाहीं. जास्त जिज्ञासा दाखविली तर मोकळेपणानें मला ते सांगतीलहि; तशी त्यांची ढोंगी वृत्ति नाहीं; पण मला माझ्या समाधीचा भंग करायचा नाहीं. बोलून-चालून माणूस ! त्याच्यांत गुण असतील तसे दोषहि. गोडशांच्या गुणांच्या प्रकाशांत त्यांच्यांतल्या दोषांना स्थान राहत नाहीं. त्यांच्यासारख्या कला-योगी माणसाला त्याचें कांहीं वाटतहि नसावें.

शैली लक्ष्यवेधक झाली कीं परंपरा आपोआप निर्माण होते. गोडशांच्या शैलीला गुरुतर मानून चालू पिढींतले अनेक युवक तिचें अनुकरण करूं लागलेले आहेत. लेखमालेचें किंवा लेखाचें शीर्षक असो किंवा एखाद्या पुस्तकाचें वेष्टन असो, जो विषय असेल त्या विषयानुरोधानें गोडसे त्याच्यांत जीव ओतायचा प्रयत्न करतील; नवीनतेची कांहीं तरी झलक दाखवतील, आणि म्हणूनच तशाच गंभीर विषयाच्या ग्रंथाचें आवरण नेटक्या पद्धतीनें करून घ्यायचं असलं, कीं मान्यवर प्रकाशक आधीं गोडशांकडे धांवतात; नंतर इतरांकडे. कांहीं दिवसांपूर्वीं श्री दलाल ह्यांच्याकडे ‘ चित्रकला ’ ह्या विषयावर सहज बोलतां बोलतां विषय आलेखनावर येऊन ठेपला. विषय अर्ध्यावरच तोडून श्री दलाल ह्यांनीं आपल्या फाइलमधून एक वहीच्या कागदाएवढा कागद काढून माझ्या समोर ठेवला. त्या कागदावर अप्रतिम आणि वजनदार अशीं कांहीं लाइफवरून केलेलीं स्केचेस होतीं. मीं दलालांच्याकडे प्रश्नार्थक पाहिलें; पण अधिक कांहीं न बोलतां गंभीरपणें त्या कागदावर तर्जनी आपटीत ते म्हणाले—

“ ह्याला म्हणतात ‘ आलेखन ’ ! नुसती बडबड नाहीं, साधना आहे. पेन्सिल बघ कशी सहज आणि सफाईनें फिरली आहे. ह्यांतला प्रत्येक ‘ स्ट्रोक ’ कांहीं तरी ध्वनित करतो. ”

तीं स्केचेस गोडशांचीं होतीं हें समजायला वेळ लागला नाहीं. अधिक चौकशी केली असतां तो कागद गोडशांनीं 'दीपावली' साठीं पाठविलेल्या एका लेखांतून चुकून आला असल्याचें कळलें. गोडशांच्या आलेखनाबद्दल ह्याहून आणखी शिफारस नको असें मला वाटतें.

आपला व्यवसाय चोख सांभाळून मुंबईतल्या सांस्कृतिक, शैक्षणिक, आणि भारदस्त अशा संगीत-नृत्यादि कार्यक्रमांना अभ्यासूवृत्तीनें गोडसे हजर राहतात. एखाद्या सभेंत स्वतःला न पेलणाऱ्या विषयाला हात घालून असंबद्ध असें बरळणाऱ्या वक्त्याकडे पाहून हा व्यासंगी माणूस वारंवार नुसते सुस्कारे सोडीत असतो; पण सभा सोडून जात नाहीं. अशी सोशिकवृत्ति त्यांनीं आपल्या अंगीं बाणवून घेतली आहे; आणि केव्हां केव्हां त्या सोशिकपणाचा अतिरेक त्यांच्या बाजूला बसलेल्या मला उगाचच अस्वस्थ करतो.

REFBK-0011619

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ..... दि: .....
क्रमांक ..... नों. दि. .....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.